# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**गुरूवार दिनांक २०-०८-२०१५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

गुरूवार दिनांक २० ऑगस्ट २०१५ रोजी (का.प.क्र ६) मा.महापौर श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११-०० वा वंदेमातरम् या गिताने सुरू झाली. सभेला मा.अति.आयुक्त श्री.रमेश पवार, नगरसचिव, श्री.दिलीप सुर्यवंशी, संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१. स.स. श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड
२. स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर
३. स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव
४. स.स. श्री. खान जहाँगीर मुलानी
५. स.स. श्री. बमणे पुनमचंद सोनाजी
६. स.स. श्री. जाधव बन्सी ग्यानू
७. स.स. श्री. वाघमारे रुपचंद लक्ष्मण
८. स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग
९. स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
१०. स.स. सौ. रोजतकर पुष्पा उत्तमराव
११. स.स. श्री.विजय साईनाथ औताडे
१२. स.स. श्री. सुरे सीताराम इसराम
१३. स.स. सौ. स्वाती किशोर नागरे
१४. स.स. श्री. खान अय्युब म.हुसेन खान
१५. स.स. श्री. जाधव ज्ञानोबा पांडूरंग
१६. स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय
१७. स.स. श्री. शेजवळ सुभाष सयाजी
१८. स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद
१९. स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद
२०. स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ
२१. स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद
२२. स.स. श्री. सय्यद मतीन रशीद
२३. स.स. श्रीमती शकीला बेगम फैयाजोद्दीन
२४. स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ
२५. स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल
२६. स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी
२७. स.स. श्री. सिद्दीकी नासेर तकीउद्दीन

२८. स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम
२९. स.स. श्रीमती खरात सिमा गणपत
३०. स.स. सौ. शोभा नारायणराव वळसे
३१. स.स. श्री. चित्ते नितीन रमन
३२. स.स. सौ. ज्योती सुभाष पिंजरकर
३३. स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र
३४. स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी
३५. स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले
३६. स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग
३७. स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप
३८. स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव
३९. स.स. श्री.शिंदे राजु रामराव
४०. स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम
४१. स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
४२. स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम
४३. स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ
४४. स.स. श्री.अजीम अहेमद रफीक
४५. स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी
४६. स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी
४७. स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन
४८. स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया
४९. स.स. श्री.तनवाणी राजु लेखराज
५०. स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव
५१. स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ
५२. स.स. श्री.किर्ती महेंद्र शिंदे
५३. स.स. श्री.एडके विकास प्रकाश
५४. स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय
५५. स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव
५६. स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम
५७. स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी
५८. स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास
५९. स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण
६०. स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास
६१. स.स. श्री. शेख जफर अखतर
६२. स.स. श्री. जहागीरदार मोहम्मद अयुब गुलाम जिलानी
६३. स.स. श्रीमती गादगे शितल विरभद्र
६४. स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
६५. स.स. श्री. दांडगे शिवाजी भाऊसाहेब
६६. स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत

६७. स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश
६८. स.स. श्री. खैरे ऋषिकेश चंद्रकांत
६९. स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी
७०. स.स. श्री. बारवाल गजानन रामकिसन
७१. स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण
७२. स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर
७३. स.स. श्रीमती बनकर विजया संजय
७४. स.स. श्री.साळवी नितीन दशरथ
७५. स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल
७६. स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र
७७. स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
७८. स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास
७९. स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद
८०. स.स. श्रीमती सत्यभामा दामु अण्णा शिंदे
८१. स.स. श्री. जगताप भाऊसाहेब उत्तमराव
८२. स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र
८३. स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव
८४. स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव
८५. स.स. श्री. भगवान (बापु) देविदास घडमोडे
८६. स.स. श्री.सोहेल शकील शेख
८७. स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे
८८. स.स. श्रीमती साळवे अनिता मोहन
८९. स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब
९०. स.स. श्रीमती मिना रामदास गायके
९१. स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव
९२. स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम
९३. स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे
९४. स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल
९५. स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ
९६. स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर
९७. स.स. श्रीमती निकाळजे लता मगन
९८. स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ
९९. स.स. श्री.विकास रतनलाल जैन
१००. स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद
१०१. स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे
१०२. स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
१०३. स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन
१०४. स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे
१०५. स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे

१०६. स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी
१०७. स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
४. श्री.चंदु किशनचंद तनवाणी

श्री.नंदकुमार घोडेले :भारताचे माजी राष्ट्रपती मा.ए पी जे अब्दुल कलाम यांचे दु:खद निधन झाले त्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.भगवान घडमोडे :भारताचे राष्ट्रपती यांच्या पत्नी सुर्वा मुखर्जी यांचेही दु:खद निधन झाले त्यांनाही श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.भाऊसाहेब जगताप :स्वा.सैनिक श्री.रतीलालजी जरीवाल काका यांचे निधन झाले त्यांनाही श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.अफसर खान :यास अनुमोदन आहे.

श्री.कैलास गायकवाड :श्रध्दाजंली बाबत जी नावे सुचविली त्यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

या वेळी ए.पी.जे.अब्दुल कलाम, रतीलालजी जरीवाला (काका), सुर्वा मुखर्जी यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री.भगवान घडमोडे :महाराष्ट्र शासनाने नुकताच मा.श्री.बाबासाहेब पुरंदरे यांना महाराष्ट्र भुषण पुरस्कार देऊन सन्मानित केले त्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे व सर्व मा.मंत्री मंडळाचे अभिनंदन करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :थोर इतिहासकार मा.श्री.बाबासाहेब पुरंदरे यांना हा पुरस्कार देऊन सन्मानीत केले महाराष्ट्र शासनाचे व श्री.बाबासाहेब पुरंदरे यांचे अभिनंदन करावे. ठरावाच्या माध्यमातून त्यांचे कुटूंबीयांना पत्राने भावना कळवाव्यात.

श्रीमती किंती शिंदे :काल त्यांना महाराष्ट्र भुषण पुरस्कारांने सन्मानीत केले. अभिनंदनाचा ठराव मंजूर करावा.

मा.महापौर :शिवशाहीर मा.श्री.बाबासाहेब पुरदंरे यांना काल महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र भुषण पुरस्काराने सन्मानित केले. शासनाचे तसेच मा.श्री.बाबासाहेब पुरदंरे यांचे अभिनंदन करण्यात येते. अभिनंदनाच्या ठरावा बाबत प्रशासनाच्या वतीने तसे त्यांचे कुटूंबीयांना कळविण्यात यावे.

श्री.अफसर खान :टाऊन हॉल ते विदयापीठ गेट पर्यत रस्त्याचे काम का होत नाही.

श्री.गोकुळसिग मलके :नारेगांव कचरा डेपो शिप्ट करण्या बाबत काय कार्यवाही केली तेथे ७ महिण्यापासून औषध फवारणी बंद आहे.

श्री.अफसर खान :टाऊन हॉल ते विदयापीठ गेटचे काम ३-४ दिवसात सुरू होईल असे मागच्या बैठकीत म्हटले काम सुरू केले नाही या रस्त्यावर मोठे खड्डे पडले अपघात होत आहे देश विदेशातून पर्यटक या रस्त्याने जातात.एकाच एजन्सीला जास्तीची कामे दिल्यामूळे या रस्त्याचे काम

होऊ शकले नाही.काम होत नाही बील उचलले जाते.मनपाचे नुकसान होत आहे.

मा.महापौर :कचरा,लाईट रस्त्याचा विषय नंतर घेवू मागील दिनांक २०-७-२०१५ च्या सभेत ६० क्रमांकाचा ऐनवेळी स्मार्ट सिटी चा विषय मंजूर केला होता आता विषयपत्रिकेवर विषय क्र ६० यास ६१ क्रमांक येईल प्रत्येक विषयांचा १ ने पुढील वाढीव क्रमांक येईल.

श्री.राहूल सोनवणे :श्री.शिवाजी झनझन यांचे संदर्भात मी पत्र दिले त्यांनी माझा अपमान केला? त्यांचेवर काय कार्यवाही केली.

श्री.नंदकुमार घोडले :अनेक अधिकारी गैरहजर आहेत.कोणत्या कामा निमित्ताने गेलेले आहे?

मा.महापौर :अमृत योजनेसाठी तीन दिवस मुंबईला बैठक आहे तसे पत्र देऊन मला कळविले आहे.

श्री.राजू शिंदे :दि.१७-७-१५ ला मी अकाऊंट विभागाच्या संदर्भात प्रश्न दिले ते यात आलेले नाही.

मा.महापौर :कोणते प्रश्न घ्यायचे किंवा नाही. वैयक्तिक, किंवा कुणाचे मानसिक हणन होत असेल असे प्रश्न असतील तर ते घ्यायचे की नाही मला अधिकार आहे.

श्री.राजू शिंदे :सात दिवस अगोदर म्हणजेच १७-७-१५ ला मी प्रश्न दिला यात आला नाही. वैयक्तिक प्रश्न विचारला नाही. अ.क्र.धनादेश क्र. दिनांक व रक्कम व नावाचा तपशिल हेच प्रश्नात विचारले.

मा.महापौर :आपण विचारलेल्या प्रश्नाची माहिती आपणांस मिळेल.

श्री.राजू शिंदे :ठेकेदार काम करीत नाही.त्यांना बील मिळत नाही असे सांगतात तर महापालिकेचे पैसे कुठे जातात.बील दिले असतील तर कामे का होत नाही. बील देतांना सिनेरीटी, टोकन सिस्टम लेखा विभागात नाही.पैसे घेवून बीले दिली जातात का?रक्कम कशी दिली जाते माहिती पाहिजे.

मा.महापौर :८ दिवसात स.सदस्यांना माहिती दयावी. बील देण्याचा क्रम कसा ठरविता येईल सर्व स.पदाधिकारी, गटनेते एकत्रित बसून योग्य निर्णय घेतील.

श्रीमती सत्यभामा शिंदे :आपण बायोमॅट्रीक पध्दत सुरू करण्याची सक्ती केली.जास्तीत जास्त अधिकारी कर्मचारी कार्यालयात बसून काम करतील.

प्रश्न क्र.७० श्री.कैलास गायकवाड

श्री.कैलास गायकवाड :प्रश्नाचे उत्तर दिले कलम ५६ नुसार कार्यवाही करण्याचे अधिकार आहे दोन सभेपासून या विषयावर चर्चा होते उपआयुक्त (म) याचेसाठी पश्न उपस्थित केला होता की, मुख्यलेखाधिकारी श्री अशोक थोरात यांचे प्रतिनियुक्तीच्या संदर्भात प्रश्न होता.प्रतिनियुक्ती करण्याचा अधिकार आहेत का हे पद ४५ ब प्रमाणे सभागृहाची मंजूरी घेण्याचा अधिकार नाही हे पद ५३ प्रमाणे असल्याने सभेची मान्यता घेण्याची गरज होती खोटी माहिती दिली म्हणून उपआयुक्त म. श्री. बोर्डे यांचेवर ५६ नुसार कार्यवाही करावी.कोर्टातील याचिकेच्या संदर्भात श्री.ओ.सी.सिरसाट यांचेकडून खुलासा मागीतला होता. याचिकेची प्रत माझ्याकडे आहे.

मुख्यलेखाधिकारी यांचे बाबतीत सभागृहाने परवानगी घ्यावी किंवा घेवू नये असे याचिकेत कुठेही नमूद नाही. याचिका प्रमोशनच्या संदर्भात श्री.ओ.सी.सिरसाट यांनी दोन सभेत यांची चुकीची माहिती दिली त्यामूळे त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.राजू शिंदे :प्रकरण अंगलट येऊ नये कुणाला पाठीशी घालायचे असेल तर विधी विभागाचा सल्ला घेतला जातो. मागच्या वेळी हे प्रकरण न्यायालयात असल्याने चर्चा करता येत नाही असे विधी सल्लागार यांनी म्हटले होते.प्रकरण न्यायालयात असेल पण कोणत्या नियमाने चर्चा करता येत नाही ते सांगावे. ज्यांचे संबधीत प्रकरण न्यायालयात आहे, तर त्या अधिका-यांनी कामही करायला नको तेही थांबले पाहिजे.

श्री.अफसर खान :दोन बैठकीपासून विधी सल्लागार यांनी म्हटले की हे प्रकरण कोर्टात आहे. चर्चा करू नये, असे मा.न्यायालयाने म्हटले का दिशाभूल होईल असा खुलासा विधी विभागाकडून होतो त्यांचेवर कार्यवाही व्हावी. अधिका-यांना मुदतवाढ देण्याची मंजूरी का घेतली जात नाही.

अति.आयुक्त :सेक्शन ५ नुसार वाचन केले एखादे प्रकरण कोर्टात असेल तर त्यावर चर्चा करू नये असे म्हटले होते.

श्री.कैलास गायकवाड :श्री.अशोक थोरात मा.न्यायालयात गेले असते व पुढील मुतदवाढ मिळत नाही व माझ्याकडून काही चुका होऊ शकतात नोकरीवर गदा येऊ शकते आणि त्यावर जर कोर्टाने स्टे दिला असता तर चर्चा केली नसती.

श्री.राजू शिंदे :मा.न्यायालयाचा अवमान विधी सल्लागारच करीत आहे.

विधी सल्लागार :मा.न्यायालयाच्या बाबतीत मुद्या उपस्थित केला मनपाच्या अधिनियमामध्ये जी स्थायी समिती परीवहन समिती कामकाजाच्या संबधी चॅप्टर २ यात कामकाजाच्या संबधीत तरतुदी की कुठले प्रश्न विचारू नये, प्रतिबंद केला आहे ते दिले खंड तीन, दोन मध्ये सुध्दा तरतुद केली ते असे जो प्रश्न प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे भारताच्या प्रदेशातील कोणत्याही भागातील कोणत्याही न्यायालयात व न्यायाधिकरणापुढे प्रलंबीत असलेला कोणताही वाद किंवा कार्यवाही किंवा त्याचेशी संबधीत असलेला असा कोणताही प्रश्न किंवा जो नगरपालिकेच्या अधिकारी कर्मचारी यांचे चारित्र्य किंवा वर्तनुकीसंबधी किंवा त्याचे पदाचे नात्याने किंवा सार्वजनिक दृष्टीने असेल त्या व्यतिरिक्त अन्य बाबतीत असेल असा कोणताही प्रश्न जो कोणत्याही व्यक्तीची किंवा जमातीची त्या भागाची बदनामी करणारा असेल किंवा त्यातून ध्वनीत होत असेल किंवा त्यांचे वैयक्तिक चारित्र्यावर आरोप करण्यात आला असेल असा प्रश्न.,क्र.२मध्ये महापौराने ज्या कोणत्याही प्रश्नामुळे त्याच्या मते पोटनियम १ च्या तरतुदीचे उल्लंघन होत असेल असा प्रश्न विचारण्यास परवानगी देता कामा नये कोणताही प्रश्न पोट नियम १ अन्वये लावलेल्या निर्बंधाच्या कक्षेत येतो किंवा नाही. या बाबत

कोणतीही शंका उपस्थित झाल्यास त्या मुद्यांवर महापौराने निर्णय दिला पाहिजे आणि त्याचा निर्णय अंतिम असेल.

श्री.राजू शिंदे :मा.कोर्टात मॅटर आहे तर त्या अधिका-यांचे येथील कामकाज थांबले पाहिजे.चेक वर सही कशाच्या आधारे करतात. मुदतवाढीची मंजुरी घेणे आवश्यक होते असे मा.न्यायालयाने म्हटले तर मधल्या काळात संबंधीत अधिकारी यांनी केलेले कामास जबाबदार कोण असेल रॉबर्ट सारखे काम विधी सल्लागार करतात.

अति.आयुक्त :श्री.थोरात यांना पार्टी करून घेतले आहे परंतु मा.न्यायालयाचा स्टे वगैरे आहे हे तितकेच खरे आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :प्रकरण न्यायालयात असेल तरबोलायचे की नाही हे सांगावे कुणीही बोलणार नाही परंतु समांतर व इतर अनेक प्रश्न न्यायालयात आहे तर चर्चा करता येणार नाही का स्पष्ट सांगावे.

श्री.राजू शिंदे :परिशिष्ट -२ मध्ये महापौरांचे अधिकार अंतिम आहे.चुकीची माहिती विधी सल्लागार देतात.ते विधी सल्लागार या पदासाठी पात्र आहेत का याची चौकशी व्हावी.

मा.महापौर :मा.आयुक्तांनी नियमानुसार कार्यवाही करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :जर कोर्टाची स्टेटस्को ऑर्डर असेल तर त्या विषयावर बोलता येत नाही आताच माहिती घेतली

श्री.नंदकुमार घोडेले :मा.महापौरांचे अधिकार आहे त्याप्रमाणे आदेशीत करावे.

अति.आयुक्त :सुचना केल्या त्यानुसार पुढील १० दिवसाच्या आत लीगली कार्यवाही करण्यात येईल.

श्री.अब्दुल ताहेर शेख :एखादे प्रकरण न्यायालयात प्रलंबीत आहे व त्या बाबतीत स्टे, स्टेटस्को नाही इंजेक्शन ऑर्डर नाही.तो पर्यंत पुढील कार्यवाही करू शकतो.जे परिशिष्ट २ वाचून दाखवले त्यात अंतिम निर्णय महापौरांनी घ्यायचा आहे.

मा.महापौर :कायदयानुसार आयुक्तांनी १० दिवसाच्या आत कार्यवाही करावी.

श्री.राजू शिंदे :विधी सल्लागार चुकीची माहिती सभागृहात देतात हा मा.कोर्टाचा अवमान आहे मा.न्यायालयाचा आधार घेवून कायद्याचा धाक दाखवून सदस्यांना बोलण्यापासून वंचीत करीत असेल तर त्यांचेवर कार्यवाही करावी. पॅनलवरून त्यांना काढावे.

श्री.गायकवाड कैलास :विधी सल्लागार चुकीची माहिती देतात त्यांचेवर ५६ नुसार कार्यवाही करावी.

मा.महापौर :५६ प्रमाणे काय कार्यवाही करता येईल ती नियमानुसार करावी.

प्रश्न क्र.७२ :श्रीमती समिना शेख स.पालिका सदस्य

श्रीमती समीना शेख : खुलासा मिळाला समाधानकारक नाही.दिं.२२-३-११ चे इतिवृत्त दिले त्यात योजनेचा आर्थीक आकृती बंध मध्ये २२ व १४ एमएम व्यासाची लाईन असे दिले जो बदल केला सभागृहाची मंजूरी घेतली का?

श्री.मो.अयुब जागीरदार :२२०० ऐवजी २००० मीमी व्यासाची लाईन टाकत आहे हे कुणाच्या सांगण्यावरून होत आहे.

कार्य.अभियंता पापू :२००० मी मी व्यासाची लाईन टाकण्यात येणार उत्तर दिले २२०० एमएम बध्दल त्यांचे जे म्हणजे आहे ते थीकनेस बध्दल आहे.डिझाईन प्रमाणे जी येईल प्रशेर प्रमाणे जे येईल त्याप्रमाणे टाकणार आहे.त्याचे डीपीआर व डिझाईन चालू आहे.

या वेळी स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.मो.अयुब जागीरदार :२००० व्यासाची लाईन टाकणार सभागृहाची मंजूरी घेतली का?

कार्य.अभियंता (पापू) :जे डिझाईन होत आहे त्यानुसार आजच्या परीस्थितीत उत्तर दिले

श्रीमती समीना शेख :करारात काय ठरले कोणती लाईन टाकणार आहे.

कार्य.अभियंता-पापू :कोणती लाईन, कराराप्रमाणे ठरलेले आहे. त्यामध्ये डीझाईन प्रमाणे २००० मीमी आलेले आहे.

श्री.नाईकवाडी अब्दुल :पीएमसी डीझाईन तयार करते त्यानंतर काम होते. दाखवायचे एक व करायचे एक असा प्रकार होत आहे.

कार्य.अभियंता-पापू :आपल्या डिझाईन प्रमाणे २०००मीमी व्यासाची लाईन टाकणार आहोत उत्तर दिले डिझाईन केले त्यानुसार काम होईल.

श्री.मो.अयुब जाहागीरदार:डिझाईन काय केले दाखवावे.

श्रीमती समीना शेख :इतिवृत्तात २२०० मी मी कशी दिले.ले-आऊटची प्रत दिली नाही

अति.आयुक्त :२००० मी मी व्यासाची लाईन इतिवृत्तात २२०० झाले टाईप मिस्टेक आहे.

मा.महापौर :दुरूस्ती करून घ्यावे.

श्री.प्रमोद राठोड :स्वतंत्र अभियंता बध्दल मला माहिती दिली की युनीटी कन्स्लटंट त्याचे सोबत त्रि-कक्ष करारनाम्याच्या अटी शर्ती नुसार औरंगाबाद जलवाहिनी पीपीपी प्रकल्प संदर्भात काम करीत असून प्रकल्प अहवाल बनविणे. प्रकल्पाच्या संबधीत बैठकीला उपस्थित राहणे. प्रकल्पाचा डीपीआर हायड्रोलिक डिझाईन तपासणे व मान्यतेची शिफारस व अंतिम करणेची शिफारस करणे प्रकल्पाची विविध प्रकारची तांत्रिक शंका तपासून मान्यतेची शिफारस करणे. प्रकल्पाच्या भांडवली व दुरूस्तीच्या कामाकरीता वापरण्यात येणा-या गुणवत्तेची तपासणी करणे. थर्ड पार्टी तपासणी करणे शिवाय मनपाच्या अभियंत्या समवेत वेळोवेळी उपस्थित राहणे. तसेच पाणीपुरवठा विस्कळीत कामावर देखरेख करणे. अशी कामे सांगितली. ३ वर्षासाठी स्वतंत्र अभियंता यांना १८ कोटी फिस देत आहोत. त्यांनी काय कामे केले दीड महिन्यात ४ पत्र दिले माहिती दिली नाही.ही एजन्सी पाणीपुरवठयावर काय देखरेख करते. माहिती दयावी.

श्री.रेणुकादास वैद्य :स्वतंत्र अभियंता किती वेळेस पाहणीसाठी शहरात आले. १०-५-२५ पाईप देऊन काम सुरू होते. काम चालू असल्याचे दाखविले जाते. माझ्या वार्डात ८-१० पाईप टाकले, खड्डे खोदून ठेवले, पुढच्या कामासाठी पाईप नाही. असे उत्तर मिळतात. त्या अभियंत्यास व मनपास माहिती नसतांना निकृष्ट दर्जाचे काम चालू आहे.

श्री.नंदकुमार घोडेले :या एजन्सीचा करारनामा रद्द करावा.

श्री.अफसर खान :एजन्सीचे ऑफिस कुठे आहे.

श्री.राजू शिंदे :एजन्सीचे कर्मचारी कोणते कुठे बसतात ते सागावे. मनपाच्या अधिका-यांना माहिती आहे का

कार्य.अभियंता-पापू :पुण्याला त्यांचे ऑफिस आहे.येथे मनपाच्या कार्यालयात येऊन बसतात.

या वेळी स सदस्य मोठमोठयाने एकाच वेळी बोलत असतात.

मा.महापौर :स्वतंत्र अभियंता यांना येथे बोलवून घेवू सभा काही वेळासाठी तहकूब करण्यात येते.(वेळ १२.३० सभेला सुरूवात १.३०वा.)

मा.उपमहापौर :स्वतंत्र अभियंता यांचे ऑफिस कुठे ,फोन नंबर सहित सांगावे

कार्य.अभियंता :ईटखेडा नाथपूरम येथे ऑफिस आहे.

श्री.नंदकुमार घोडेले :येथे ऑफिस नाही चुकीची माहिती दिली जाते.

श्री.भगवान घडमोडे :पुढील बैठकीत माहिती घ्यावी पाण्यासाठी प्रशासनाने सिरीयस रहावे. एजन्सी काम करीत नसेल तर पैसा खर्च का करतो. आता अधिकारी नाही प्रश्न पुढील सभेत घ्यावे.

श्रीमती माधुरी देशमुख :निधी अभावी मोफत अत्यंविधी योजना बंद करतो. नागरीकांकडून करावर २४ टक्के व्याज लावतो. स्मार्ट सिटी कडे जातो आहे आणि १८ कोटी काम न करता वाटतो हे योग्य नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :या एजन्सीने ३.१३ कोटी दिले, काय काम केले. भुमीगत गटारची पीएमसी जसे काम करते त्याप्रमाणे या एजन्सीला नियम नाही का ?

श्री.राजेंद्र जंजाळ :अधिकारी उपस्थित नाही प्रश्न नंतर घ्यावे.

मा.महापौर :एजन्सी व मनपा यातील पीएमसी च्या माध्यमातून काम करत असतो. भुमीगत गटारचे काम पीएमच्या माध्यमातून जसे होते तसे या पीएमसीने ही काम करावे पुणेला राहून काम करीत असेल तर मनपाच्या हिताचे नाही. पाणी पुरवठा समांतरच्या संदर्भात सर्व माहिती पीएमसीनेच दयावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :यानंतर पीएमसीचे बील देऊ नये.

श्री.अफसर खान :जेथे काम होते तेथे पीएमसी येते का ?

मा.महापौर :दुषित पाणी येते त्याची माहिती पीएमसीकडून घ्यावी पीएमसीचे ऑफिस कुठे काम किती केले कंपनीने अधिकारी कर्मचाऱ्याने फोन नंबर स.सदस्यांना देण्यात यावे. संदर्भात स.पदाधिकारी यांचे समवेत बैठक घेवून पीएमसीच्या अधिका-यांना त्यावेळी बोलवावे.

श्री.राजू शिंदे :पाण्याच्या किती टाक्या धुतल्या

कार्य.अभियंता (पापु) :१६ टाक्या धुतल्या आहे.

श्री.अफसर खान :२२०० ऐवजी २००० एमएम ची लाईन टाकणार यात १८० कोटीचा घोटाळा आहे त्या करारनाम्यात तसे आहे का ?

प्रश्न क्रमांक ७४

श्रीमती समीना शेख :डी आय व एचडीपीई लाईन असे कॉम्बीनेशन यास शासनाची परवानगी घेतली का त्याची प्रत दिली नाही.

कार्य.अभियंता-पापू :जे वाचन केले अटी आहे. महापालिका व त्यांचेत प्रीबीड मीटींग असते त्यात अटी मान्य केल्या. तो खुलासा दिला.

मा.महापौर :या संदर्भात सुनावणी झाली मा.मुख्यमंत्री महोदय यांनी चौकशीचे आदेश दिले.

श्री.अफसर खान :२२०० चे २००० मीमी कसे केले १८० कोटीचा फायदा कुणास होणार आहे.हे मा.मुख्यमंत्री साहेबांना माहित आहे का ?

अति.आयुक्त :इतिवृत्तांत २२०० झाले उत्तर दिले त्यात २००० आहे.

श्री.अफसर खान :करारनाम्यात काय आहे.

कार्य.अभियंता :२००० मीमी व्यासाची लाईन आहे.

नगरसचिव :२२०० ऐवजी २००० मीमी व्यासाची लाईन टाकली जाणार अशी दुरूस्ती केली आहे.

प्रश्न क्र.७५ :

श्रीमती समीना शेख :उत्तर दिले समाधानकारक नाही.

काय.अभियंता :सातारा देवळाई मूळे मनपाचे क्षेत्र वाढले ७५ हजार लोकसंख्या पूढे ती २ लक्ष पर्यत होऊ शकते.समांतरचा करार झाला त्यात हा भाग नव्हता घ्यायचे असेल तर १५० कोटी रूपये खर्च लागेल असे प्रशासनाला कळविले.

श्रीमती समीना शेख :हे उत्तर ७६ संदर्भात आहे व्याप्तीत बदल झाला तर पाणीपुरवठा कुणी करायचा तो खुलासा करावा.

कार्य.अभियंता :व्याप्तीत बदल झाला तर ॲडीशनल काम समांतर एजन्सीला सांगू शकतो. समांतर मार्फत पाणी पुरवठा करता येईल.महापालिकेच्या वतीने समांतर काम करते. हया भागात पाणी दयायचे असेल तर वेगळे पैसे दयावे लागेल.

श्रीमती समीना शेख :१५० कोटी अतिरिक्त खर्च शासनाकडे दिले सभेपूढे सादर केले होते का?

कार्य.अभियंता-पापू :१५० कोटी अंदाजीत रक्कम आहे. पीएमसी नेमून डीपीआर होईल त्यावेळी सभागृहासमोर येईल.

प्रश्न क्र.७७ स.श्री. खान फेरोज मोईनोद्दीन

श्री.खान फेरोज :३९० कोटीस मंजूरी घेतली समांतरचे बजेट १००० कोटीपर्यत जात आहे. त्यास शासनाची मंजूरी घेतली का?

कार्य.अभियंता-पापू :२००५-०६ एमजीपीची योजना सबमीट केली. त्यांची कागदपत्रे सदस्यांना दिली आहे.त्यानंतर ही योजना पीपीपी तत्वावर ट्रान्सफर झाली ३९० कोटीची रक्कम ही सांगता ती पीपीपी मोडची आहे.

प्रश्न क्रमांक ८१

श्रीमती आशा निकाळजे:उत्तर मिळाले आहे परंतु काम जुन जुलै मध्ये पावसाळयात कसे केले.

कार्य.अभियंता-पापू :काम पुर्ण झाले नाही वरची लेव्हल बाकी आहे.दिं.७-९-१५ कामाची मुदत आहे.

श्रीमती आशा निकाळजे:८५ क्र.खुलासा दिला परंतु अशी कामे त्या भागात झाली नाही.तपशिल ३३ मध्ये जुना वार्ड क्र. ७ मध्ये रस्त्याच्या बाजूला फुटपाथ बांधणे ते काम पुर्ण केले असे म्हटले परंतु असे काम झाले नाही बील उचलले कागदावर काम झाले.वार्डात तसे काम केले नाही.

कार्य.अभियंता-पापू :५ वर्षात झालेल्या कामाची माहिती दिली. काम झाले की नाही पाहणी केली जाईल.

प्रश्न क्र. ८२ :

कार्य.अभियंता(अ/ड) :सदर पुलाचे काम मनपाने केले नाही.

श्रीमती आशा निकाळजे : प्रश्न क्र.८३ मध्ये उत्तर दिले की लागू नाही म्हणजे काय?

मा.महापौर :आताच विचारलेल्या प्रश्ना बाबत त्या भागात संबधीत अधिकारी यांनी प्रत्यक्ष जाऊन तीन दिवसात चौकशी करावी व त्याची प्रत स.सदस्या व माझेकडे सादर करावी.

प्रश्न क्र. ८६,८७,८९,९० स.श्री. खान इरशाद इब्राहीम

श्री.खान इरशाद :रहिमानीया कॉलनी हत्तेसिंगपूरा पाण्याच्या टाकीजवळील किती जागा भुसंपादीत केली उत्तर मिळाले नाही.नकाशात दाखवले की पाण्याची टाकी, प्राथमिक शाळा व हायस्कूलसाठी भुसंपादन केले.किती केली दिले नाही.प्रशासनाकडे त्याची संचिका नाही. किती जागा घेतली होती.नकाशानुसार १७७,१७८,१७९,१८० ही जागा उद्यान साठी रिझर्व आहे. पेपरवर नकाशा काढला मेजरमेंन्ट केले सर्वे न करता उत्तर दिले.चर्तुसिमा चुकीचे दाखवित आहे.टाकी उत्तर बाजूस,दक्षिण बाजूस प्रा.शाळा पश्चिम बाजूस हायस्कूल आहे परंतु मला दिशा बदलून उत्तर दिले. जागा किती भुसंपादीत केली होती माहिती दयावी.

सहा.संचालक (न.र) :एकूण ३.१७ एकर जागा भुसंपादीत केली.

श्री.खान इरशाद :३ एकर सांगतात तीन हेक्टर जागा भुसंपादन केली.

श्री.मो.अयुब जागीरदार :३ हेक्टर जागा भुसंपादीत केली होती. त्यातील अर्धी जमीन कशाच्या आधारे परत केली. आता ३.१७ एकर जमीन आहे तेथे अतिक्रमण करण्याचा प्रयत्न होत आहे. त्या जागेचे सरंक्षण करावे.

सहा.संचालक (न.र) :१९८९ मध्ये त्या जागे संदर्भात कोर्ट केस झालेली होती. आठ दिवसात त्यांना माहिती दिली जाईल.

श्री.खान इरशाद :सद्यस्थितीत असलेल्या जागेची मोजणी करावी. तेथील अतिक्रमण हटवून त्या जागेचे संरक्षण करण्या बाबत कार्यवाही करावी.

मा.महापौर :अतिक्रमण विभागास कळवून कार्यवाही करावी. या जागेचे संरक्षण करावे.

प्रश्न क्र ९० स.श्री.खान इरशाद

सहा.संचालक (न.र) :भुसंपादनासाठी पाठविले त्याबद्दल मा.उच्च न्यायालयात सुध्दा सादर केले आहे. बाकी कन्स्ट्रक्शनचा जो विषय आहे. तो दुस-या विभागाचा आहे.

श्री.खान इरशाद :मौलाना आझाद चौक किराडपूरा रोषनगेट रस्त्यावरील गरीब लोकांची घरे तोडली जुनी वसाहत होती.काही नागरीकांनी स्टे आणलेला होता. त्यांना जागा दिली ते त्यांचे साहित्य घेऊन जाण्यास तयार होते. परंतु घर बांधण्यासाठी पैसे दयावे. अशी मागणी होती. असे असतांना प्रशासकीय अधिकारी यांनी घरे तोडली. आता मा.उच्च न्यायालयाने

आदेश दिले की मार्केट रेट नुसार या लोकांना पैसे दयावे काही इमारती अदयाप काढल्या नाही. २४ मी.रस्ता पुर्ण क्लिअर नाही.

श्री.मो.अयुब जागीरदार :या रस्त्यावरील गरीबांची घरे तोडली पैसे दिले. परंतु आजही १०-१२ आरसीसी इमारती का काढल्या नाही? रस्ता खराब,मोठमोठे खड्डे पडले राम मंदीराकडे जाण्यासाठी चांगला रस्ता नाही. याकडे कुणाचे लक्ष नाही. त्या भागातील नागरीक व तरुण मुलांनी सामाजीक भावनेतून स्वतःच्या खर्चातून मुरूम, आणून खड्डे बुजवले.सर्वसामान्याची घरे तोडली श्रीमंताचे घरे तोडली नाही. १० घरे अशी आहे. ५-७ फुटापर्यत मार्कींग केली होती तोडली नाही कुणाचा दबाव होता.राममंदीर ते रोषण गेट पर्यंतच्या जागे बाबत मा.कोर्टात प्रकरण आहे.व आजच्या रेटनुसार मोबदला दयावे असे म्हटले. महापालिकेने पैसे दिले तर मध्यस्थी करून प्रकरण मिटवले जाईल.

सहा.संचालक (न.र) :संबधीत मिळकत धारकांना टीडीआर किंवा एफएसआय घ्यावा असे कळविले त्यांना रोख रक्कम पाहिजे होती. नंतर मा.उच्च न्यायालयाने आदेश दिले की सब रजिस्टर ऑफिस मधे याचे व्हॅल्युएशन काढावे ती अमाऊंट त्यांना मान्य नव्हती. आता रितसर भुसंपादनाची कार्यवाहीसाठी पाठविले आहे. मा.हायकोर्टाने असे आदेशीत केले की भुसंपादन अधिका-याकडे पाठवा ते आम्ही पाठवून दिले.

श्री.मो.अय्युब जागींरदार:आझाद चौक ते राममंदीर रस्त्यातील अधिक्रमण का काढले जात नाही.

प्रशासकीय अधिकारी :या रस्त्यावरील ७-८ इमारती आहे नगर रचना विभागाने मार्कीग करून दयावे ते काढले जाईल.

श्री.मो.अय्युब जागीरदार:आता मार्कीग करून दयावी असे सांगतात इतक्या दिवस का कार्यवाही केली नाही.

प्रशासकीय अधिकारी :याचे पहिले स्टे असूनही कार्यवाही केली आहे. ज्या इमारती राहिल्या मार्कीग झाल्यानंतर कार्यवाही केली जाईल.

श्री.सय्यद मतीन :स्टे-ऑर्डर असतांना कार्यवाही केली असे म्हटले याचा अर्थ न्याय पालिकाचे उल्लघंन केले.

श्री जमीर कादरी :स्टे असतांना कार्यवाही केली हे कसे बोलता

प्रशासकीय अधिकारी :मा.कोर्टाचे आदेश झाल्याचे माहित झाल्यानंतर काम बंद केलेले होते.

श्री. सय्यद मतीन :स्टे असतांना कार्यवाही केली हे वाक्य इतिवृत्तात यावे न्याय पालिकेचे उल्लघंन केले आहे.

श्री.जमीर कादरी :श्री.शिवाजी झनझन यांचेवर कार्यवाही झाली पाहिजे. स्टे असतांना कोणती इमारत पाडली आहे. अधिकारी जे बोलले ते इतिवृत्तांत यावे.

मा.महापौर :या रस्त्यावर १०-१२ घराचे अतिक्रमण आहे. जबाबदार अधिकारी आहे असे बोलणे योग्य नाही. मा.न्यायालयापेक्षा आपण मोठे नाही.

श्री.जमीर कादरी :स्टे असतांना घर तोडत असेल तर चुकीचे आहे. जे की स्टे असतांना कार्यवाही होते मा.कोर्टात आम्ही सादर करू हा मा.न्यायालयाचा अपमान आहे.

श्री. सय्यद मतीन :इतिवृत्तांत घेण्यात यावे. तसेच लेखी प्रत मला देण्यात यावी.

मा.महापौर :मा.न्यायालयाच्या संदर्भात चुकीचे अधिकारी यांनी बोलायला नको. चुकीन बोलले आहे. त्यांनी माफी मागीतली जे बोलले ते रेकॉर्ड मध्ये घेण्यात यावे.

या वेळी स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.नंदकुमार घोडेले :विशेष भुसंपादन अधिकारी शासनाचे मनपाकडे आहे. एकही प्रकरण त्यांनी मार्गी लावले नाही त्यांना पुढील बैठकीत बोलावे.

सहा.संचालक (न.र) :पुढील बैठकीत भुसंपादन अधिकारी यांना बोलविण्यात येईल.

प्रश्न क्र.९१,९२,९३, :स.श्रीमती सरीता अरूण बोर्डे

श्रीमती सरीता बोर्डे :उत्तर दिले समाधानकारक नाही. नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न आहे.

पशुधन पर्यवेक्षक :शहरात ६१५ गोठे आहे.

श्री.गजानन बारवाल :शहरात अनेक गोठे ते स्थलांतरीत करणेसाठी तेथे विविध सुविधा देणे आवश्यक असून नियोजन करणे गरजेचे आहे. आपल्या दालनात बैठक घ्यावी हा विषय निकाली काढावा. पदमपूरा भागात सुध्दा गोठा आहे नोटीस देऊन कार्यवाही करावी.

पशुधन वर्यवेक्षक :यासाठी चिकलठाणा येथे गट क्र २३१ ची जागा घेणे बाबत कार्यवाही चालू आहे.

श्री.फेरोज खान :माझ्या वार्डात १० गोठे यामूळे ड्रेनेज लाईन वारंवार चोकअप होते. अनेकदा पत्र देऊनही कार्यवाही होत नाही. कधी शिफ्ट करणार आहे.

मा.महापौर :या बाबत योग्य ती कार्यवाही करावी.

अति.आयुक्त :संबधीतास नोटीसा दिल्या आहे. पुन्हा नोटीसा दिल्या जातील. दुग्ध नगरी म्हणून जागा आहे. हा प्रोजेक्ट मोठा आहे तेथे कसे कार्यान्वित करता येईल.या बाबत कार्यवाही सुरू आहे.

श्रीमती सरीता बोर्डे :उस्मानपुरा येथील गोठा केंव्हा हटविणार आहे.

श्री.विकास जैन :पुर्ण शहराचा प्रश्न आहे. एका वार्डापुरते मर्यादित असू नये सर्व गोठयासाठी ठोस निर्णय घ्यावा.

श्री.जागीरदार मो.अयुब :महापालिका अस्तित्वात आले तेंव्हा पासून हा प्रश्न भेडसावतो गोठयासाठी कितींकडे परवानगी आहे कार्यवाही साठी गेल्यास पर्यायी जागा देण्याची मागणी करतात.पर्यायी जागा देण्याची तरतूद असेल तर तशी कार्यवाही करावी.

मा.महापौर :यासाठी प्लॅनींग करावे लागेल.

श्रीमती सरिता बोर्डे :उस्मानपुरा येथील गोठा केंव्हा हटविणार आहे.

पशुधन पर्यवेक्षक :एक महिण्यात कार्यवाही केली जाईल.

प्रश्न क्र. ९४ :स.स.श्री.गंगाधर ढगे

श्री.गंगाधर ढगे :उत्तर दिले त्यात २०१४ दिले मुळात २०१५ वर्ष चालू आहे सर्वसधारण सभेसाठी मी प्रश्न दिला होता स्थायी समितीचा उल्लेख आला.

मुख्य अग्निशमन अधी. :अग्निशामन विभागाची ५०९ इमारतीना एनओसी दिली ५५० अर्ज आलेले होते.

| | |
|---|---|
| श्री.गंगाधर ढगे | :सन २०१०-११ मध्ये ५४ अर्ज ५१ इमारतीना एनओसी सन ११-१२ मध्ये १२३ अर्ज ९१ एनओसी सन १२-१३ मध्ये ९३ अर्ज ७८ एनओसी १३-१४ मध्ये १५६ अर्ज व परवानगी २०२ लोकांना एनओसी दिली.अर्ज कमी एनओसी जास्त कशा दिल्या. |
| मुख्य अग्निशमन अधि. | :मागिल काही प्रकरण प्रलंबीत होते ते ॲड झालेले आहे. |
| श्री.गंगाधर ढगे | :८७ प्रकरण प्रलंबीत आहे एनओसी घेतली नाही त्या इमारती अनाधिकृत आहेत का ? |
| मुख्य अग्निशमन अधि. | :पैसे भरण्यासाठी मुदत दिली नोटीस दिल्या कार्यवाही करणार आहोत. |
| श्री.गंगाधर ढगे | :मनपा आर्थीक संकटात असतांना अशा लोकांवर कार्यवाही होत नाही अधिकारी एक दुस-यांचे नाव सांगतात. ९७ हजाराचे काम माझ्या वार्डातील एक काम होते ते झाले नाही. |
| अग्निशमन अधिकारी | :नगर रचना विभागाकडून प्रस्ताव या विभागात येतो त्यानंतर कार्यवाही करतो डायरेक्ट या विभागातून कार्यवाही होत नाही. |
| मा.उपमहापौर | :अग्निशमन व कर निर्धा. व संकलक हे दोन्ही चार्ज श्री.झनझन यांचेकडे त्यांनी कर लावतांना अग्निशमन विभागाची एनओसी घेतली की नाही हे बघायला पाहिजे. अनेक इमारतीला एनओसी नाही कर लावलेला आहे ही जबाबदारी कुणाची येते. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :या विभागाचे ऑडीट करावे. ५००० स्क्वे.फुट इमारतीस इन्स्ट्रयुमेन्ट लागते तेवढे त्या प्रकारच्या इमारतीला लागायला पाहिजे परंतु काहींना ७,तर काहींना ११ लक्षचे इन्स्ट्रयुमेन्ट लावले जाते येथे काम करणारी एजन्सी फायर विभागातील कर्मचा-याच्या लोकांच्या आहेत फायर इन्स्ट्रयुमेंन्टचे काम करणा-या शहरात किती एजन्सी मागिल वर्षी किती एजन्सीने काम केले.श्री.झनझन यांचेकडे अनेक चार्ज आहे त्यांना वेळ नाही त्यांचेकडील चार्ज उपआयुक्त दर्जाच्या अधिका-यांकडे चार्ज दयावा. |
| प्रश्न क्र. ९५ : | |
| श्री.गंगाधर ढगे | :शहरातील वाढता व्याप बघता अग्निशमन, कर निर्धारक व संकलक तसेच प्रशासकीय असे महत्वाचे विभाग एकाच अधिका-याकडे असू शकतात का ,मालमत्ता कराची वसुलीची बैठक घेतली १५ दिवसात ५० कोटी वसुली होतील असे अधिकारी यांनी म्हटले,५ कोटी वसुल झाले एकाच अधिका-याकडे एवढे चार्ज न देता वसुलीसाठी सक्षम अधिकरी नेमावे श्री. झनझन यांचेकडील चार्ज काढावा.वसुली होत नसल्याने ९७ हजाराचे काम होत नाही. |
| श्री.जहागीर खान | :१५ दिवसात ५० कोटी वसुल केले जाईल असे अधिकारी यांनी म्हटले होते किती वसुली झाली. |
| कर निर्धा. व संकलक | : १९ तारखेपर्यत २३.५२ कोटी वसुल केले |
| श्री.रेणुकादास वैद्य | :लेखा विभागास विचारणा करावी.२३ कोटी आले का ? |
| लेखाधिकारी-१ | :त्या फिगर माझेकडे आलेल्या नाही.१३ बॅकेत मनपाचे खाते आहे. |

| | |
|---|---|
| कर निर्धा.व संकलक | :एप्रिल २०१५ पासून २३.५२ कोटी वसुल झाले.डिमांड नोटीस गेलेल्या नव्हत्या त्यानंतर वसुली चालू झाली. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :१५ दिवसात ५० कोटी वसुल करतो असे वसुलीच्या बैठकीत सांगितले, का वसुली केली नाही. |
| श्री.दिलीप थोरात | :डिमांड नोटीस दिली नसतांना व्याजाची रक्कम वसुल केली जाते.डिसेंबर २०१५ पर्यंत व्याज लावू नये.डिमांड नोटीस तातडीने द्याव्यात.कर भरण्यास गेलेल्यांना व्हेरीफिकेशन करण्याचे सांगतात १५ दिवस त्या नागरीकाचे जातात.व्याज व व्हेरीफिकेशन करणे थांबवावे मागिल वर्षाचा जो टॅक्स असेल तो भरून घ्यावा. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :व्याज आकारु नये.मार्च नंतर जे भरतील त्यांना मागच्या वर्षीचे व्याज आकारावे. |
| श्री.फिरोज खान | :वसुलीचा चार्ज उपआयुक्ताकडे दयावे. |
| मा.उपमहापौर | :डिमांड नोटीस देत नाही तोपर्यत दंड आकारणी करू नये. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :वसुली संदर्भात बैठक घेतली परंतु कार्यवाही त्याप्रमाणे होत नाही.एकच घर असतांना त्या व्यक्तीला दोन टॅक्स नोटीस दिली जाते.कर भरण्यास तयार आहे परंतु ते घर मनपाने दाखवून दयावे.५० हजारच्या वरती असलेल्या मालमत्ता किती लिस्ट दिली नाही. कुणाकडे किती बाकी माहिती घ्यावी त्यानंतर वसुली जोमाने करावी. |
| श्री.भगवान घडमोडे | :श्री.चौरे नावाचे माझ्या वार्डातील व्यक्ती यांना त्यांनी कर भरल्यानंतर डिमांड नोटीस दिली २२ टक्के व्याज आकारले.वेळेच्या आत नोटीस दिली नाही आलेले व्याज तुम्ही भरा प्रशासनाची चुक असल्याचे त्यांनी म्हटले.ॲसीसमेंन्ट करतांना गाभीर्याने कुणी घेत नाही.५० टक्के मिळकतींना नोटीस दिल्या नाही.जे भरतात त्यांना सील लावणे,नोटीस देणे असे चालू आहे.एका व्यक्तीचे दुकान २०१४ पासूनचे त्यास ॲसेसमेंन्ट करायचे म्हणून २०१२ पासून टॅक्स लावला अशा चुका होतात याकडे लक्ष देण्याची गरज आहे.एकाच प्रकारचे घराला वेगवेगळे टॅक्स आकारणी होते.जेथे मीटर तेथे कर लावला पाहिजे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :२ टक्के व्याज लावू नये.अग्निशमन विभागाचे ऑडीट करावे. |
| श्री.गजानन मनगटे | :गुंठेवारी भागात ज्यांचे कडे प्रमाणपत्र नाही त्यांना दुप्पटीने टॅक्स लावतो गुंठेवारी भरलेली असतांना प्रमाणपत्र दिले जात नाही.ही जबाबदारी मनपाची असतांना नागरीकांना भुर्दंड पडतो. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :ॲसीसमेंन्ट न करता १०-१५ वर्षापुर्वीच्या घरांना डायरेक्ट ६०-७० हजार टॅक्स.माझ्या वार्डात जुन नंतर नोटीस दिली त्यांना व्याज आकारले. हे योग्य नाही. |
| कर निर्धा. व संकलक | :मागिल वर्षाच्या रक्कमेवर व्याज आहेतच परंतु चालू वर्षाच्या एप्रिल मे जून या तीन महिण्यासाठी अनुक्रमे १०,८,६ टक्के कराच्या रक्कमेत डिस्काऊट देत आहोत.जुन नंतर २ टक्के व्याज लागते. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :जे भरतात त्यांना व्याज लावतात हे बरोबर नाही. |

मा.महापौर :शहरात ३०-४० टक्के नागरीक कर भरत नाही जे भरतात त्यांनाच २ टक्क्े व्याज आकारणी होते.व्याज त्वरीत रद्य केले पाहिजे.एनओसी देतांना नगररचना विभागाने व अग्निशमन विभागाने समन्वय ठेवावा. मनपाचे उत्पन्न वाढेल.अग्निशमन विभागाचे १०० टक्के ऑडीट करावे कर आकारणी विभाग महत्वाचा आहे या विभागाचा चार्ज उपआयुक्त दर्जाच्या अधिका-याकडे देण्यात यावा.या बाबत तातडीने निर्णय घ्यावा.

श्री.विकास जैन :नवीन मालमत्ता शोधण्यासाठी आऊट सोर्सेसवर नियोजन करून कार्यवाही करावी.

श्री.जहागीर खान :२४ टक्के व्याज आकारणे रद्य करावे मुद्दल कराची रक्कम वसुल होईल.

अति.आयुक्त :टॅक्स विभागाचा चार्ज बाबत सुचना दिल्या त्यानुसार संबधीत विभागास सुचना दिल्या जातील. आऊट सोरसींगच्या बाबतीत कार्यवाही केली जाईल.

श्री.अब्दुल र.नाईकवाडी :कराची वसुली कशी केली जाते यासाठी हैद्राबाद येथे कमेटी गेलेली होती काय माहिती घेतली १९९०-९१ च्या स्लम व गुंठेवारी भागातील घरांचा टॅक्स वसुल करतात परंतु शहरातील अनेक मोठमोठया इमारती तेथील टॅक्स वसुल होत नाही.

श्री.फिरोज खान :जिन्सी डीपी रोडवर अतिक्रमण आहे. वारंवार सुचना केली कार्यवाही होत नाही.

श्री.अब्दुल र.नाईकवाडी :माझ्या वार्डात रस्त्यावर १५ फुट सेड टाकलेले आहे. ५X५ टपरी आता २४X२४ झाले. म्हाडा कॉलनीत १०X१० ची रूम आता ५०X५० चे घर केले. परवानगी नाही ड्रेनेज लाईनवर बांधकाम केले कार्यवाही करावी.

प्रशासकीय अधि. :वार्ड ४६ मधील रस्त्यावरील इमारत निरीक्षक यांनी पाहणी केली संबधीतास नोटीसा दिल्यानंतर कार्यवाही केली जाईल.

श्री.फेरोज खान :४-५ पत्र प्रशासकीय अधिकारी यांना दिले रस्त्यामध्ये ३०-३० फुट अतिक्रमण झाले. टाईम्स कॉलनी नाल्यावरील अतिक्रमणाचा ही खुलासा करावा.

श्री.अब्दुल र.नाईकवाडी :वार्ड ब अंतर्गत टपरी धारक व दुकानदारास नोटीसा दिल्या का तसेच चिश्तिया पोलीस चौकी ते बजरंग चौक पर्यत टीन उभे केले. सर्वे केला नाही.

प्रशासकीय अधिकारी :आठ दिवसात कार्यवाही होईल.

श्री.राजेंद्र जंजाळ :किती इमारतींना नोटीसा दिल्या.

प्रशासकीय अधिकारी :किती इमारत धारकांना नोटीसा दिल्या लेखी दिले जाईल.

श्री.भगवान घडमोडे :खालचे कर्मचारी काम करीत नाही.हर्सुल,पडेगाव नक्षत्रवाडी चिकलठाणा या शहराच्या बाजूला २०X३० ची प्लॉटींग सर्रास चालू आहे तेथे सुविधा देणेसाठी महापालिकेवर खर्च लागणार आहे.ते प्लॉटींग बंद करावे.

| | |
|---|---|
| मा.महापौर | :अनधिकृत प्लॉटींग होऊ नये जेणे करून महापालिकेवर सुविधा देणेसाठी खर्चाचा बोजा येतो दखल घ्यावी.आताच स.सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केले आठ दिवसात कार्यवाही करावी. |
| श्री.जहागीर खान | :औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथील नाल्याच्याजागे संदर्भात सिटी सर्वे ऑफिसला ३० लक्ष ३ वर्षापुर्वी भरणा केले त्या बाबतीत कार्य कार्यवाही केली. |
| मा.महापौर | :या बाबतची माहिती स.सदस्य यांना व माझ्याकडे सादर करावी. |
| प्रश्न क्रमांक ९९ | :स श्री. राहूल सोनवणे |
| श्री.राहुल सोनवणे | :माहिती मिळाली समाधानकारक नाही विधी सल्लागार यांनी अभिप्राय दिला होता. पुन्हा सविस्तर माहिती घ्यावी. |
| श्री.कैलास गायकवाड | :पुष्पनगरी भुखंड संदर्भात  ओ सी सिरसाट यांचे सह  चार अधिका-याची खातेनिहाय चौकशी झाली चौकशीचा अहवाल बघीतल्यानंतर मा.आयुक्त यांनी सर्वांना दोषी ठरविले एक वेतनवाढ रोखावी व दुस-या वेतनवाढीवर त्यांचा परीणाम होईल असे आदेश आयुक्तांनी दिले  चार अधिका-यावर कार्यवाही होते श्री.ओ सी सिरसाटवर याची वेतनवाढ रोखली नाही उलट त्यांना पदोन्नती दिली.मा.आयुक्तांनी जे आदेशीत केले होते ती कार्यवाही श्री.ओ.सी.सिरसाट यांचेवर होण्यासाठी आपण आदेशीत करावे. |
| उपआयुक्त (म) | :वेतनवाढ रोखावी प्रस्तावीत केले होते मा.आयुक्तांची सही नाही. |
| श्री.कैलास गायकवाड | :मा.आयुक्ताची मंजूरी का घेतली नाही प्रशासन म्हणून जबाबदारी नाही का? |
| उपआयुक्त (म) | :हे प्रकरण तत्कालीन आयुक्त श्री.भापकर साहेब यांचे कार्यकाळातील आहे संचिका माझे कडे आली नाही. |
| श्री.राजू शिंदे | :एकाच प्रकरणात ४ अधिका-यावर कार्यवाही होते श्री.सिरसाट वर होत नाही  कारण अधिका-याची बाजू घेवून ते सभागृहात उत्तर देतात कोर्टात प्रकरण आहे चर्चा करता येत नाही चुकीची माहिती सभागृहाला दयावी लागते त्यामुळे  त्यांचेवर कार्यवाही होत नाही.कोण कोण अधिकारी यांना मदत करतात.ते तपासावे. |
| उपआयुक्त (म) | :ती संचीका माझ्याकडे आली नाही कार्यवाही बंद झाली.पदोन्तीचा भाग वेगळा  ही कार्यवाही वेगळी आहे. |
| श्री. राजू शिंदे | :पाच लोक दोषी आहे चारवर कार्यवाही होते एकावर होत नाही. त्यांना उलट पदोन्नती दिली जाते हे बरोबर नाही. याचा परीणाम महापालिकेच्या इतर कामाकाजात होतो इतर अधिकारी श्री.सिरसाट कडून चुकीचे काम करून घेतात. यात मनपाचे नुकसान होत आहे. |
| उपआयुक्त (म) | :मा.आयुक्तासमोर संचिका सादर केली जाईल ठेवायला पाहिजे होती. |
| अति.आयुक्त | :पुढील आठवडयात कार्यवाही होईल. |
| श्री.राजू शिंदे | :पदोन्नतीच्या ठरावास शासनाने मान्यता दिली नसतांना श्री.ओ.सी.सिरसाट यांना पदोन्नती कशी दिली? |

| | |
|---|---|
| उपआयुक्त (म) | :समिती समोर प्रस्ताव आला समितीने मान्य केला मा.आयुक्तांनी मान्यता दिली त्यानुसार पदोन्नती दिली.शासन मान्यतेच्या अधिन राहून मंजूरी देऊ शकतो. |
| श्री.राजू शिंदे | :क वर्ग महापालिका आहे ग्रामपंचायत नाही प्रशासनाच्या मर्जीप्रमाणे काम होऊ नये. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :कमेटीने निर्णय दिले, प्रमोशन दिले नाही अशी १०० प्रकरणे असतील याच प्रकरणात का घाई झाली. |
| श्री.राजू शिंदे | :चुकीच्या लोकांना पदोन्नती दिल्यामूळे महापालिकेची एक ही प्रकरण निकाली निघत नाही उलट आपले अधिकारी कोर्टात जाण्याचा सल्ला विरोधी लोकांना देतात.विधी सल्लागार श्री.ओ सी सिरसाट यांना पदोन्नती कशी दिली ते त्या पदासाठी पात्र आहे का ती पदवी त्यांचेकडे आहे का ? |
| अति.आयुक्त | :जो प्रश्न उपस्थित केला त्या बाबतीत कार्यवाही केली जाईल. |
| श्री.राजू शिंदे | :शासनाने पदोन्नतीच्या ठरावास मंजूरी दिली नाही विधी सल्लागार यांचा आजच्या आज चार्ज काढावा.बाहेरचे वकील पॅनलवर घेतले जाते स.पदाधिकारी यांना विचारले जात नाही. |
| अति.आयुक्त | :सदर संचिका आजच मा.आयुक्ताकडे पाठविली जाईल. |
| मा.महापौर | :लगेच कार्यवाही करावी. |
| प्रश्न क्र. १०४ ते १०८ | :स.स.श्री.नंदकुमार घोडेले. |
| श्री.नंदकुमार घोडेले | :१०४ चे उत्तर मिळाले समाधानकारक नाही त्यात जायकवाडी ते नक्षत्रवाडी मुख्य जलवाहिनी म.जी.प्रा.कडून १-४-८८ रोजी हस्तांतर केली त्यात यंत्रसामुग्री ,स्थावर मालमत्ता कर्मचारी अधिकारी हे वर्ग करून घेण्यात आले निवासस्थान संबधाने मालमत्ता विषयी माहिती दिली इतर स्थावर मालमत्ता हस्तातरीत केली ते दिले नाही.वेंदातनगर मधील पाण्याच्या टाकीला लागून जेथे म.जी.प्रा. कार्यालय आहे ती जागा सुध्दा हस्तांतरीत केली होती नागेश्वरवाडीतील गोडाऊन,एन ५ ची निवासस्थाने कांचनवाडी येथील चार जागा हस्तांतरीत झाली तो खुलासा केला नाही. हया मालमत्ता ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न करीत असतांना सकारात्मक कार्यवाही होत नाही.आपली मालमत्ता तो विभाग वापरतो हे सारासार चुकीचे आहे. |
| कार्य.अभियंता-(पापू) | :त्यावेळचे हस्तांतरण केल्याची मुळ टिप्पणी प्रत दिली आहे.त्यात उल्लेख आहे की सर्व हायड्रोलिक बांधकामे त्या बांधकामानी व्यापलेली भुमी मनपास हस्तांतर करण्यात येतील तसे या भुमीच्या जागेवर बांधकामे उदा नक्षत्रवाडी येथील जलकुंभाजवळील विश्रामगृह, योजनेवरील साहित्य, फारोळा येथील जलशुध्दी केंद्रावरील निवासस्थाने ई.हस्तांतर करण्यात येईल व कामगार वर्ग हे यात आहे.या व्यतिरिक्त जमीन किंवा मालमत्तेचा उल्लेख नाही. |
| श्री.नंदकुमार घोडेले | :सन २०११ मधे महापौर दालनात बैठक झाली होती त्यावेळी म. जि.प्रा. अधिकारी यांनी म्हटले की ही जागा मनपाची आहे साहित्य |

काढून जागा रिकामी करून देतो. त्यांची संचिका व पत्रव्यवहाराचे पत्र असेल,करोडो रूपयांच्या जागा त्यांना सोडून देणार का? या बाबत तातडीने कार्यवाही करावी.

श्री.विकास जैन :वेदांतनगर येथील लेआऊट काही परपजसाठी रिझर्व होता त्या होल्डरने काही प्लॉट मनपास चांगल्या परपजसाठी दिले. एमजीपीला गोडाऊनसाठी दिले तेथे त्यांनी कार्यालय केले. त्यांना लिजवर दिले नाही ते भाडे देत नाही ते लोक दादागिरी करतात, जात नाही अशी उत्तरे देतात आजच्या आज सील करावे. त्या विभागाचे मिलींद कॉलेजकडे मोठे कार्यालय आहे तेथे त्यांनी शिफ्ट व्हावे मनपाकडून काही रक्कम घ्यायची त्यानंतर शिफ्ट होऊ असे सांगतात.

श्री.नंदकुमार घोडेले :आपल्या दालनात बैठक लावावी संबधीत अधिकारी यांना बोलवून घेवून त्या जागा मनपाकडे घेण्यात याव्यात.

मा.महापौर :जागा पाहणी करून उदयाच जागा ताब्यात घेणे बाबत कार्यवाही करावी.

प्रश्न क्र.१०५ :

श्री.नंदकुमार घोडेले :निवासस्थान संदर्भात प्रश्न दिला होता जेथे वर्ग -२ चे कर्मचा-या ऐवजी वर्ग-३ चे कर्मचा-यांना दिले काही ठिकाणी अनधिकृत वापर तर निवृत्त झाल्यानंतर काहीच्या ते ताब्यात यात जेष्ठता व सिक्वेन्सी ठरवायला पाहिजे.

उपआयुक्त (मा.म) :१६३ निवासस्थाने आहे.सर्वे केला आहे वर्ग ४ चे कर्मचारी वर्ग-२ च्या निवासस्थानात आहे चार निवासस्थाने रिक्त आहे आठ दिवसात बैठक लावून ते वाटप करायचे आहे.

श्री.फेरोज खान :शहागंज टाकी येथील निवासस्थान मध्ये इलिगल काही लोक राहत आहे.

मा.महापौर :मालमत्ता अधिकारी यांनी तातडीने कार्यवाही करावी.

श्री.गजानन बारवाल :फारोळा येथील कर्मचारी मयत झाल्यानंतर त्याचे निवासस्थानाचे २००० रू. भाडे असतांना ३.५० लक्षची नोटीस देण्यात आली या बाबत सुध्दा योग्य कार्यवाही करावी.

प्रश्न क्र.१०६

श्री.नंदकुमार घोडेले :सेल ॲड कंपनीकडे ५२.४१ लक्ष बाकी मागणी केली. पैसे भरले नाही. कंपनीने कोर्ट प्रकरण केले. मा.उच्च न्यायालयाकडून काही निर्देश नसतांना वसुली का थांबली. अकोला प्रवासी संघटना यांचेकडे ५० लक्ष बाकी या बाबत कायदेशीर कायर्वाही काय केली.

उपआयुक्त(मालमत्ता) :अकोला प्रवासी संघटना कडे ७० लक्ष येणे बाकी आहे ती संचिका आणली नोटीस काढून त्याची जंगम मालमत्ता आहे का? चौकशी करून त्या बाबत मा.आयुक्त आल्यानंतर ते पैसे वसुल करण्याची कार्यवाही केली जाईल.सेल ॲडस संदर्भात संचिका विधी विभागाककडे पाठविली त्यावर ओपनीयन आल्यानंतर लगेच कार्यवाही होईल.

श्री.भगवान घडमोडे :संचिका ५ वर्ष कुणी थांबवून ठेवली त्यांचेवर कार्यवाही करावी.

अति.आयुक्त :जाणून बूजून कुणी संचिका थांबून ठेवली असेल तर कार्यवाही होईल.

प्रश्न क्रमांक १०८ :

श्री नंदकुमार घोडेले :होर्डींग्ज व आठवडी बाजाराच्या संदर्भात प्रश्न आहे. होर्डींग्जचा सर्वेसाठी मा.आयुक्तांनी मान्यता दिली आहे.आता प्रभावी धोरण राबविले जावे आठवडी बाजाराचे जुने दर आहे. रेडीरेकनरनुसार नवीन दर आकारावे. मनपाचे उत्पन्न वाढेल.

मा.महापौर :पार्कींग, होर्डीग्ज, आठवडी बाजारसाठी जुने दर आहे नवीन दराने कार्यवाही करावी.

प्रश्न क्र.१११ :

श्री.भगवान घडमोडे :मला उत्तर समाधानकारक मिळाले नाही. त्रोटक माहिती दिली बोध होत नाही.बीओटीचे किती प्रोजेक्ट चालू,उत्पन्न किती हे प्राजेक्ट का बारगळले,उत्पन्न बुडाले का याची आपण बैठक घेवून माहिती घेतली होती.ज्योतीनगर येथील काम पुर्ण झाले पुढे काय कार्यवाही केली दिले नाही.ज्योतीनगर तलावाच्या बाबतीत काय कार्यवाही झाली माहिती घ्यावी.

कक्ष प्रमुख-बीओटी :या प्रकरणात जी कार्यवाही करायची होती ती केली आहे पोलीस केस एफआयआर दाखल झालेला आहे पुढील कार्यवाही पोलीस करतील.

श्री.भगवान घडमोडे :हा प्रकल्प कोण चालवणार आहे.

मा.महापौर :महापालिकेला चालवावे लागेल.

प्रश्न क्र.११२ :

श्री.भगवान घडमोडे :कामाची मुदत व काम पुर्ण झाल्याचे सांगितले. मनपाच्या हिस्साची जागेचा वापर काय आहे माहिती दिली नाही.

कक्ष प्रमुख बीओटी :रेल्वेटेशन येथील बीओटी प्रकल्प च्या शॉपींग कॉम्प्लेक्स च्या मागे महापालिका कंपाऊड ५६०० स्क्वे.मी आहे. त्यांचे टेंडर कॉल केले.पैसे भरण्यात आले वापर सुरू होणार आहे

श्री.भगवान घडमोडे :इनक्रुजमेंट की परंपरागत त्या लोकांना जागा दिल्या अतिरिक्त बांधकाम झाले का ?

बीओटी-कक्ष प्रमुख :इनक्रुजमेंट केंव्हा झाले होते. ती माहिती माझ्याकडे नाही

श्री.भगवान घडमोडे :अतिरिक्त बांधकाम झाले चौकशी करावी

अति.आयुक्त :बोओटी प्रकल्पाच्या ठिकाणी प्रत्यक्ष बीओटी प्रमुख यांचे उपस्थितीत पाहणी करून आठ दिवसात कार्यवाही केली जाईल.

मा.महापौर :जास्तीचे बांधकाम असेल तर चौकशी करावी.लेखी माहिती सादर करावी.

श्री.भगवान घडमोडे :परवानगी व भोगवटा यात फरक आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :जे प्रोजेक्ट पूूर्ण नाही चेजेंस करण्यात आले त्याची परवानगी फाईल नगररचना विभागाकडे सादर करण्याचे आपण एका बैठकीत आदेशीत केले होते.भोगवटा प्रमाणपत्रासाठी बीओटीची एकही संचिका अदयाप आलेली नाही.प्रोजेक्ट मधे चेजेंस केले परवानगी न घेता केले. मनपाचा

महसूल वाढला असता संचिका दाखल करण्यासाठी भाग पाडले पाहिजे ही जबाबदारी कुणावर टाकणार आहे.

श्री.गजानन बारवाल :रेल्वे स्टेशनच्या प्रोजेक्ट मधील जागेत झोन ड कार्यालय करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :ड कार्यालय या इमारतीमध्ये शिप्ट करावे.

श्री.राजगौरव वानखेडे :बीओटी प्रकल्पासाठी सिडकोची एनओसी घेतली होती का ॲमेनिटीज म्हणजे काय त्यात काय येते. टाऊन सेंटरचा भुखंड सिडकोने कशासाठी आरक्षीत ठेवला होता

बीओटी कक्ष प्रमुख :टाऊन सेंन्टर येथील जागेवर स्पोर्ट कॉम्प्लेक्स करण्यात आले तेथे सिडकोची एनओसी घेण्यात आली.

श्री.राजगौरव वानखेडे :सिडकोला मी पत्र देवून माहिती घेतली या प्रकल्पास एनओसी घेतली नाही असे मला कळविलेले आहे. कमर्शियल वापर तेथे होतो. आरक्षीत जागेवर व्यापारी संकुल करता येते का ?

बीओटी कक्ष प्रमुख :डीसी रूल मध्ये अनुज्ञेय आहे ते अलाऊड आहे. स्पोर्टचे परपज त्यात आले आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :तलाव किती आहे व्यापारी संकुल किती आहे स.पदाधिकारी यांनी पाहणी करावी.जलतरण तलाव व व्यापारी संकुलचे बांधकाम होत आहे.भुखंडाची मालकी कुणाची आहे.

बीओटी कक्ष प्रमुख :सिडकोने हॅडवर्क केलेला आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :येथे व्यापारी संकुल होत आहे बांधकाम परवानगीला सुध्दा सिडकोची एनओसी लागते ती आहे का ?

बीओटी कक्ष प्रमुख :सिडकोची एनओसी नाही.महापालिका ओनर आहे २००६ हस्तांतर झाली आहे.

सहा.संचालक(न र ) :२००६ ला सिडकोने हा भुखंड हस्तांतरीत केला त्यावर काही करायचे असेल तर सिडकोची एनओसी लागते.

बीओटी -कक्ष प्रमुख :बांधकाम संचिका रितसर नगररचना विभागाकडे पाठविले आहे.

मा.महापौर :नगररचनाकडे संचिका पाठविली म्हणजे परवानगी मिळाली असा अर्थ होत नाही.

श्री.नितीन चित्ते :सिडको भागात घर बांधण्यासाठी सिडकोची एनओसी घ्यावी लागते बीओटीच्या प्रकरणात तसे का वाटले नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :प्रकल्प सुरू करणेस व बांधकाम करतांना अशा दोन एनओसी लागतात.

बीओटी कक्ष प्रमुख :रितसर संचिका टी पी विभागाकडे पाठविली.

श्री.राजगौरव वानखेडे :याचा अर्थ तेथील बांधकाम इलिगल आहे आताच पाडण्याचे आदेशीत करावे.

श्री.नितीन चित्ते :चार मजली इमारत का बांधली.स्पोर्ट कॉम्प्लेक्सला परवानगी आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :जनतेच्या पैसातून हे करीत आहोत.नियमाने करायला पाहिजे.

श्री.नितीन चित्ते :कमर्शिलयचा वापर होतो तेथे हॉटेल चालू आहे.

बीओटी -कक्ष प्रमुख :स्पोर्ट कॉम्प्लेक्स आहे. हॉटेल वगैरे हे अगोदरपासून चालू आहे.

| | |
|---|---|
| श्री.नितीन चित्ते | :राकाज्चा करार १६-१०-०९ ला झाला व हा करार ९-७-१२ ला केला यात सुधार ही केली की अधिकारी यात फसणार नाही.तेथे कमर्शियल ॲक्टीव्हिटीज चालतात व्हिजीट दयावी.स्वीमींग टॅकची परवानगी असतांना चार मजली इमारत का बांधली.फायर एनओसी घेतली का ? |
| बीओटी प्रमुख | :फायर एनओसी घेतली नाही. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :फायरची, बांधकामाची, सिडकोची एनओसी नाही तरी बांधकाम होते.सवेरा पार्कला परवानगी दिली असतांना ते पाडायला जाता आता हे बांधकाम पाडणार का ? |
| मा.उपमहापौर | :सिडकोची मिळकत एखादयाला विकायची रजिस्टर्ड करून दयायची असेल तर सिडकोची एनओसी लागते का, बीओटीवर हा प्रकल्प दिला ज्यांना दिला व ज्यांनी करार करून दिला त्यास सिडकोची एनओसी लागते का ? |
| सहा.संचालक न र | :सिडकोची एनओसी लागेल. |
| मा.उपमहापौर | :सिडकोची एनओसी नसल्याने काहीचे प्लॅन मंजूर केले नाही.या प्रकरणात मंजूरी नसतांना काम कसे केले. |
| बीओटी -कक्ष प्रमुख | :हे बीओटी ॲग्रीमेंन्ट आहे मनपा त्यास डेव्हलप करीत आहे.मा.आयुक्तांची परवानगी घेवून ॲग्रीमेंन्ट केले आहे. |
| मा.उपमहापौर | :या जागेच्या संदर्भात रजिस्टर्ड डाक्युमेन्ट केलेले नाही. बीओटीचा करारनामा कसा केला. |
| बीओटी कक्ष प्रमुख | :सिडकोनी जागा हस्तांतर केली आहे एनओसी आहे.त्यानंतर कार्यवाही केली. |
| उपमहापौर | :सिडकोची मालमत्ता ही फ्रि होल्ड की लिज होल्ड आहे.लिजवर असेल तर बीओटीवर करतांना एनओसी लागणार की नाही.अधिका-याची बैठक घेतली तेंव्हा आठ दिवसात माहिती दिली जाईल असे म्हटले होते.दिली नाही. |
| बीओटी प्रमुख | :लिजवर ही मालमत्ता आहे. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :आरक्षण कशासाठी आहे आरक्षणा व्यतिरिक्त बांधकाम केले तर करार रद्य करण्यात येईल असे सिडकोने स्पष्ट म्हटले आहे. |
| बीओटी कक्ष प्रमुख | :जलतरण तलावसाठी आरक्षीत आहे. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :स्पोर्ट कॉम्प्लेक्ससाठी आरक्षीत आहे तेथे कमर्शियल केले तर केलेला करार सिडको विंखडीत करू शकते. |
| बीओटी कक्ष प्रमुख | :कमर्शियल वापर केला तर रद्य होऊ शकते तेथे ॲमेनिटी करीत आहोत. |
| श्री.भगवान घडमोडे | :२००६ पासून १० प्रकल्प राबवतो त्यात पाच अपुर्ण आहे पाच मध्येही त्रुटी आहे उत्पन्न मिळावे व समाजाला सुविधा मिळाव्या हा हेतू त्यामागे होता. करारनामा सुध्दा थोडक्यात केला विकासक व मनपात वाद झाल्यास समन्वयाने सोडवावा असे म्हटले व विकासकास कुणी नेमावायचे असेल तर फिस विकासकाने दयावी. असे होत असेल तर तो व्यक्ती त्याचा फायदा बघेल विकासक फिस भरेल. एकीकडे |

विकासकाची समन्वयाची बाजू मांडता काही प्रकरण कोर्टात गेले तर आयुक्तांचे अधिकार असेल तर ते सुध्दा मा.कोर्टात मांडले पाहिजे.ते कुणी सांगत नाही. बीओटी धारकांना परस्पर मार्केटमध्ये बॉण्ड करण्याची परवानगी दिली परताव्याची हमी महापालिका घेते.त्या विकासकाने मार्केट मधून पैसे उभे करावे व त्याची हमी मनपा घेते.परस्पर विकासकाने विक्री केले.मनपाची परवानगी घेतली नाही मोक्याच्या जागा अडकल्या उत्पन्न किती कर्मचारी किती खर्च किती होतो याचा लेखाजोखा झाला पाहिजे.याची जबाबदारी निश्चित करावी या प्रकल्पाची चौकशी करावी.कोण दोषी त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.राजगौरव वानखेडे :शहानुरवाडी आठवडी बाजारच्या जागेत ५० ट्रॅव्हल्स बस उभ्या राहतात ३०० रू. पर डे शुल्क एका गाडीचे वसुल होत आहे ४.५० लक्ष महिण्याचे उत्पन्न होते ते विकासक पैसा घेतो.मनपास येत नाही चौकशी करावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :बीओटी प्रकल्प नियमानुसार चालू नाही.सिध्दार्थ उदयान बाजूचे जागेचे पीआर कार्ड मनपाच्या नावावर नाही.श्रीहरी पॅरेलियन शहानुरीवाडी जागेचे पीआर कार्ड नाही असे असतांना बांधकाम कसे केले.एखादयाची जागा त्याचे पीआर कार्ड नाही तर बांधकाम परवानगी देऊ शकता का?

सहा.संचालक(न.र) :बांधकामासाठी पीआर कार्ड गरजेचे .सिध्दार्थ उदयानची जागा सरकारी आहे मनपास हस्तांतर केली म्हणून बांधकाम परवानगी दिली.

बीओटी -कक्ष प्रमुख :शहानुरवाडी येथील जागेवर तात्पुरती बांधकामास परवानगी आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :विकासकास नाल्याची जागा दिली कशी?

बीओटी कक्ष प्रमुख :नाला नाही ५०८८१ स्क्वे.मीटर जागा होती. त्यामध्ये ६४०० स्क्वे.मीटरला मान्यता दिली.

श्री.राजेंद्र जंजाळ :एक लक्ष स्क्वे.फुट जागा नाल्याची विकासकाला दिली करारनाम्यात आहे.

बीओटी-कक्ष प्रमुख :अकरा हजार स्क्वे.मीटर जागा ही नाल्याच्या बाजूची आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :बैठक घेतली होती बीओटी प्रमुखानी कार्यवाही केली नाही.५० रू पेक्षा जास्त चार्ज केला जाणार नाही १५०-२०० चार्ज केला जातो.बीओटीच्या माध्यमातून जागा अडकून पडल्या उत्पन्न नाही.१ महिण्याची मुदत देण्याचे सांगितले होते.नोटीस देऊन कार्यवाही करायला पाहिजे होती मुदतीत काम केले नाही तर जागा ताब्यात घेऊन विकसीत करेल मनपाच्या उत्पन्नात भर पडेल.या प्रकरणात कॅव्हेट दाखल करावे कोर्ट प्रकरण होणार नाही लिगली नोटीस दया महापालिकने ताब्यात घेवून काम केले पाहिजे.

श्री.राजेंद्र जंजाळ :श्रीहरी पॅव्हेलियन कडून किती रक्कम येणे बाकी आहे.

बीओटी कक्ष प्रमुख :३० लक्ष येणे बाकी आहे.दोन वर्ष झाले.मार्च पर्यत ३० लक्ष येणे आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :कालांतराने हे प्रकल्प मनपाच्या ताब्यात येणार हे प्रकल्प वापरण्या जोगे असले पाहिजे. शहानुरवाडी येथील बीओटीच्या जागेवर मोठया प्रमाणात गाडया उभ्या असतात. तेथे युरोपीयन मार्केट व्हावे भाजी

विक्रेते, कपडा मार्केट, मसाला मार्केट व्हावे असे ठरले. पार्कींगची जागा नाही. त्या भाजी विक्रेत्याकडून आज लूट होते प्रत्येक ओटयासाठी ५० रू. पेक्षा जास्त रक्कम घेणार नाही असे असतांना कुणीही तेथे लक्ष देत नाही.राकाजने जशी बदनामी केली तशीच या बीओटी प्रकल्पाची बदनामी होऊन मनपाकडे येत असेल तर योग्य नाही. या प्रकल्पाची माहिती घ्यावी. नियमानुसार होत नसेल तर करारनामा रद्य केला पाहिजे साधी नोटीस सुध्दा त्या विकासकास दिली जात नाही.उत्पन्न वाढण्याच्या दृष्टीने मनपाने योग्य पावले उचलावी.

श्री.नंदकुमार घोडेले :ज्योतीनगर असेल व इतर बीओटी प्रकल्पातून उत्पन्न वाढेल व नागरीकांना सुविधा मिळेल, चांगले व लवकर व्हावे ही भावना होती. यात त्रुटी असेल तर बैठक घेवून दूर कराव्या. बीओटी धारकाकडून चुका झाल्या असेल तर एक संधी देऊन कार्यवाही करावी व मनपाचे उत्पन्न वाढवावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :शहानुरवाडी व इतर २-३ प्रोजेक्टमध्ये,पीआर कार्ड नसतांना ,बांधकाम परवानगी दिले यात काय दुरूस्त्या करता येईल ते पहावे कॅनाट प्लेट व इतर २-३ प्रोजेक्ट प्रलंबीत आहे. त्याचे चौकशी समिती नेमून कार्यवाही करावी.

सहा.संचालक(न.र) :नियमानुसार बसत असेल तर सवलत देता येईल.

श्री.नंदकुमार घोडेले :शहानुरवाडी येथील जागेबध्दल मालकी हक्काचा वाद न्यायालयात होता नुकताच मनपाच्या बाजूने निकाल लागला त्या बाबतही कार्यवाही करावी.संबधीताने इन्व्हेसमेन्ट केले ती प्रॉपर्टी मनपाची होणार याचाही विचार व्हावा.

मा.महापौर :सर्व बीओटीच्या प्रकरणात नियमा व्यतिरिक्त काम होत असेल तर चौकशी करावी कार्यवाही करावी.

श्री.राजू शिंदे :जे प्रकल्प अपुर्ण आहे ते पुर्ण करून घ्यावे संबधीतावर दंडात्मक कार्यवाही करावी मनपाच्या बाजुने करारनामा करावा.मनपाचे हित बघावे.

अति.आयुक्त :जागेचे टायटल क्लिअर व प्लॅन मंजूर पाहिजे तरच बीओटीवर दिले पाहिजे. दीड दोन वर्षाचा कालावधी असावा कमेटी नेमली जाईल परंतु जास्त मेजर चुका झाल्या असेल तर सुट देऊन चालणार नाही लिमिट मध्ये असेल तर दुरूस्ती करू शकतो उत्पन्न वाढू शकतो

मा.महापौर :बीओटीच्या प्रकल्पासाठी ज्या परवानग्या घ्यायच्या त्या कशा घेता येईल? उत्पन्न कसे वाढविता येईल? हे पहावे चुकीचे झाले असेल तर कुणासही पाठीशी घालू नये बीओटीचे किती रक्कम येणे आह? स.पदाधिकारी यांना माहिती दयावी. बांधकाम व फायरची एनओसी का घेतली नाही? चौकशी करावी. नियमानुसार कार्यवाही करावी.

श्री.विकास जैन :बीओटीतून महापालिकेला मिळालेला हॉल वर्षानुवर्ष पडून अशा वास्तू वापरात याव्यात.

मा.महापौर :७५-२५ नुसार जे शॉप हॉल जागा मनपास मिळाल्या ते समांतर इतर प्रोजेक्टसाठी भाडयाने दयावे उत्पन्न वाढेल.

प्रश्न क्रमांक ११३,११४,११५:स.सदस्य श्री. विजय औताडे

श्री.विजय औताडे :उत्तर समाधानकारक मिळाले नाही हर्सुल सर्वे न २१० सवेरा पार्क ९ एकर जमिनीचा ले आऊटला केंव्हा मंजूरी दिली प्रश्न दिला होता माहिती दयावी.

सहा.संचालक(न.र) :दिनांक १९-९-२०११ ला या ले-आऊटला मंजूरी दिली. मुंबई उच्च न्यायालयामध्ये मुंबई येथील जेल च्या संदर्भाने एक केस झाली होती त्या अनुषंगाने मा.न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अधिन राहून शासनाने म.प्रा.व न.र.अधिनियम १९६६ चे कलम १५४ प्रमाणे शासनाने ४-१२-२०१३ रोजी डायरेक्शन दिले होते की जेलपासून ठराविक अंतरावर ले-आऊट मंजूर बाधकाम परवानगी दयावी. हा ले-आऊट त्यापुर्वी मंजूर केलेला होता.

श्री.विजय औताडे :१९६४ चे नियमानुसार १८२ मीटर पर्यंत बांधकाम परवानगी देता येत नव्हती तरी ही २०११ हा ले-आऊट मंजूर केला. शासनाचा जीआर आला की, मा.जिल्हाधिकारी, कारागृह अधिक्षक व मनपा आयुक्त यांचे सल्लागार समितीच्या मान्यते शिवाय बांधकाम परवानगी देऊ नये ४ डिसेंबर-२०१३ शासनाचा जीआर येतो.तरी परवानगी का दिली.

सहा.संचालक(न.र) :शासनाचे डायरेक्शन दिनांक १६-३-२०१५ रोजी नगररचना विभागास प्राप्त झाले.

श्री.विजय औताडे :इतका उशीर जीआर प्राप्त होण्यास लागत नाही. शासनाचा जीआर त्याच दिवशी सर्व विभागांना फॅक्स द्वारे दिला जातो. चुकीची माहिती देऊ नये हर्सुल जेल विभागाकडून २२ पत्र दिले की परवानगी देऊ नये तरी परवानगी देत गेलो. यास कोण जबाबदार ज्यांना परवानगी दिली त्यांना दिशाभूल करून घरे बांधली असे सांगता हे योग्य नाही यास कोण जबाबदार आहे व त्या लोकांचे नुकसान कोण देणार हा खुलासा अपेक्षीत आहे.

सहा.संचालक(न.र) :ज्यांना नोटीस दिल्या ते लोक मा.कोर्टात गेले न्यायप्रविष्ट प्रकरण आहे.

श्री.विजय औताडे :येथे परवानग्या जाणूनबूजून दिल्या का ? लेआऊट मंजूर होत असतांना मा.जिल्हाधिकारी यांना पत्र दिले की ही इनामी जमीन आहे. त्या अधारे परवानगी घेतली नाही.

सहा.संचालक (न.र.) :जिल्हाधिकारी यांनी एन ए ला मंजूरी दिली त्यानुसार महापालिकेने मंजूरी दिली.

श्री.विजय औताडे :जेल विभागाने २२ पत्र मनपास दिले तेंव्हा जीआरची प्रत जोडली होती तरीही परवानगी दिली.

श्री.राजगौरव वानखेडे :अधिकृत पाडतो बीओटीचे काम अनधिकृत त्यास पाठीशी घालतो हे बरोबर नाही.परवानगी कुणी दिली.

श्री.विजय औताडे :महापालिका जबाबदार की अधिकारी व ज्यांचे नुकसान होते त्याची भरपाई कोण देणार? हा खुलासा करावा.

मा.महापौर :या संदर्भात कमेटी करून ८-१० दिवसात योग्य तो निर्णय घेवून कार्यवाही करावी.

श्री.जंजाळ राजेंद्र :लेआऊट मंजूर करतांना त्या अधिका-याचे नातेवाईकाचे प्लॉट त्यात आहे. चौकशी करणार होते केली नाही.

श्री.नंदकुमार घोडेले :नगररचनातील परवानगी देणारे अधिकारी सेवानिवृत्त झाले पुनर्वसन करायचे असेल तर विचार करावा.

श्री.नितीन चित्ते :वसीम नावाचे अधिकारी यांचे मुलाचे नावे ३ प्लॉट त्यांची बाजारभाव किंमत ९० लक्ष होते.

श्री.राजू शिंदे :ज्यांनी घरे बांधली त्याची चुक नाही. जे कुणी सेवा निवृत्त झाले तरी चुक केली असेल तर कार्यवाही करता येते.

श्री.भगवान घडमोडे :जेल विभागाने पत्र दिले तेंव्हा सोबत शासनाचा जीआर दिला होता. तरी परवानगी दिली. जे अधिकारी यात दोषी असेल, सेवा निवृत्त झाले असेल, तरी कार्यवाही करावी. जेवढ्या इमारतींमुळे बाधा निर्माण होऊ शकते, त्या बाबतीतच कार्यवाही करण्याचा विचार करावा. बाकीचे राहू दयावे.

श्री.रेणुकादास वैद्य :परवानगी देतांना जे दोषी असेल कार्यवाही करावी. मा.कोर्टाने निर्णय दिला असला तरी मुंबईची व येथील परीस्थिती वेगवेगळी या नागरीकांची चुक नाही. नगर विकास विभागास तसे कळविले तर, प्रस्ताव शासनास सादर केला, तर या लोकांचे पुर्नवसन करण्याची गरज नाही. या संदर्भात स.पदाधिकारी यांनी शासनास प्रत्यक्ष भेटून पुनर्वसन न करता या लोकांना तेथे राहता आले पाहिजे असे प्रयत्न करावे.जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही व्हावी एक सक्षम अधिकारी नेमावे.गरीबावर अन्याय होणार नाही दखल घ्यावी.

श्री.अ.रहीम नाईकवाडी :हर्सुल जेलच्या जवळच क्वॉर्टर व इमारती झाल्या परवानगी दिली का?

अति.आयुक्त :जुन्या इमारतीला वारसा लाभलेला आहे त्यासाठी जुनेच रूल्स आहे मनपाचा विभाग यासाठी दक्ष असायला पाहिजे. ज्याचुका झाल्या, त्याची चौकशी केली जाईल. या लोकांचे पुर्नवसन करणे याचा मोठया प्रमाणात परीणाम होत असेल तर शासनाकडे दाद मागण्यास हरकत नाही.

श्री.विजय औताडे :यात कोण दोषी आहे. त्यांचेवर कार्यवाही करावी.

अति.आयुक्त :या बाबतीत चौकशी ताबडतोब करून कार्यवाही होईल आठ दिवसात अहवाल सादर करण्यात येईल.

प्रश्न क्रमांक ११५

श्री.विजय औताडे :आरोग्य विभागात रिक्त पदे बाबत प्रश्न होता. ५६ पदे रिक्त आहे व काही कर्मचारी यांना ८-१० महिन्यापासून पेमेंन्ट नाही. ८-१० ठिकाणी आरोग्य केंद्र असावे. रिक्त पदे भरावी.

श्री.राजू शिंदे :मिसारवाडी, नारेगाव, जाधववाडी भागात ५०-६० हजार लोकसंख्या असतांना आरोग्य केंद्र नाही.मनपाची ओपनस्पेस किंवा एमआयडीकडून

यासाठी जागा घेवू शकतो स्लम भाग जेथे दलित समाज व गरीब लोक राहतात अशा भागात मनपाचे आरोग्य केंद्र असावे तसे शासनाकडे कळवून मंजूरी घेतली पाहिजे.

श्रीमती संगिता वाघुले :मिसारवाडी ब्रीजवाडी भागात आरोग्य केंद्र करावे.तेथे सर्वे करावा.

श्री.रेणुकादास वैद्य :नॅशनल हेल्प मिशन मार्फत मोठा फंड मिळण्याची शक्यता आहे. जेथे जागा तेथे आरोग्य केंद्र करावे.

श्री.राजगौरव वानखेडे :आरोग्य केंद्रासाठी माझ्या वार्डात सिडकोचे जागेचे आरक्षण आहे. तेथे आरोग्य केंद्र करावे.

श्री.राजू शिंदे :ज्यास मान्यता आली ते थांबवावे व मी सुचविलेल्या भागात आरोग्य केंद्र करावे.

श्री.अब्दुल र.नाईकवाडी:जे आहे तेथे सुविधा दयाव्यात.एका आरोग्य केंद्राच्या खालच्या भागात ड्रेनेजचे पाणी तुबंले, सर्वे करावा.

आरोग्य अधिकारी :२.५० लक्ष लोकसंख्येसाठी १ हॉस्पीटल व ५० हजार लोकसंख्येमागे एक आरोग्य केंद्र असावे. नियमाने आहे.

श्री.विजय औताडे :५६ जागा रिक्त आहे १० वैद्य.अधिका-याच्या जागा रिक्त भरल्या जात नाही. शहरातील नागरीकांना आरोग्य सेवा तातडीने मिळाव्यात आरोग्य धोक्यात येऊ नये. दखल घेणे आवश्यक आहे.

श्री.राजू शिंदे :नारेगावला कचरा डेपो तेथील लोक नियमीत आजारी पडतात. या भागात आरोग्य केंद्र करावे.

मा.महापौर :स.सदस्यांची सुचना विचारात घेवून व जेथे आवश्यक तेथे आरोग्य केंद्र करावे.

श्री.संगिता वाघुले :सर्वे करावा ओपनस्पेसच्या जागा आहे की नाही, तेही कळेल.

श्री.अ.नाईकवाडी :आरेफ कॉलनी, वाड-१९ मध्ये ७० लक्षचे हॉस्पीटलसाठी जागा आरक्षीत तेथे हॉस्पीटल का होत नाही.

आरोग्य अधिकारी :आठ आरोग्य केंद्र मंजूर त्यात पवननगर, गांधीनगर व राजनगर पडेगाव,विजयनगर,काबरानगर,शिवाजीनगर,जयभवानीनगर, आहे.

श्री.राजू शिंदे :जेथे हॉस्पीटल तेथेच मंजूर केले. नारेगाव ब्रीजवाडी मिसारवाडी भागात महापालिकेचे दवाखाने असावे.

श्री.अब्दुल मं.नाविद :राहूलनगर, सादातनगर हा स्लम भाग येथे आरोग्य केंद्राची आवश्यकता आहे. यापुर्वी ही मागणी केली कार्यवाही होत नाही.

मा.महापौर :प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी जेथे आवश्यक आहे तेथे आरोग्य केद्र करावे.

प्रश्न क्रमांक ११६ श्री.अजीम अहेमद अब्दुल रफीक अहेमद

श्री.अजीम अहेमद :कडा किंवा GMIDC कडे सन २०१० पासून ते सन २०१४ पर्यंत जायकवाडी धरणात किती टी.एम.सी. पाणी आरक्षीत करण्याकरीता अर्ज दिले. माहिती विचारली होती.

कार्य.अभियंता(पापु) :जायकवाडी येथे ५६,१०० एमएलडीचे पंप आहे. पाणी उचलण्याची क्षमता तेवढीच आहे. आरक्षीत वाढीव पाणी उचलण्यासाठी समांतर जलवाहिनी झाल्यानंतर घेता येईल.

| | |
|---|---|
| श्री.अजीम अहेमद | :एक तासात व एक दिवसाला किती पाणी पंपींग होते. |
| कार्य.अभियंता (पापू) | :२४ तासात १४५ एमएलडी पाणी पंपींग होते. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :पंपींग स्टेशन नसल्याने जास्त पाणी उचलता येत नाही. त्यामूळे संमातर आणत आहोत. तेथील यंत्रणा पहिले कार्यान्वित करावी. |
| श्री.अब्दुल नाईकवाडी | :२४ तास पाणी केंव्हा देणार करारनाम्यात काय शहरात पाणी टंचाई निर्माण झाली जायकवाडीपासून लाईनचे काम तातडीने सुरू करावे |
| कार्य.अभियंता (पापु) | :३ वर्षानंतर २४ तास पाणी मिळेल. १४५ एमएलडी पाणी उचलले जाते. शहरात १२० एमएलडी येते. |
| श्री.गजानन बारवाल | :लिकिजेस बंद करावे पाणी वाढेल. |
| श्री.अजीम अहेमद | :वर्षात १२५ दिवस पाणी येते ३६५ दिवसाची नळपट्टी वसुल होते. नाशिकचे औरंगाबादचे सेम पापुलेशन आहे तेथे दररोज पाणी येते. |
| मा.महापौर | :या शहरासाठी पाणी पंपीग करून आणावे लागते नाशिकला उताराने पाणी येते पंपींगचा खर्च नाही. |
| प्रश्न क्र.१२०,१२१,१२२ | पुढील बैठकीत घेण्यात येतील. |
| प्रश्न क्रमांक १२५ | :श्री.राजगौरव वानखेडे. |
| मा.उपमहापौर | :प्रश्न दिला होता उत्तर आले की, १२ कोटीचे टेंडर आहे. त्यात एन-४ ते नाईक चौक रस्त्याचे १.१८,६४,४४७ चे अंदाजपत्रक खर्च ९९.५४ लक्ष केले असे म्हटले हा कोणता रस्ता आहे या रस्त्यावर काम केले का? |
| कार्य.अभियंता(इ व फ) | :गोकुळ स्वीट ते नाईक चौक असे आहे.टाईप मिस्टेक झाली. |
| मा.उपमहापौर | :अशी चुक व चेंजेस होऊ शकते का माहितीच्या अधिकारात कुणी विचारले तर असे उत्तर देणार का नाईक चौक दिपावली हॉटेलच्या समोर आहे. जेथे रस्ता केला म्हणता तेथे नाईक चौक नाहीच. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :साईड चेंज करण्याची मंजूरी घेतली का ? |
| श्री.कैलास गायकवाड | :गोकूळ स्वीट ते अहिल्यादेवी होळकर असा रस्ता केला. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :भाजीवाली बाई ते रमानगर उत्सव मगंल कार्यालया पर्यतच माझ्या जुन्या वार्डातील रस्ता केला आता जो माझा वार्ड आहे तेथे हिन्दू राष्ट्र चौक पर्यतच रस्ता केला हे दोन्ही रस्ते होणे आवश्यक आहे.ती एजन्सी काम करीत नसेल तर मनपा फंडातून करावे. |
| मा.उपमहापौर | :अधिकारी चुकीची माहिती देतात कलम ५६ प्रमाणे कार्यवाही करावी. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :रस्त्याची यादी मी मागितली होती या रस्त्याचा उल्लेख त्यात केला नाही. |
| श्री.राजू शिंदे | :या यादीत माझ्या वार्डाचे नाव आले त्या भागात कामच झाले नाही यादीत १०० टक्के चुक झाली. ज्यांनी सही केली त्यांना बोलवून घ्यावे. बीओटीचे मसनतपूरला ३.७० कोटीचे काम केल्याचे दाखवले. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :गजानन मंदीर ते जयभवानी चौक व तिरूमला मंगल कार्यालय ते विजय चौक हे दोन रस्ते व्हाईट टॅापींग डिफर्ड पेमेंन्ट या दोन्हीमध्ये हे काम दाखवले. |

मा.महापौर :स.सदस्यांना बरोबर माहिती दिली पाहिजे.या संदर्भात उद्या १०.३० वाजता महापौर दालनात बैठक घेतली जाईल.

श्रीमती माधुरी देशमुख :बीओटी प्रकल्प,सवेरा पार्क येथील दिलेली परवानगी,समांतर, टॅक्सच्या नोटीसा, एन-४ ते नाईक चौक रस्त्याचे काम, राकाज अशा अनेक प्रकरणात चुका होतात अशा अधिका-यावर कार्यवाही करावी.

श्री.रामेश्वर भादवे :एन-४ ते नाईक चौक पर्यंत रस्ता केला असे सांगतात बील दिले का?

अति.आयुक्त :चुकीची माहिती दिली असेल तर चौकशी करून कार्यवाही केली जाईल.

श्री.राजू शिंदे :प्रत्यक्ष आयुक्तांनी त्या ठिकाणी जावे रस्ते झाले की नाही. तपासणी करावी

श्री.राजगौरव वानखेडे :संभाजी महाराज चौक ते शरद हॉटेल,गोदावरी शाळा ते अण्णाभाऊ साठे चौक,पोलीस मेस ते आंबेडकर चौक हे अर्धवट रस्ते कधी पुर्ण होणार २०१०-११ चे कामे अपुर्ण असतांना त्या एजन्सीला दुसरे कामे दिले जाते.

श्री.राजेंद्र जंजाळ :व्हा.टॉपींगचे काम कोण करतात.काम केले नाही त्यांना काळया यादीत टाकावे पुढचे कामे त्यांना देऊ नये.कोणत्या कामाचे किती पैसे दिले क्वॉलीटी कशी आहे सर्व चौकशी व्हावी.

कार्य.अभियंता(इ व फ) :व्हाईट टॉपींग जे पी इन्टरप्राईजेस व डिफर्ड चे कामे जीएनआय इंफ्रास्ट्रक्चर एजन्सीला दिले.

मा.उपमहापौर :क्रिसील इंजिनिअर म्हणजे कोण आहे?

कार्य.अभियंता इ व फ :पीएमसी आहे. पीएमसीची पण सही आहे.

मा.उपमहापौर :पीएमसी सही करून देते तेच उत्तर म्हणून सदस्यांना दिले जाते. अशा एजन्सीला ब्लॅकलिस्ट करावे.

श्री.राजगौरव वानखेडे :डिफर्ड मध्ये केलेले रस्त्यावर पॅचवर्क करण्याची वेळ येते योग्य नाही.

मा.महापौर :मुदतीच्या आत पॅचवर्क करावे लागत असेल तर काम केलेल्या एजन्सीकडून ते काम करून घ्यावी पीएमसी चुकीची माहिती देत असेल. एजन्सीवर कार्यवाही करावी. अर्धवट कामे पुर्ण करून घ्यावी उद्याच्या बैठकीत सर्व माहिती आणावी. एजन्सी काम करण्यास तयार नसेल तर नवीन प्रोजेक्ट करून ती कामे करता येईल.

श्री.भगवान घडमोडे :क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन रस्त्याचे काम अर्धवट १३ व्या वित्त आयोगातून असलले काम केले डिफर्डचे अर्धवट ठेवले.वारवांर एजन्सीला सवलत दिली जाते योग्य नाही. ही प्रशासनाची जबाबदारी आहे.इतर रस्ते ही त्या एजन्सीकडून पुर्ण करून घ्यावे.ज्या एजन्सीला नाव माहित नाही ते चांगले काम करू शकत नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ :क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन रस्ता अर्धा १३ व्या वित्त आयोगातून अर्धा डिफर्डवर.,१३ व्या वित्त आयोगा मार्फत होणारे कामाची निविदा ७.८६ टक्के अबाऊने व डिफर्ड ३९.९५ टक्के १३ व्या वित्त आयोगातील काम ९ महिण्याची मुदत डिफेक्ट लॅबीलिटी ५ वर्ष व व डिफर्ड वरील

कामास २४ महिणे व डिफेक्ट लॅबीलिटी ३६ महिणे हा फरक कशासाठी.

उपअभियंता(श्री खन्ना) :डिफर्डचे पेमेंन्ट टप्प्याटप्प्याने दिले जाते डिफरचे कामाचा कालावधी २४ महिण्याचा आहे तेथून पुढे तीन वर्ष त्यामूळे ३६ महिणे दिले आहे.

मा.महापौर :संबधीत अधिकारी यांनी याची माहिती घेवून कार्यवाही करावी.

प्रश्न क्रमांक ११८ :स.श्री. राजेंद्र जंजाळ

श्री.राजेंद्र जंजाळ : बचत गटा संदर्भात प्रश्न होता अनेक प्रस्ताव प्रलंबीत सही कोण करणार म्हणून ते प्रलंबीत आहे.

आस्थापना अधि-१ :पत्र माझ्याकडे आलेले नाही. एनयुएलएम विभागाकडून माहिती दिली हा विभाग बीपीएल मध्ये असलेल्या बचत गटाची नोंदणी करते.

श्रीमती सिमा खरात :बचत गटाची नोंदणी बंद केली मा.आयुक्तांनी हे आपले काम नाही.असे म्हटले किती फायदा होतो असे म्हटले मा.आयुक्तानी मला पत्र दयावे पत्रकार परीषद घेवून तसे नागरीकांना सांगता येईल.

सौ.संगिता वाघुळे : दारिद्रय रेषेखाली महिला बचत गट स्लम भागातील महिला बचत गटाच्या महिला माझेकडे आल्या त्यांना सन २०१३ पासून शासनाकडून बचतगटाच्या महिलासाठी अनुदान येते ते त्यांना मिळत नाही.माहिती दयावी.

आस्थापना अधि-१ :बचत गटाची नोंदणीसाठी ५१ प्रस्ताव प्रलंबीत आहे.प्रमाणपत्रावर कुणी स्वाक्षरी करायची याचा प्रस्ताव दिला होता यापुर्वी असे कोणतेही अधिकार प्रदान झाले नव्हते.

उपआयुक्त (मा.म) :कोणत्या बचत गटाचे पैसे देणे बाकी आहे माहिती घेवून कार्यवाही केली जाईल.

प्रश्न क्रमांक १२१ :

श्री.राजेंद्र जजांळ :पर्यावरण अहवाल बाबत प्रश्न होता शहरात किती व कसे वायू व कोणाचा कशाने मृत्यू होऊ शकतो माहित नाही.हे होऊ नये यासाठी उपाययोजना काय केल्या.१३-१४ पर्यावरण अहवाल ३-१२-१५ च्या सभेत प्रकाशीत केल्याचे म्हटले तारीख चुकली ज्यांनी उत्तर दिले त्यांचेवर कार्यवाही करावी. २०१०-११ चा अहवाल प्रकाशित केला नाही नियमाच्या विरोधात काम होत असेल तर योग्य नाही.

अति.आयुक्त :तारीख चुकलेली आहे, दर वर्षी अहवाल दिला जाईल.

श्री.राजेंद्र जंजाळ :दर वर्षीचा अहवाल जुलैच्या पहिले दिला पाहिजे जो अहवाल प्रकाशित केला त्यात डिसेंबर २०१५ टाकले.१३-१४ चा अहवाल तीन महिण्याने उशीरा प्रकाशित केला.कुणी केला कोणते अधिकारी होते त्यावर किती खर्च झाला एजन्सी कोणती.काहीच दिले नाही संबधीत अधिकारी यांचेवर कार्यवाही.

अति.आयुक्त :अहवाल सादर करण्यास उशीर का झाला चौकशी करून संबधीतावर कार्यवाही केली जाईल.

मा.महापौर :३ दिवसात चौकशी करावी व कार्यवाही करावी.

| | |
|---|---|
| प्रश्न क्रमांक १२६ | : |
| श्री.विकास जैन | :क्रांतीचौक ते इंजिनिअरींग कॉलेज हॉल ,हॉटेल तंदूर ते रेल्वेस्टेशनपर्यत १३ व्या वित्त आयोगामधून व मधला रस्त्याचा भाग डिफर्ड वर केला. ऐतिहासिक रोड त्यात कै.बाळासाहेब ठाकरे यांचे नाव यास दिले. जेथे गरजेचे नव्हते तेथे अगोदर काम केले. ७.५० कि.मी कॉक्रीट व ६.५० कि.मीटर डांबरीकरण केले डांबरीकरण जास्त का केले. |
| कार्य.अभियंता (अ व ड) | :यात ६.५० मी अधिक २.७५ मी असे आहे. युटिलिटी आहे. |
| श्री.विकास जैन | :काही ठिकाणी युटीलिटी चांगले काम केले बाकीचे का केले नाही. |
| कार्य.अभियंता (अ व ड) | :एमएसईबी व ठेकेदाराचे लोकांची तेथे एकत्रीत तपासणी करतील काम सुरू होईल.पोल हटविण्याचे काम अगोदर करावे लागेल. |
| श्री.विकास जैन | :कैलास हॉटेल ते तंदूर हॉटेल पर्यत १-२ पोल आहे. |
| कार्य.अभियंता (अ व ड) | :ड्रेनेजचे काम चालू आहे.खोदकाम चालू आहे. |
| श्री.विकास जैन | :कैलास हॉटेल ते इंजिनिअरींग कॉलेज पर्यत कोठेही काम चालू नाही.ड्रेनेज लाईनचे काम टेंडर मध्ये होते त्यांचेकडून का केले नाही. |
| कार्य.अभियंता | :पोल मध्ये येत होते लेव्हलचा प्रॉब्लेम होता. |
| श्री.विकास जैन | :टेंडर मध्ये प्रोव्हिजन असतांना ड्रेनेजचे काम केले नाही तेथे आता युआयडीएसएसएमटी योजनेतून काम करीत आहोत.महापालिकेचा खर्च होतो आहे. |
| श्री.गजानन बारवाल | :मागिल बैठकील काम सुरू होईल सांगितले डांबरीकरणाचे थोडे काम झाले काही बाकी आहे पोल काढले नाही जागा ताब्यात घेतली नाही.यात प्रशासनाने लक्ष घालावे. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :२०११ मध्ये पोल शिप्टचे काम दिले अदयाप का केले नाही. |
| कार्य.अभियंता अ व ड | :४-८ दिवसापुर्वी पेमेंन्ट दिले काम सुरू केले. |
| मा.उपमहापौर | :हे काम करून घेणे पीएमसी जबाबदारी आहे त्यांचेवर कार्यवाही करावी. |
| श्री.विकास जैन | :काम बरोबर होत नाही.पीएमसीने पत्र दिले कंपनी ऐकत नाही.रस्त्याला ५-६ इंचची खटकी आहे. |
| कार्य.अभियंता अ व ड | :काम सुरू केले होते मध्यतंरीच पाऊस आला बंद केले.आता काम सुरू होत आहे. |
| मा.महापौर | :पीएमसी व संबंधीत मनपाचे अधिकारी यांनी उद्याच्या बैठकीला उपस्थित रहावे. |

प्रश्न क्रमांक १२७ ते १२९ स.श्रीमती सरवत बेगम

| | |
|---|---|
| श्रीमती सरवत बेगम | : १२७,१२८ चे उत्तर मिळाले १२९ उत्तर मिळाले नाही. |
| उपआयुक्त (म) | :अतिरिक्त पदभाराची नियमावली कार्यकाळ किती असावा अधिनियमात तरतुद नाही. |
| श्री.फिरोज खान | :सहा महिण्यापेक्षा जास्त अतिरिक्त चार्ज ठेवायचा असेल तर सभेची परवानगी घ्यावी लागते.४-४ चार्ज एकाचकडे दिले जाते. |
| उपआयुक्त (म) | :ती नेमणुकीच्या संदर्भात माहिती आहे. |

श्री.मो.अयुब जागीरदार :सहा महिण्यापेक्षा जास्त काळ चार्ज दिला जातो नियमावलीचे पालन होत नाही.

उपआयुक्त (म) :कलम ५३ नुसार नेमणुकीचा अधिकार मनपाचा जो अधिकारी सहा.आयुक्त या पदाच्या समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे मग अधिकारी तात्पुरते असो की कायम त्याची नेमणुक करण्याचा अधिकार महापालिकमध्ये निहीत असेल.परंतु आयुक्तांना महापालिकेचा सहा.आयुक्त या पदाशी समतुल्य असलेला किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या कर्ज विषयक कामासाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिण्याहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजूरीने या अटीवर करता येतील.

अति.आयुक्त :अतिरिक्त कार्यभार मा.आयुक्ताच्या अधिकारात देऊ शकतात त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी नेमणुक दयावयाची असेल तर स्थायी समितीची मान्यता लागते.

मा.उपमहापौर :कोणत्या अधिका-याकडे कोणत्याही पदाचा पदभार दिला जातो. अशा वेळी काय निकष लावले जातात.

श्री.भगवान घडमोडे :कुणाला कोणता चार्ज दयायचा आयुक्ताचे अधिकार आहे परंतु ते काम कसे करतात याची सुध्दा पडताळणी होणे आवश्यक आहे.

मा.महापौर :सर्वांना समान काम दयावे.चांगले काम करून घेण्यासाठी प्रशासनाचा अंकुश असावा.

प्रश्न क्र.१३० :

श्रीमती सरवत बेगम :अग्निशमन विभागाने किती प्रमाणपत्र दिले उत्तर दिले की हॉटेल, रेस्टारंट ज्युस सेंटर, स्वीट सेंन्टर खानावळ हॉटेल त्यात ८६ अर्ज आले व ८२ ला एनओसी दिली असे म्हटले. बाकी एनओसी का थांबविल्या. जेथे इलिगल चालते त्यांचे बाबतीत चौकशी केली का?

मुख्य अग्निशमन अधि :लायसन्स देण्याचा पोलीस विभागाचा अधिकार आहे ते शिफारस करतात मनपाकडून एनओसी दिली जाते.

**<u>विषय क्रमांक ६१:-</u>** **(कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा)**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीमधील गुंठेवारी वसाहतींमध्ये नविन जलवाहीन्या टाकणेसंदर्भाने मा.पदाधिकारी व स.नगरसेवक यांच्याकडून सातत्याने मागणी होत आहे.

औरंगाबाद महानगरपालिका राबवित असलेल्या पाणी पुरवठा योजने अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेने औरंगाबाद सिटी वॉटर युटिलीटी कंपनी लिमीटेड (एस.पी.व्ही.) या कन्सेशनर सोबत दिनांक २२.०९.२०११ रोजी कन्सेशन ॲग्रीमेंट केलेले आहे. औरंगाबाद महानगरपालिकेने पाणी पुरवठा योजना दिनांक ०१.०९.२०१४ रोजी कन्सेशनरकडे पुढील २० वर्षाच्या कालावधीसाठी हस्तांतरीत केलेली आहे. कन्सेशन ॲग्रीमेंटमधील तरतुदीनुसार पाणी पुरवठ्याची सर्व कामे कन्सेशनरमार्फत करण्यात येणार आहेत.

महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम २००१ साठी महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ दिनांक ३०.०४.२००१ नुसार अध्यादेश प्रसिध्द करण्यात आला आहे. अध्यादेशातील कलम ६ मध्ये

नियमाधीन केलेल्या गुंठेवारी विकासाची श्रेणी वाढ करणे म्हणजेच पायाभूत सुविधा पुरविणेबाबत नमुद करण्यात आलेले आहे. पायाभूत सुविधा अंतर्गत जलनिःसारण वाहिन्या टाकणे, जलवाहिन्या टाकणे, रस्ते बांधणे इत्यादी सुविधांचा समावेश होतो. गुंठेवारी नियमाधिन करतांना प्राप्त होणाऱ्या प्रशमन शुल्काच्या रकमा नियोजन प्राधिकरणाकडून रेखांकन निहाय स्वतंत्र लेखाशिर्षा खाली जमा करण्यात याव्यात आणि त्या रेखांकनातील जागांवर विज पुरवठा व्यतिरिक्त अन्य पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी त्यांचा वापर करण्यात यावा,प्राप्त झालेल्या प्रशमन शुल्काच्या रकमेतून १५% रक्कम नियोजन प्राधिकरण प्रशासनिक खर्चासाठी ठेऊन घेईल अशी तरतुद आहे. म्हणजेच उर्वरित ८५% रकमेतून जलनिःसारण वाहिन्या टाकणे, जलवाहिन्या टाकणे,रस्ते बांधणे इत्यादी पायाभूत सुविधा पुरविणे आवश्यक ठरते.

औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत एकूण ११८ गुंठेवारी वसाहती आहेत. नियमितीकरण केलेल्या वसाहतींमध्ये पायाभूत सुविधा देण्याची कार्यवाही गुंठेवारी अधिनियमातील कलम ६ (३) नुसार महानगरपालिका नियोजन प्राधिकरण असल्यामुळे औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत पुरविणे आवश्यक आहे.

शहरातील विविध गुंठेवारी वसाहतीमध्ये नव्याने जलवाहिन्या टाकण्याची मागणी मा.पदाधिकारी व स.नगर सेवक करीत असल्यामुळे नियमानुसार अशा वसाहतीमध्ये जलवाहिन्या टाकण्यासाठी येणाऱ्या खर्चाची रक्कम ही संबंधित गुंठेवारी वसाहतीमधून महानगरपालिकेच्या फंडात जमा होणे आवश्यक आहे. रक्कम जमा असल्याबाबतचा अहवाल नगररचना विभागातर्फे प्राप्त झाल्यानंतर गुंठेवारी वसाहतीमध्ये प्राधान्य क्रमाने जलवाहिन्या टाकण्याची नविन कामे करणे शक्य होईल.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभे समोर मान्यतेस्तव सादर.

श्री.भगवान घडमोडे :गुंठेवारीचा हा विषयच होऊ शकत नाही. मागील बैठकीत गुठेवारी संदर्भात ठराव मंजूर केला सर्व कामे करावी मागे लागतील म्हणून ठेवला असावा. गुंठेवारीची नियमावली आहे.

श्री.नंदकुमार घोडेले :समातंर व भुमीगत गटार योजना गुंठेवारी भागात टाकल्या जातील धोरण ठरलेले आहे. हा प्रस्ताव रद्द करावा. दोन्ही योजनेच्या माध्यमातून या भागात काम करावे.

श्रीमती सायरा खान :शहरात ४० टक्के गुंठेवारी भाग आहे. राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजना या भागासाठी आहेत. भौतिक सुविधा पुरविण्याचे शासनाचे आदेश आहे. नुसता गुंठेवारी भागातून हा रेव्हेन्यु घ्यावा असे नाही पाणी पट्टी गुंठेवारी भागातून वसुल होत आहे. हा प्रस्ताव योग्य नाही रद्द करावे.

श्री.भाऊसाहेब जगताप :हा प्रस्ताव नामंजूर करावा.

श्री.रेणुकादास वैद्य :असा प्रस्ताव यायला नको दिनांक २२-३-२०११ स्थायी समितीच्या बैठकीत शहर अभियंता व मा.सभापती यांनी पान क्र.२९,३० वर झोपडपट्टी व गुंठेवारी भागात लाईन टाकली जाईल असे म्हटले १९ ऑक्टोंबर सर्वसाधारण सभेच्या पेपर कटींग आहे.त्यात असे म्हटले होते की शहरासह गुंठेवारी भागात पाणीपुरवठा होऊन शहर टँकर मुक्त होईल अंतर्गत पाणी लाईन टाकली जाईल असे म्हटले असे असतांना पुन्हा हा प्रस्ताव कशासाठी दिला. भुमीगत गटार योजना २५-३० वर्षाचे

नियोजन करून हाती घेतली त्यात गुंठेवारी भाग सोडला असे नाही. सभागृहाची दिशाभूल व जनतेमध्ये सभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो हे मंजूर करण्याची आवश्यकता नाही. शासन ग्रामीण भागात हगणदारी मुक्त गाव करण्याची कन्सेप्ट आहे. स्मार्ट सिटी होत असतांना सर्वांना २४ तास शुध्द पेयजल दिले जाईल, असे सांगते. असे असतांना प्रशासन असा प्रस्ताव का देत आहे.

काय.अभियंता(पापू) :गुंठेवारी नियमावलीचा भाग नमूद केला वेगळा प्रस्ताव नाही. प्रशासनाला अडचणी येत होत्या प्रशमन शुल्क बाबत क्लिअर झाले तर पुढे कार्यवाही करता येईल.

श्री.नंदकुमार घोडेले :प्रस्ताव परत घेण्याचे आदेशीत करावे. मंजूर नामंजूर केले तर शासनाकडे विखंडीत करण्यास पाठवतील.

श्री.भगवान घडमोडे :जल व मल निःस्सारण वाहिनी टाकण्याचे काम मंजूर केली काम करण्यास काय अडचणी आहे स.पदाधिकारी यांना बोलू शकत होते. परत घ्यायला लावावे. नागरीक प्रशमन शुल्क भरणार नाही अशी भिती प्रशासनास आहे.

मा.उपमहापौर :गुंठेवारी होण्यास प्रशासन जबाबदार आहे. आता वस्ती झाल्याच आहे तर सुविधा दयाव्याच लागणार आहे. गुंठेवारी भागात जल व मल निःस्सारण वाहिनी झाल्या पाहिजे.

श्री.राजू शिंदे :प्रशासनाने प्रस्ताव परत घ्यावा. शहराच्या मध्यभागी ब-याच गुंठेवारी व झोपडपट्टी भाग आहे अशा ठिकाणी जल व मल निःस्सारण वाहिनी टाकणार नाही तर त्या नागरीकांना सुविधा कुणी दयायच्या असे ठराव परत येऊ नये

श्री.अब्दुल र.नाईकवाडी:रद्य करावे कोणत्याही अटी शर्ती न घालता गुंठेवारीत जल व मल निःस्सारण वाहीनी टाकण्याचे कामे करण्याचे आदेशीत करावे.

अति.आयुक्त :टेक्नीकल अडचणी विषद केली सभागृहाने निर्णय घ्यावा.

मा.महापौर :स्मार्ट सिटी कडे जात असतांना मल व जल निःस्सारण हे दोन्ही विषय यात आहे समांतर जलवाहिनी चा ठराव झाला तेंव्हा स्थायी समितीने निर्णय घेतला तेंव्हा प्रशासनाने खुलासा केला की ही योजना पुर्ण शहरासाठी आहे. भेदभाव करणार नाही. शहराचे अधिकृत व अनधिकृत असे दोन भाग करून चालणार नाही. सर्व भागात सर्व सुविधा मिळाव्या, अशा सदस्यांच्या भावना आहे. सन २००१ पुर्वी गुंठेवारी आहे. तेथे नागरीक गुंठेवारी भरतात. आणखी मुदत वाढू शकते तेथे काम करता येईल. शहरातील कोणत्याही भागाचा भेदभाव न करता संपुर्ण ठिाकणी जल व मल निःस्सारण या योजनेची कामे व्हावी. या प्रस्तावाशी सहमत नाही. हा प्रस्ताव नामंजूर करण्यात येतो.

श्री.भगवान घडमोडे :वसुली करणार नसेल, नियमाने काम करणार नसेल प्रशमन शुल्क घेणार नसेल, तर स्मार्ट सिटीत बसत नाही. असे शासनाने करू नये याचाही विचार करावा. प्रशासनाने नियमावलीनुसार काम करावे.

मा.महापौर :लवकरच मुदत येईल नागरीकांनाही गुंठेवारी करावी तशा सुचना नागरीकांना करता येईल.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार हा प्रस्ताव नामंजूर करण्यात येतो व पुर्वी झालेल्या निर्णयानुसार शहरातील गुंठेवारी व इतर सर्व भागांत मल व जल नि:स्सारण जलवाहिनीची व त्या संबधीची सर्व कामे करण्यास मंजूरी देण्यात येते.

**विषय क्रमांक ६२:-**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५८ च्या पोट कलम (२) अन्वये औरंगाबाद महानगरपालिका पाणी पुरवठा आणि पाणी पट्टी उपविधी-२०११ तयार केले असून सदर उपविधीस दिनांक ०६.०२.२०१४ रोजी महाराष्ट्र शासनाने मान्यता प्रदान करुन दिनांक १४.०३.२०१४ रोजी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये प्रसिध्द केले आहे. ही उपविधी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रासाठी लागु झालेली आहे. उपविधीतील तरतुदीनुसार अनाधिकृत नळ जोडणी अधिकृत करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत दिनांक ०१.११.२०१४ ते ३०.०१.२०१५ या कालावधीमध्ये अभययोजना राबविण्यात आली होती. त्यानंतर अभय योजनेस मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.७८४ दिनांक ०२.०३.२०१५ अन्वये दिनांक ३०.०६.२०१५ पर्यंत मुदतवाढ दिलेली होती. तथापि,या कालावधीत सदर अभय योजनेस नागरीकांचा अल्प प्रतिसाद मिळाल्याने व शहराची वाढती लोकसंख्या,कमी पडणारे पाणी परिणाम लक्षात घेता अनाधिकृत नळ जोडण्यांवर अंकुश बसावा याकरीता राबविण्यात आलेल्या अभय योजनेस दिनांक ३१.१२.२०१५ पर्यंत मुदतवाढ मिळण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर. तसेच या मुदतीनंतर शहरातील अनाधिकृत नळ जोडण्या धारकांविरुध्द उपविधीतील तरतुदीनुसार कार्यवाही प्रस्तावीत करण्यात येईल. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभे समोर मान्यतेस्तव सादर.

श्री.भगवान घडमोडे :या योजनेत किती पैसे घेणार आहे व मनपा की समांतरकडे रक्कम जाणार आहे.

श्री.राजु शिंदे :एकत्रित रक्कम नागरीक भरणार नाहीत. सुरूवातीला १०००/- रुपये व नंतर ५००/- रुपये प्रमाणे वसुल करावेत.

कार्य.अभियंता (पापु) :४४५० रू मंजूर झालेले चार्जेस आहे तेच घेणार आहे मनपाच्या कलेक्शन अकाऊंटमध्ये जातील. इस्टालमेंन्ट नाही.

श्री.भगवान घडमोडे :अनेक दिवसापासून योजना आहे सक्सेस होत नाही.

कार्य.अभियंता (पापू) :आता या नुसार सहा महिण्याच्या कालावधी दिला आहे त्यानंतर दंडाची रक्कम आकारणार आहोत.

मा.महापौर :दुरूस्तीसह विषय मंजूर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अनाधिकृत नळ जोडणी अधिकृत करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या अभय योजनेस दिनांक ३१.१२.२०१५ पर्यंत मुदतवाढ देऊन नळधारकाकडून सुरूवातीला १०००/- रुपये व त्यानंतर ५००/- रुपये प्रमाणे वसुली करण्यास व मुदतीनंतर शहरातील अनाधिकृत नळ जोडण्या धारकांविरुध्द औरंगाबाद महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५८च्या पोट कलम (२) अन्वये

तयार केलेल्या औरंगाबाद महानगरपालिका पाणी पुरवठा आणि पाणी पट्टी उपविधी-२०११ तील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६३:-**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, शासन अधिसुचना क्र.औ.म.पा.२०१५/प्र.क्र.१२/नवि-२४ दिनांक ११ फेब्रुवारी-२०१५ अधिसुचना नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे मार्फत महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १४.०५.२०१५ प्रकाशीत झाली आहे. या अधिसुचनेनुसार तत्कालीन देवळाई/सातारा या नगर परिषदेचे क्षेत्र महानगरपालिका औरंगाबाद या विकास व नियोजन प्राधिकरणामध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. या आधारे या क्षेत्राचे नियोजन व विकास करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. सदर नव्याने समाविष्ट झालेल्या क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात वसाहती झाल्या आहेत व या वसाहतीमध्ये काही प्रमाणात विकास झालेला आहे. या क्षेत्रामध्ये महानगरपालिकेमार्फत मुलभूत सुविधा देणे. उदा.रस्ते, जल:निसारण, लाईट व पाणी आवश्यक असल्याने या भागाकरीता अस्तित्वातील सुविधासह प्रस्तावित सुविधाकरीता सर्वेक्षण करणे, नियोजन करणे तसेच भविष्यामधील वाढणारी लोकसंख्या व इतर विकास पाहता त्याकरीता मुलभूत सुविधा पुरविणे (Infrastructure) करीता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे आवश्यक आहे. या अहवाला आधारे राज्य शासनाकडे या भागाच्या विकासाकरीता निधी मागता येईल तरी सातारा देवळाई परिसरातील अस्तित्वातील सुविधांचे व भविष्यामध्ये पुरविण्यात येणाऱ्या सुविधांचे सर्वेक्षण व नियोजनाचा सविस्तर अहवाल तयार करण्यासाठी एक स्वतंत्र प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांची नेमणुक करणे योग्य होईल.

करीता उपरोक्त प्रमाणे सातारा-देवळाई परिसरासाठी महानगरपालिकेमार्फत मुलभूत सेवा-सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) ची नेमणुक करणेच्या मान्यतेस्तव सादर.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभे समोर मान्यतेस्तव सादर.

| | |
|---|---|
| मा.महापौर | :पीएमसीचा विषय आहे सभागृहाला वारंवार माहिती दिली पाहिजे सर्वासमोर हे यावे. |
| श्री.नंदकुमार घोडेले | :देशपातळीवर वृत्तपत्राद्वारे निविदा मागविण्यात याव्यात. |
| श्री.भगवान घडमोडे | :पीएमसीने काय काम केले अहवाल घ्यावा. |
| मा.महापौर | :दुरूस्तीसह विषय मंजुर. |

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सातारा-देवळाई परिसरासाठी महानगरपालिकेमार्फत मुलभूत सेवा-सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी व या करीता देशपातळीवर वृत्तपत्राद्वारे निविदा मागवून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) ची नेमणुक करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात बारा नविन वाहतुक संकेतांकाची उभारणी करण्यासाठी रक्कम रु.१०६.६२ लक्ष (रु. एक कोटी सहा लक्ष बासष्ट हजार मात्र) अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन या कामास आर्थिक तरतुद उपलब्ध करुन घेण्यासाठी सविस्तर प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यात आलेला होता. सदर कामासाठी जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद यांचेकडून जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण)

वर्ष २०१४-१५ मधुन ५०% रक्कम रु.५३.३१ लक्षचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश पत्र क्र.४१२ दिनांक १९.०३.२०१५ अन्वये प्राप्त झाले आहे. तसेच या कामात ५०% रक्कम महानगरपालिकेस खर्च करावयाची आहे. मा.जिल्हाधिकारी यांचेकडुन पत्र जा.क्र/२०१५/नपाप्र/मनपा/नगरोत्थान/कावि/४१६ दिनांक १६.०४.२०१५ अन्वये रक्कम रु.५३.३१ लक्ष निधीचा धनादेश प्राप्त झाला आहे.

शहरात विविध चौकात नविन वाहतुक संकेतांक बसविण्याचे कामासाठी प्रस्तावित रु.१०६.६२ लक्षच्या अंदाजपत्रकास मान्यता व्हावी. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

श्री.नंदकुमार घोडेले :वाहतुक संकेतांक कोठे बसविणार आहे? यादी सभागृहाला दयावी. आधुनिक सिस्टमचा उपयोग करावा.

मा.महापौर :सर्व सदस्यांना यादी दयावी. विषय मंजूर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरात विविध चौकात नविन वाहतुक संकेतांक बसविण्याचे कामासाठी प्रस्तावित रक्कम रुपये १०६.६२ लक्षच्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नागरी दलीत वस्तीमध्ये महानगरपालिकेची अनेक शौचालये बांधण्यात आलेली आहेत. तथापि, सदरची शौचालये पुरेशी देखभाल दुरुस्ती अभावी नादुरुस्त अवस्थेत आहेत. परंतु या प्रत्येक शौचालयाच्या ठिकाणी कर्मचारी नेमणे महानगरपालिकेला शक्य होत नाही. सदरची शौचालये कालांतराने नादुरुस्त होऊन त्याची दुर्गंधी सुटते. याचा त्रास लगतच्या वसाहतीमधील नागरीकांना होतो व याचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या शिवाय वारंवार शौचालय दुरुस्तीवर केलेला खर्च वाया जातो व याचा कार्यालयावर विनाकारण खर्चाचा बोजा पडतो.

त्यास्तव ज्याठिकाणी दाट लोकवसाहत आहे व ज्या भागातील नागरीकांना सार्वजनिक शौचालयाची गरज आहे. त्याठिकाणी महानगरपालिकेची नादुरुस्त असलेली जुनी शौचालये पाडुन तेथे नव्याने सुलभ शौचालयाच्या धर्तीवर “पे ॲण्ड युज” शौचालये बांधणे आवश्यक आहे. सदर शौचालयाचा वापर नागरीकांना माफक दरात (साधारण अंदाजे रु.३०/- प्रति कुटूंब/प्रति महीना) करणे बाबत देणेची संकल्पना आहे. सदर शौचालये बांधण्याचा खर्च महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या रु.५०.०० लक्षच्या तेराव्या वेतन आयोगच्या आर्थिक तरतुदी मधुन प्रस्तावित आहे. सदरची शौचालये बांधल्यानंतर याची निविदा काढुन रितसर काम हाती घेण्यात येईल.

प्रायोगिक तत्वावर एक पथदर्शक स्वरुपात तीन स्लम वसाहती अनुक्रमे (०१) आंबेडकर नगर (०२) हर्षनगर (स्लम) (०३) मिसरवाडी स्लम येथे अशा स्वरुपाची “पे ॲण्ड युज” शौचालये बांधण्याचे नियोजन आहे. सर्वसाधारण पणे उक्त तीन ठिकाणी “पे ॲण्ड युज” शौचालये बांधण्याचे नियोजन आहे. सर्वसाधारण पणे उक्त तीन ठिकाणी “पे ॲण्ड युज”पध्दतीची शौचालये बांधणेसाठी सा.बा.दरसुची सन २०१३-२०१४ नुसार एकत्रित रुपये ४७,२५,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. या कामास दिनांक १.१०.२०१३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

मा.महापौर :- विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रायोगिक तत्वावर एक पथदर्शक स्वरुपात महानगरपालिकेची नादुरुस्त असलेली जुनी शौचालये पाडुन तेथे नव्याने सुलभ शौचालयाच्या धर्तीवर तीन स्लम वसाहती अनुक्रमे (०१) आंबेडकर नगर (०२) हर्षनगर (स्लम) (०३) मिसरवाडी स्लम येथे “पे ॲण्ड युज” शौचालये बांधण्यास व त्यासाठी येणारा एकत्रित रक्कम रुपये ४७,२५,०००/- एवढ्या खर्चास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.११२, शिवाजीनगर मधील साई नगर व भारतनगर हा ५० टक्के दलित वस्ती असून महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत रस्ते मजबूतीकरणासाठी ५० लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करण्यासाठी शासनास शिफारस करण्यास्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ **अनुमोदक:-**श्री.कमलाकर शामराव जगताप

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.११२, शिवाजीनगर मधील साई नगर व भारतनगर हा ५० टक्के दलित वस्ती असून महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत रस्ते मजबूतीकरणासाठी व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.०२, भगतसिंग नगर हर्सुल या परिसरात हर्सुलगाव, दिक्षाभुमी नगर, वाघोळी गल्ली या परिसरात दोन ते तीन हजार दलित समाजातील नागरीक गेल्या १५ वर्षापासून बऱ्याच नागरी समस्यांपासून वंचित आहेत. या परिसरातील दलित समाजाच्या नागरी वसाहतीचे नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणे, प्रमुख रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे, पिण्याच्या पाण्याच्या सोई-सुविधा,स्मशानभुमी इ. व इतर कामासाठी निधी मिळण्याकरीता प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.बन्सी ग्यानु जाधव

**अनुमोदक:-**श्री. सीताराम इसराम सुरे, श्री.राजु रेणुकादास वैद्य

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.०२, भगतसिंग नगर हर्सुल मधील हर्सुल गाव, दिक्षाभुमी नगर वाघोळी गल्ली हा भाग ५० टक्के दलित वस्ती असून महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणे, प्रमुख रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे,

पिण्याच्या पाण्याच्या सोई-सुविधा, स्मशानभुमी ईत्यादी कामासाठी व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६८, समर्थनगर या वॉर्डात शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत या प्रभागातील मुलभूत नागरी सुविधा पुरविण्यासाठी र.रु.७५ लक्षचा निधी आवश्यक आहे.

करीता वॉर्ड क्र.६८-समर्थनगर या वॉर्डात मुलभूत नागरी सुविधा पुरविण्यासाठी शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ते करण्याच्या कामासाठी रु.७५ लक्षचा निधी उपलब्ध होण्यासाठी मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.ऋषिकेश चंद्रकांत खैरे **अनुमोदक:-**श्री.राजु रेणुकादास वैद्य

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.६८-समर्थनगर येथे शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ते करण्याच्या कामासाठी व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१५, मिटमिटा अंतर्गत मिटमिटा गावठाण भागातील महानगरपालिका के.प्रा.शाळा च्या बाजुला आंबेडकर नगर व मिटमिटा स्मशानभूमीमागे गौतमनगर ही ९० टक्के वसाहत असून येथे सिमेंट कॉंक्रेट रस्ते,पथदिवे व विकास कामे करण्या करीता महानगरपालिकेस दलित वसाहतीसाठी प्राप्त होणारा निधी या वॉर्डासाठी मिळावा करीता मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दलित वसाहतीसाठी मिळणाऱ्या निधीतून र.रु.५० लक्षचा निधी वॉर्ड क्र.१५ मिटमिटासाठी देण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.रावसाहेब राधाकिसन आम्ले

**अनुमोदक:-**श्री.सुभाष सयाजीराव शेजवळ,श्री.राजु रेणुकादास वैद्य

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.१५, मिटमिटा अंतर्गत मिटमिटा गावठाण भागातील महानगरपालिका के.प्रा.शाळा च्या बाजुला आंबेडकर नगर व मिटमिटा स्मशानभूमीमागे गौतमनगर येथे शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सिमेंट कॉंक्रेट रस्ते, पथदिवे व

विकास कामे करण्या करीता व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.८७, विठ्ठलनगर अंतर्गत प्रकाश नगर गल्ली नं.१ ते ५ या भागांमध्ये ८० टक्केहून अधिक दलित वस्ती असल्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या दलितवस्ती सुधार योजनेचा निधी या भागातील मुलभूत नागरी सुविधा पुरविण्यासाठी मिळावा.दलितवस्ती सुधार योजनेअंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ते करण्यासाठी र.रु.७० लक्ष निधी उपलब्ध होण्यासाठी मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविण्यासाठी सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.मनोज बन्सीलाल गांगवे **अनुमोदक:-**श्री. कमलाकर शामराव जगताप

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.८७, विठ्ठलनगर अंतर्गत प्रकाश नगर गल्ली नं.१ ते ५ या भागांमध्ये महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ते करण्यासाठी व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९७, रामकृष्णनगर,काबरानगर अंतर्गत इंदिरानगर, बजरंगनगर, सुतगिरणी कामगार वसाहती व इतर या दलित वसाहती असून हा वॉर्ड ६० टक्के दलित वसाहत आहे. महानगरपालिकेस दलित वसाहतीसाठी प्राप्त होणारा निधी या वॉर्डासाठी मिळावा.करीता, मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दलित वसाहतीसाठी मिळणाऱ्या निधीमधून र.रु.३५.०० लक्ष निधी वॉर्ड क्र.९७ रामकृष्णनगर, काबरानगरसाठी देण्याकरीता प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यास्तव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सीमाताई काहानूलाल चक्रनारायण

**अनुमोदक:-**श्रीमती सिमाताई गणपत खरात, श्रीमती मिनाताई रामदास गायके

श्री.राजू शिंदे :दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.९७, रामकृष्णनगर, काबरानगर अंतर्गत इंदिरानगर, बजरंगनगर, सुतगिरणी कामगार वसाहती व इतर या दलित वसाहती मध्ये विविध विकास कामाकरीता महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९३ पुंडलिकनगर,हनुमाननगर व इतर या दलित वसाहती असून हा वॉर्ड ५० टक्के दलितांचा आहे. मनपास दलित वसाहतीसाठी प्राप्त होणारा निधी या वार्डासाठी मिळावा. करीता मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दलित वसाहतीसाठी मिळणाऱ्या निधीमधुन र.रु.३०.०० लक्षचा निधी वार्ड क्र.९३ पुंडलिकनगर, हनुमाननगरसाठी देण्याकरीता प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यास्तव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती मिनाताई रामदास गायके.

**अनुमोदक:-** श्रीमती सिमाताई गणपत खरात, श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.९३ पुंडलिकनगर, हनुमाननगर व इतर दलित वसाहती मध्ये महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विविध विकास कामाकरीता प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.९४ हा वार्ड दलित वसाहती मध्ये असुन या भागामध्ये न्यु हनुमान नगर, भारत नगर येत असुन येथील दलित लोकसंख्या ६०% पेक्षा जास्त आहे. त्यामुळे या वस्ती विकसित करण्यासाठी शासनाकडुन ५० लाख (पन्नास लाख) निधी देण्यात यावा याकरीता हा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.आत्माराम माणिकराव पवार. **अनुमोदक:-** श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत.

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.९४ या भागामध्ये न्यु हनुमान नगर, भारत नगर या दलित वस्ती विकसित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.८४ ज्ञानेश्वर कॉलनी,मुकूंदवाडी येथील संजयनगर, रोहिदासनगर येथील रस्ते, मल:निसारण,गटारे इ.दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत रुपये ५० लाख निधी प्राप्त होण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविण्यासाठी सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर.

**सुचक:-** श्री.कमलाकर शामराव जगताप. **अनुमोदक:-** श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत.

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.८४ ज्ञानेश्वर कॉलनी,मुकूंदवाडी येथील संजयनगर, रोहिदासनगर येथील रस्ते, मल:निसारण,गटारे इ.साठी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासनाच्या दलित सुधार योजने अंतर्गत वार्ड क्र.२८ स्वामी विवेकानंद नगर वार्डातील सिध्दार्थ नगरचा ५० टक्के भाग येथे विविध रस्त्याचे कॉक्रेटीकरण करण्यासाठी रक्कम रुपये ३५ लक्ष उपलब्ध करुन देणे बाबत शासनाकडे शिफारस करण्याबाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती सिमाताई गणपत खरात.

**अनुमोदक:-** श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल, श्रीमती मिनाताई रामदास गायके.

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या दलित सुधार योजने अंतर्गत वार्ड क्र.२८ स्वामी विवेकानंद नगर वार्डातील सिध्दार्थ नगर येथे विविध रस्त्याचे कॉक्रेटीकरण करण्यासाठी व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.५४ गांधीनगर अंतर्गत बापुनगर, तक्षशिलनगर, जरीपुरा व इतर या दलित वसाहती असून हा वार्ड ७० टक्के दलितांचा आहे. मनपास दलित वसाहतीसाठी प्राप्त होणारा निधी या वॉर्डासाठी मिळावा. करीता मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दलित वसाहतीसाठी मिळणाऱ्या निधीमधुन र.रु.५०.०० लक्षचा निधी वॉर्ड क्र.५४ गांधीनगरसाठी देण्याकरीता प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यास्तव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री. भादवे रामेश्वर बाबुराव **अनुमोदक:-** श्री.विजय साईनाथ औताडे

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५४ गांधीनगर अंतर्गत बापुनगर, तक्षशिलनगर, जरीपुरा व इतर दलित वसाहतीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझ्या वार्डामध्ये घोषीत तीन ठिकाणी दलित वस्ती आहे. १) प्रबुध्दनगर २) आम्रपाली नगर ३) बौध्दवाडा घोषीत वस्ती सुधार योजनेतून माझ्या वार्डातील प्रबुध्दनगर येथे सिमेंट रस्त्या करीता २० लक्ष रुपये आम्रपाली नगर करीता २० लक्ष रुपये व बौध्दवाडा करीता १० लक्ष रुपये सिमेंट रस्त्या करीता सदरील ठराव येणाऱ्या आगामी सभेत ठेवण्यात यावा व मंजुर झाल्यानंतर मा.जिल्हाधिकारी यांच्याकडें पुढील मंजुरीसाठी पाठविण्यात यावा.

**सुचक:-** श्री.अफसर खॉन यासीन खॉन. **अनुमोदक:-** श्री.रुपचंद वाघमारे

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे १) प्रबुध्दनगर २) आम्रपाली नगर ३) बौध्दवाडा या दलित वसाहतींमध्ये सिमेंट रस्त्यासाठी व आम्रपाली नगर तसेच बौध्दवाडा करीता महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.१११ प्रियदर्शनी इंदिरानगर, मध्ये येणाऱ्या दलित वसाहतीमध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत खालील कामाकरीता निधी प्राप्त होणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| अ क्र | कामाचे नाव | अंदाजे तरतुद |
|---|---|---|
| १) | वॉर्ड क्र.१११ धनगर गल्लीमध्ये कॉंक्रेट रस्ता तयार करणे. | १० लक्ष |
| २) | वॉर्ड क्र.१११ मध्ये विविध ठिकाणी थ्री-सेट लाईट व हायमास्ट बसविणे. | १० लक्ष |
| ३) | वॉर्ड क्र.१११ मध्ये विविध ठिकाणच्या नाल्याची दुरूस्ती व ढापे टाकणे. | १० लक्ष |
| ४) | वॉर्ड क्र.१११ इंदिरानगर येथे बबन शेंडगे यांच्या गल्ली कॉंक्रेट रस्ते तयार करणे. | १० लक्ष |
| ५) | वॉर्ड क्र.१११ पश्चिम इंदिरानगर विविध ठिकाणच्या गल्लीत कॉंक्रेट रस्ता तयार करणे. | १० लक्ष |

**सुचक:-** श्रीमती सलीमा बाबुभाई कुरैशी.

**अनुमोदक:-** श्री.जहांगीर खान अब्बास, श्री.सिद्दीकी नासेर तकियोद्दीन

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.१११ प्रियदर्शनी इंदिरानगर, मध्ये येणाऱ्या दलित वसाहतीमध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत प्रस्तावात दर्शविलेल्या अनुक्रमांक (१) ते (५) या विविध विकास कामांसाठी व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३६ नारेगाव, ब्रिजवाडी हा वॉर्ड जवळपास १००% दलित वसाहतीचा असून महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत रस्ते मजबुतीकरणासाठी ५० लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करण्यासाठी मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे प्रस्ताव पाठविण्यास्तव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप.

**अनुमोदक:-** श्रीमती स्वाती किशोर नागरे,श्रीमती मनिषा बालाजी मुंडे

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.३६ नारेगाव, ब्रिजवाडी या दलित वसाहतींमध्ये महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत रस्ते मजबुतीकरणासाठी व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.४६ नवाबपुरा येथील औरंगाबाद महानगरपालिकेचे आरोग्य केंद्र श्री.सय्यद रफत,रा.जिन्सी रोड, येथे यांच्या घरात भाड्याने होते. काही कारणास्तव त्यांनी सदर आरोग्य केंद्र रिकामे करण्यास सांगितल्याने सदर आरोग्य केंद्र हे शाहबाजार, वॉर्ड क्र.२४ येथे तात्पुरते स्थायिक झाले आहे. त्यामुळे नवाबपुरा वॉर्डातील लोकांना शाहबाजार येथे आरोग्य केंद्राचा लाभ घेण्यास फार गैरसोय येत आहे. यात प्रामुख्याने वयस्कर लोकांना,वृध्दांना,अपंगांना,महिलांना याचा फार त्रास होत आहे. नवाबपुरा या वॉर्डात जवळपास १५,००० लोकसंख्या आहे आणि या वॉर्डात प्रामुख्याने आरोग्य सुविधा नसल्याने येथील रहिवाश्यांना फार गैरसोय होत आहे.

करीता, शाहबाजार येथे तात्पुरते स्थायिक झालेले आरोग्य केंद्र परत वॉर्ड क्र.४६ नवाबपुरा येथे शहागंज जलकुंभासमोरील औरंगाबाद महानगरपालिकेचे शाळेमध्ये आरोग्य केंद्र कायम स्थायिक करून येथील रहिवाश्यांना पुर्वीप्रमाणे आरोग्य सोयी-सुविधा देऊन उपकृत करावे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.खान फेरोज मोईनोद्दीन
**अनुमोदक:-**श्रीमती सरिता अरुण बोर्डे,श्रीमती शेख समिना इलियास
मा.महापौर :- विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.४६ नवाबपुरा येथील औरंगाबाद महानगरपालिकेचे आरोग्य केंद्र शाहबाजार येथे तात्पुरते स्थायिक झालेले होते ते आरोग्य केंद्र परत वॉर्ड क्र.४६ नवाबपुरा येथे शहागंज जलकुंभासमोरील औरंगाबाद महानगरपालिकेचे शाळेमध्ये कायम स्थायिक करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०७ विटखेडा या वॉर्डात शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत या प्रभागातील मुलभूत नागरी सुविधा पुरविणेसाठी रक्कम रूपये १ कोटीचा निधी आवश्यक आहे.

करीता वॉर्ड क्र १०७ विटखेडा या वॉर्डात मुलभूत नागरी सुविधा पुरविण्यासाठी शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत रु.१ कोटीचा निधी उपलब्ध होणेसाठी मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविणेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे
श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.
मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र १०७ विटखेडा येथे मुलभूत नागरी सुविधा पुरविण्यासाठी शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या अनेक मालमत्तांची नोंद पीआर कार्डवर, सातबारा उताऱ्यावर महानगरपालिकेचे नाव आढळून येत नाही. अंदाजे जवळपास दोन ते तीन हजार कोटी रुपयाच्या मालमत्ता महानगरपालिकेच्या नावावर नाहीत. ही बाब गंभीर आहे. या बाबत वेळोवेळी प्रशासनाकडे वेगवेगळ्या स्तरावरून पाठपुरावा होऊनही हा प्रश्न निकाली निघु शकलेला नाही. यासाठी तज्ञ अधिकारी/कर्मचारी यांची आवश्यकता आहे.

करीता याबाबीचे गांर्भीय व आवश्यकता लक्षात घेता मा.विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत महसूल विभागाचे चार तलाठी व एक तहसिलदार यांची प्रतिनियुक्ती औरंगाबाद महानगरपालिकेत, पालिकेच्या नोंद न घेतलेल्या मालमत्तेच्या पीआर कार्डवर महापालिकेचे नाव लावून घेणेसाठी किमान एक वर्ष कालावधीसाठी प्रतिनियुक्ती घेणेबाबत कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :- विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेत पालिकेच्या नोंद न घेतलेल्या मालमत्तेच्या पीआर कार्डवर महापालिकेचे नाव लावून घेणेसाठी मा.विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत महसूल विभागाचे चार तलाठी व एक तहसिलदार यांना किमान एक वर्ष कालावधीसाठी प्रतिनियुक्तीवर घेणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ८३:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१०५ राहुलनगर सादात नगर या वसाहती घोषीत झोपडपट्टया असुन दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत विकास कामासाठी शासन अनुदान मिळण्यास पात्र आहे. सदर वसाहतीतील रस्त्यांचे कॉंक्रेटीकरण करण्यासाठी, ड्रेनेज लाईन टाकणे व गटारीचे बांधकाम इत्यादीसाठी सुमारे एक कोटी खर्च अपेक्षित आहे. वॉर्ड १०५ राहुलनगर सादातनगर दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत कमीत कमी एक करोड रुपये शासनाकडून वर नमुद केलेल्या विविध विकास कामासाठी अर्थसाहय मिळण्याचा प्रस्ताव शासनास/औरंगाबाद जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर.

**सुचक:-** श्री.अब्दुल नवीद अब्दुल रशीद.

**अनुमोदक:-** श्री.मोहम्मद अय्युब खान,श्री.शेख सोहेल शकील

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१०५ राहुलनगर सादात नगर या दलित वसाहतीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत रस्त्यांचे कॉंक्रेटीकरण करण्यासाठी, ड्रेनेज लाईन टाकणे व गटारीचे बांधकाम इत्यादीसाठी व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ८४:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, चिकलठाणा कामगार कॉलनी येथील हनुमान मंदिरा जवळील विमानतळाच्या भिंतीला लागुन जी मनपा मालकीची खुली जागा आहे. तेथे काही लोकांनी अतिक्रमण केलेले आहे. हे अतिक्रमण काढून तेथे उद्यान उभारण्यात यावे. जेणे करुन येथील नागरीकांना फिरण्यास व लहान मुलांना खेळण्यासाठी उपयोग होईल. तशी येथील नागरीकांची बऱ्याच दिवसापासून मागणी आहे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.सोहेल शकील शेख.

**अनुमोदक:-** श्री.भाऊसाहेब जगताप,श्रीमती वैशाली कारभारी जाधव

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा कामगार कॉलनी येथील हनुमान मंदिरा जवळील विमानतळाच्या भिंतीला लागुन असलेल्या मनपाच्या जागेवरील अतिक्रमण काढून तेथे उद्यान उभारण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.८२ अंबिकानगर मधील संतोषीमाता नगर ह्या वसाहतीमध्ये ७०% दलित समाज राहत असुन सदर ठिकाणी अंतर्गत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रेटीकरण करण्यासाठी ४० लाख रुपयेचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप **अनुमोदक:-** श्रीमती अनिता मोहन साळवे.

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.८२ अंबिकानगर मधील संतोषीमाता नगर अंतर्गत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रेटीकरण करण्यासाठी व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.९० राजनगर मुकूंदनगर अंतर्गत विविध भागात अद्याप पर्यंत रस्त्याचे काम करण्यात आलेले नाही. सदरील वार्ड हा नविन वार्ड आहे.या भागात सर्वात जास्त गरीब व हातावर काम करणारे नागरीक राहतात. या भागात अनुसूचित जातीचे सुमारे ८०% पेक्षा जास्त नागरीक आहेत. या भागात अद्याप महानगरपालिकेने कोणत्याच सुविधा दिलेल्या नाही. या भागात रस्ते व ड्रेनेज लाईन नसल्याने परिसरातील नागरिकांची अत्यंत गैरसोय होत आहे.

करीता या भागातील रस्ते खडीकरण व मजबुतीकरण करणे तसेच नविन ड्रेनेज लाईन टाकणेसाठी अंदाजे रक्कम रुपये १.०० कोटी आवश्यक आहे. करीता सदरील कामे करण्यासाठीचा दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत निधी प्राप्त होणे करीता प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे पाठविणे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती अनिता मोहन साळवे. **अनुमोदक:-** श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.९० राजनगर मुकूंदनगर अंतर्गत विविध भागातील रस्ते खडीकरण व मजबुतीकरण करण्यास तसेच नविन ड्रेनेज लाईन टाकणेसाठी दलित वस्ती

सुधार योजनेअंतर्गत व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.९४,गजानन नगर न्यु हनुमान नगर,भारत नगर व दुर्गेश नगर या भागातील दलित वस्तीमध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत सिमेंट रस्ते तयार करण्यासाठी पन्नास लाख रुपये निधी उपलब्ध करून देण्यात यावा. त्यानुषंगाने प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यात यावा. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.आत्माराम माणिकराव पवार **अनुमोदक:-** श्री. गजानन भानुदास मनगटे

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.९४,गजानन नगर, न्यु हनुमान नगर,भारत नगर व दुर्गेश नगर या भागात शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत सिमेंट रस्ते तयार करण्यासाठी व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१०, रोजेबाग हा भाग ५०% पेक्षा अधिक दलित वस्तीचा आहे. सदरील भागात दलित सुधार योजनेअंतर्गत सिध्दार्थनगर,रोजेबाग हया भागात जागोजागी पथदिवेसाठी अंदाजीत खर्च रक्कम रु.१० लक्ष व गटार बांधणीसाठी व त्यावर ढापे टाकण्यासाठी रक्कम रु.२० लक्ष मंजुरीसाठी मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा, करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले **अनुमोदक:-** श्री.सीताराम इसराम सुरे

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१०, रोजेबाग भागात महाराष्ट्र शासनाच्या दलित सुधार योजनेअंतर्गत सिध्दार्थनगर,रोजेबाग येथे जागोजागी पथदिवे बसविण्यासाठी व गटार बांधणी तसेच त्यावर ढापे टाकण्यासाठी व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.१०, रोजेबाग हा भाग मोठा असुन त्यात २ स्लम वसाहती आहेत, परंतु हया भागात आरोग्य केंद्र नाही. या भागातील नागरीकांच्या आरोग्य विषयक समस्या सोडविण्यासाठी नागरीकांना आरोग्यसेवा मिळण्यासाठी महानगरपालिकेच्या

मोठ्या आरोग्य केंद्राची आवश्यकता आहे, तरी या भागात अद्यावत सर्व सुविधांनी युक्त महानगरपालिकेचे पूर्णवेळ आरोग्य केंद्र तात्काळ सुरु करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले **अनुमोदक:-** श्री.सीताराम इसराम सुरे

मा.महापौर :- विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.१०, रोजेबाग या भागात नागरीकांच्या आरोग्य विषयक समस्या सोडविण्यासाठी अद्यावत सर्व सुविधांनी युक्त महानगरपालिकेचे पूर्णवेळ आरोग्य केंद्र सुरु करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ९०:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझ्या वार्डात रोजेबाग हया परिसरातील उर्दु म.न.पा.ची शाळा असुन सदरील शाळेच्या इमारतीतील संपूर्ण वर्ग (खोल्या) हया पावसाच्या पाण्यामुळे गळत आहेत, त्यामुळे विद्यार्थ्यांना अत्यंत त्रास होत आहे तरी सदरील इमारती गळती थांबविणेसाठी इमारत दुरुस्ती करणे आवश्यक आहे व सदरील शाळेस बऱ्याच वर्षापासून रंगरंगोटी झालेली नाही. तरी सदरील शाळेची इमारत दुरुस्ती व रंगरंगोटी करणे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले **अनुमोदक:-** श्री.सीताराम इसराम सुरे

मा.महापौर :- विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.१० रोजेबाग हया परिसरातील महानगरपालिकेच्या उर्दु शाळेची इमारत दुरुस्ती व रंगरंगोटी करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ९१:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.४१ रहेमानिया कॉलनी मधील येणाऱ्या दलित वसाहतीमध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत (१) यशोधरा कॉलनी येथील समाज मंदिराचे विविध कामे करणे व सिमेंट रस्ता तयार करणे-४० लक्ष रुपये. (२) तक्षशिला नगर मधील समाज मंदिराचे विविध कामे करणे व सिमेंट रस्ता तयार करणे-३५ लक्ष रुपये उपरोक्त ठिकाणी सदरील कामे करण्यासाठी रुपये ७५ लक्षाचे निधी प्राप्त होणेसाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठविणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.खान इरशाद इब्राहीम

**अनुमोदक:-** श्रीमती सरिता अरुण बोर्डे, श्री.फेरोज खान मोईनोद्दीन खान

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.४१ रहेमानिया कॉलनी मधील दलित वसाहतीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत (१) यशोधरा कॉलनी येथील समाज

मंदिराचे विविध कामे करणे व सिमेंट रस्ता तयार करणेसाठी तसेच (२) तक्षशिला नगर मधील समाज मंदिराचे विविध कामे करणे व सिमेंट रस्ता तयार करणेसाठी व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.२० मधील येणाऱ्या दलित वसाहतीमध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत १) जयभिमनगर येथे जयभिमगेट ते डॉ.असद क्लिनिक पर्यंत सिमेंट कॉंक्रेट करणे २० लक्ष रुपये. २) टाऊन हॉल जयभिमनगर येथे श्री.जगताप यांच्या गल्लीत सिमेंट कॉंक्रेट रस्ता तयार करणे-१५ लक्ष रुपये ३) वार्ड क्र.२० गुलाबवाडी येथील गल्ल्यांमध्ये सिमेंट कॉंक्रेट रस्ता तयार करणे-१५ लक्ष रुपये उपरोक्त ठिकाणी सदरील कामे करण्यासाठी रुपये ५० लक्षाची निधी प्राप्त होणेसाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठविणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.सय्यद मतीन रशीद.**अनुमोदक:-** श्री.खान इरशाद इब्राहीम, श्री.गंगाधर नामदेव ढगे

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.२० मधील दलित वसाहतीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत १) जयभिमनगर येथे जयभिमगेट ते डॉ.असद क्लिनिक पर्यंत सिमेंट कॉंक्रेट करणेसाठी, २) टाऊन हॉल जयभिमनगर येथे श्री.जगताप यांच्या गल्लीत सिमेंट कॉंक्रेट रस्ता तयार करणेसाठी तसेच ३) वार्ड क्र.२० गुलाबवाडी येथील गल्ल्यांमध्ये सिमेंट कॉंक्रेट रस्ता तयार करणेसाठी व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.८३ मुकूंदवाडी ए-१ हॉटेल ते हनुमान मंदिर मार्गे इच्छामनी हॉटेल पर्यंत जुन्या गावातील मुख्य रस्ता असून या रस्त्यास छत्रपती शिवाजी महाराज मार्ग असे नाव देण्यात यावे व नावाचा फलक लावणे करीता सदर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती कमल रामचंद्र नरोटे **अनुमोदक:-** श्री.नितीन रमन चित्ते

मा.महापौर :- विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.८३ मुकूंदवाडी येथील ए-१ हॉटेल ते हनुमान मंदिर मार्गे इच्छामनी हॉटेल पर्यंत जुन्या गावातील मुख्य रस्त्यास छत्रपती शिवाजी महाराज मार्ग असे नाव देण्यास तसेच छत्रपती शिवाजी महाराज नावाचा फलक लावण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.४९ भडकल गेट-बुढ्ढीलेन मध्ये येणाऱ्या दलित वसाहतीमध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत (१) वॉर्ड क्र.४९ काजीवाडा येथे सामाजिक सभागृह बांधणे-४० लक्ष रुपये (२) वॉर्ड क्र.४९ काजीवाडा येथील अंतर्गत रस्ते सिमेंट कॉंक्रेट करणे-४० लक्ष रुपये उपरोक्त ठिकाणी सदरील कामे करण्यासाठी रुपये ८० लक्षाचे निधी प्राप्त होणेसाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठविणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे

**अनुमोदक:-** श्री. खान इरशाद इब्राहिम, श्रीमती सलीमा बाबू कुरेशी

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.४९ भडकल गेट-बुढ्ढीलेन येथील दलित वसाहतीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत (१) वॉर्ड क्र.४९ काजीवाडा येथे सामाजिक सभागृह बांधणेसाठी तसेच (२) वॉर्ड क्र.४९ काजीवाडा येथील अंतर्गत रस्ते सिमेंट कॉंक्रेट करणेसाठी व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भडकल गेट ज्युब्लीपार्क येथे स्वर्गीय ज्येष्ठ पत्रकार रफीक शहेबाज यांच्या नावानी सात वर्षापुर्वी वाचनालयाची परवानगी देण्यात आली होती. त्यानुसार वाचनालय सुरू करण्यात आले होते परंतु सात वर्षापासून आज पर्यंत तेथे कोणत्याही प्रकारचे फर्निचर नाही, रंगरंगोटी, पुस्तके व कोणतेही कर्मचारी नाही तसेच वाचनालयामध्ये कुत्र्याचा वास आहे. तेथे मुले लघवी करतात, ही बाब अत्यंत दयनिय असून पत्रकारावर अन्याय आहे.

करीता सदर वाचनालयाकरीता रंगरंगोटी करणे, नवीन फर्निचर व पाठ्यपुस्तके खरेदी करणे, नवीन नाव फलक लावणे व वाचनालयाची दुरूस्ती करणेसाठी प्रशासनाने दहा लक्ष रुपये उपलब्ध करून द्यावे व सदर वाचनालयामध्ये कर्मचारी वर्ग द्यावा करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.जमीर अहेमद कादरी **अनुमोदक:-**श्रीमती नर्गीस सलीम शेख

मा.महापौर :नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भडकल गेट, ज्युब्लीपार्क येथील स्वर्गीय ज्येष्ठ पत्रकार रफीक शहेबाज वाचनालयाची रंगरंगोटी करणे, नवीन फर्निचर व पाठ्यपुस्तके खरेदी करणे, नवीन नाव फलक लावणे व दुरूस्ती करणे इत्यादी कामासाठी रक्कम रुपये १० लक्ष च्या खर्चास व सदर वाचनलयामध्ये कर्मचारी देण्यास नियमाने कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.१०९ देवानगरी प्रतापनगर या प्रभागातील दलित वसाहतीमध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सिमेंट रस्ते तयार करण्यासाठी रक्कम रुपये ४० लक्ष निधी उपलब्ध करून देण्यात यावा. त्यानुषंगाने प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यात यावा. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती शोभा गुरूलिंगप्पा बुरांडे

**अनुमोदक:-** श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे,श्री. कचरु छगनराव घोडके.

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.१०९ देवानगरी प्रतापनगर या प्रभागातील दलित वसाहतीमध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सिमेंट रस्ते तयार करण्यासाठी व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहाबाजार अशोकनगर, शासन अधिकृत दलित वस्ती या ठिकाणी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत १) कॉंक्रेटिंग पायवाटा बांधणे विविध ठिकाणी - २५ लक्ष रुपये.२) नाल्याची भिंती बांधणे - १० लक्ष रुपये, ३) जलनि:सारण वाहिनी टाकणे - १२ लक्ष रुपये तसेच त्रिवेणीनगर शहाबाजार वॉर्ड क्र.२४ या ठिकाणी १) कॉंक्रेटिंग पायवाटा बांधणे - २० लक्ष रुपये, २) जलनि:सारण वाहिनी टाकणे - १० लक्ष रुपये, ३) नाल्याची सफाई व सुरक्षित भिंती बांधणे - १५ लक्ष रुपये. या दोन्ही शासन अधिकृत दलित वस्त्यांमध्ये विकास करण्याकरीता कामे करण्याकरीता दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत अनुदान मिळण्याकरीता प्रस्ताव मंजुर मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सरवत बेगम आरेफ हुसैनी. **अनुमोदक:-**श्री.अजीम अहमद खान

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहाबाजार अशोकनगर येथे महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत १) विविध ठिकाणी कॉंक्रेटिंग पायवाटा बांधणेसाठी २) नाल्याची भिंती बांधणेसाठी ३) जलनि:सारण वाहिनी टाकणेसाठी तसेच त्रिवेणीनगर शहाबाजार वॉर्ड क्र.२४ या ठिकाणी १) कॉंक्रेटिंग पायवाटा बांधणेसाठी २) जलनि:सारण वाहिनी टाकणेसाठी ३) नाल्याची सफाई व सुरक्षित भिंती बांधणेसाठी व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय,या कार्यालयामार्फत दिनांक १८.०६.२०१५ रोजीचे शासन निर्णय प्रमाणे राज्यातील अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रात मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून अल्पसंख्यांक समुदायाचा एकंदर जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी या विभागाकडून या योजनेअंतर्गत अनुदान १० लक्ष रुपये वॉर्ड क्र.२४ शहाबाजार यासाठी शासन निर्णय परिच्छेद-अ-ii चे परिपुर्ती करीत आहे. करीता प्रस्ताव मंजुर करून शहाबाजार वॉर्ड क्र २४ या ठिकाणी दोन कब्रस्तान दुरूस्ती करण्यास महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभागाचे दिनांक १८.०६.२०१५ रोजी शासन निर्णय योजनेप्रमाणे १० लाख रुपये कब्रस्तान दुरूस्ती करण्यास प्रस्ताव मा.सर्वसाधाण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सरवत बेगम आरेफ हुसैनी. **अनुमोदक:-**श्री.विकास प्रकाश एडके

मा.महापौर :- विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२४ शहाबाजार येथे महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभागाचे दिनांक १८.०६.२०१५ रोजी शासन निर्णयाप्रमाणे दोन कब्रस्तानाच्या दुरूस्तीसाठी रक्कम रुपये १० लक्षचा निधी उपलब्ध होण्याकरीता प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक-८९ चिकलठाणा या प्रभागातील दलित वसाहतीमध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विविध विकास कामे करण्यासाठी रक्कम रुपये ४० लक्ष निधी उपलब्ध करून देण्यात यावा. त्यानुषंगाने प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यात यावा. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधाण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती ज्योती सुनिल नाडे **अनुमोदक:-** श्री.नितीन रमन चित्ते

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्रमांक-८९ चिकलठाणा या प्रभागातील दलित वसाहतीमध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विविध विकास कामे करण्यासाठी व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १००:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.९५ मध्ये विजय नगर, भारत नगर, अजिंक्य नगर इत्यादी भागामध्ये दलीत वस्ती आहे. त्या भागात विविध विकास कामे करण्याकरीता नागरी दलीत वस्ती सुधार योजनेअंतर्गत रु.५० लाखाच्या निधीचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यात यावा. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती ज्योती राजाराम मोरे

**अनुमोदक:-** श्रीमती विधाते अंकिता अनिल,श्री.गजानन भानुदास मनगटे.

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.९५ विजय नगर, भारत नगर, अजिंक्य नगर इत्यादी भागामध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विविध विकास कामे करण्याकरीता व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा वार्ड क्र.४३ शरीफ कॉलनी या ठिकाणी अराफात कब्रस्तान याची दुरुस्ती करण्याकरीता महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय या मार्फत दिनांक १८.६.२०१५ रोजीचे शासन निर्णयाप्रमाणे राज्यातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात मुलभुत नागरी सुविधा उपलब्ध करुन अल्पसंख्यांक समुदायांचा एकंदर जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी या विभागाकडुन या योजने अंतर्गत अनुदान १० ते १५ लाख रुपये वार्ड क्र.४३ शरीफ कॉलनीस मिळण्यास शासन निर्णय परिच्छेद अ ii परिपुर्तीकरिता सदर प्रस्ताव मंजुर करुन शरीफ कॉलनी वार्ड क्र.४३ दिलेले ठिकाणी कब्रस्तान दुरुस्ती करण्यास महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक विकास विभागाचे दिनांक १८.६.२०१५ रोजीचे शासन निर्णय योजने प्रमाणे १० ते १५ लाख रुपये कब्रस्तान दुरुस्ती करण्यास प्रस्ताव मंजुर करण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.अजीम अहेमद खान **अनुमोदक:-**श्री.खान इरशाद इब्राहिम

मा.महापौर :- विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४३ शरीफ कॉलनी येथील अराफात कब्रस्तानाची दुरुस्ती करण्याकरीता महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय या मार्फत दिनांक १८.६.२०१५ रोजीचे शासन निर्णयाप्रमाणे रक्कम रुपये १० ते १५ लक्षचा निधी उपलब्ध होणेकरीता प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.३३ मिसरवाडी, हा वॉर्ड दलित वसाहत असल्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने निधी अंतर्गत जुनी मिसरवाडी व श्रीकृष्णनगर येथे ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी ३० लक्ष निधी व मिसरवाडी वॉर्डात विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रेटचे रस्ते तयार करण्यासाठी ५० लक्ष निधी असा एकूण ८० लक्ष निधी उपलब्ध होण्याकरीता मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे हा प्रस्ताव पाठविण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती शबनम बेगम कलीम कुरैशी **अनुमोदक:-**श्रीमती खतीजाबी छोटु कुरेशी.

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.३३ मिसरवाडी येथे महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत जुनी मिसरवाडी व श्रीकृष्णनगर येथे ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी व मिसरवाडी वॉर्डात विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रेटचे रस्ते तयार करण्यासाठी व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कमल तलावाचे काम सुरु असतांना त्यामध्ये तलावाच्या बाजुने जात असतांना सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारची सुचना फलक लावले नसल्याने व सुरक्षा केली नसल्याने त्या तलावात पाय घसरुन आकाश विठ्ठल पगारे, या युवकाचा तलावात बुडुन मृत्यू झालेला आहे. सदरील युवकास एक वर्षाची एक छोटी मुलगी आहे. कुटुंबाची सर्व जबाबदारी त्याच युवकावर होती. त्या युवकाचा मृत्यू झाल्याने त्याच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आलेली आहे. सदरील युवकाच्या घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे.

करीता सदरील युवकाच्या परिवारास महानगरपालिकेतर्फे रक्कम रु.०२.०० लक्षची मदत करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे **अनुमोदक:-** श्री.जहॉंगीर खान मुलानी

श्री.गंगाधर ढगे :संबधीत व्यक्तीच्या मागे पत्नी मुले व वयोवृध्द आई वडील आहे त्यामूळे त्यांचे पत्नीस रोजदारीवर कामावर घेण्यात यावे. तसेच हर्सुल तलावात मृत्यू झालेल्यांना मदत देण्याचा ठराव घेतला होता मदत दिली नाही.

मा.महापौर :नियमानुसार आर्थीक मदत देण्यात यावी. **आता १२० पर्यंत सर्व विषय मंजूर**.

श्री.नंदकुमार घोडेले :अनेक सदस्यांना विषयपत्रिका मिळाली नाही.

मा.उपमहापौर :स.सदस्यांना विषयपत्रिकामिळाली नाही.प्रत्येक सदस्यांचा ई-मेल आयडी घेण्यात यावा.त्यानुसार विषयपत्रिका पाठविण्यात यावी.ज्यांना मिळाले नाही त्यांना या माध्यमातून मिळेल.

मा.महापौर :सुचना विचारात घेवून कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कमल तलावामध्ये बुडून मृत्यु पावलेल्या आकाश विठ्ठल पगारे या युवकाच्या परिवारास महानगरपालिकेतर्फे आर्थिक मदत करण्यासाठी प्रशासनाने नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,

१. वार्ड क्र.८५ हा स्लम घोषित असुन या भागात अपुरी विद्युत व्यवस्था व मोडकळीस आलेले पथदिवे यामुळे येथील नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. संजयनगर,मुकूंदवाडी अंतर्गत भागात विद्युत व्यवस्था करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत रक्कम रु.७० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडे शिफारस करण्यास्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर. तसेच

सोडियम व्हेपर फिटींग लावणे व वार्डातील विविध भागातील धोकादायक कंडटक्टर काढुन भुमिगत केबल टाकणे किंवा बंच वायर टाकणे.

२. वार्ड क्र.८५ हा स्लम घोषित असुन या भागातील संजयनगर, मुकूंदवाडी येथे असलेले मनपा प्रा.शाळा व आरोग्य केंद्राची इमारत मोडकळीस आले असुन तसेच कंपाऊन्ड वॉल व इमारत दुरुस्त करणे आवश्यक आहे. त्यामुळे नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असुन मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत या स्वच्छता गृहाची तात्काळ दुरुस्ती करण्यासाठी एकुण ५० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडे शिफारस करण्यास्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

३. वार्ड क्र.८५,संजयनगर, मुकूंदवाडी वार्डातील पाण्याची टाकी खुप जुनी झालेली असुन ती पूर्णपणे मोडकळीस आल्याने धोकादायक स्थितीत आहे. करिता त्वरीत दुरुस्तीचे काम करण्यात यावे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सुनिता रामराव चव्हाण

**अनुमोदक:-**श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे,श्रीमती लता मगन निकाळजे

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे (१) वार्ड क्र.८५ मधील संजयनगर,मुकूंदवाडी अंतर्गत विद्युत व्यवस्था करणे तसेच सोडियम व्हेपर फिटींग लावणे व वार्डातील विविध भागात भुमिगत केबल टाकणे किंवा बंच वायर टाकणे या कामासाठी (२) वार्ड क्र.८५ मधील संजयनगर, मुकूंदवाडी येथे असलेले मनपा प्रा.शाळा व आरोग्य केंद्राची मोडकळीस आलेली इमारत,कंपाऊंड वॉल,स्वच्छतागृहाची दुरुस्ती करण्यासाठी (३) वार्ड क्र.८५,संजयनगर, मुकूंदवाडी वार्डातील मोडकळीस आलेल्या पाण्याच्या टाकीची दुरूस्ती करण्यास व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, चेतनानगर म्हाडा कॉलनी, राजनगर तलाव परिसर,जहागीर कॉलनी, एकतानगर,वानखेडे नगर,अंबर हिल या भागात वैद्यकीय सर्वेसाठी रुग्णालय नसल्याने ५० ते ६० हजार नागरीकांना वैद्यकीय सेवेपासुन वंचीत राहावे लागत आहे.

करिता एन.यु.एच.एम. अंतर्गत सर्वे नंबर २१६ मधील ले-आऊट मधील प्लॉट नंबर ७८ मध्ये रुग्णालय बांधणे बाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती ज्योती जयेश अभंग

**अनुमोदक:-**श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ,श्री.रुपचंद लक्ष्मण वाघमारे.

मा.महापौर :- विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चेतनानगर म्हाडा कॉलनी, राजनगर तलाव परिसर,जहागीर कॉलनी, एकतानगर,वानखेडे नगर,अंबर हिल या भागात एन.यु.एच.एम. अंतर्गत सर्वे नंबर २१६

मधील ले-आऊट मधील प्लॉट नंबर ७८ मध्ये रुग्णालय बांधण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१०१ व १०२ हे दोन्ही प्रभाग स्लम घोषीत असुन या भागात मोठ्या प्रमाणावर दलित कष्ठकारी समाज मोठया संख्येने राहत असुन येथील नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने या दोन्ही वार्डाच्या लोकसंख्येचा विचार करुन या भागात मनपा तर्फे प्राथमीक आरोग्य केंद्र तात्काळ सुरु करण्यात यावे यासाठी मनपाची जागा उपलब्ध आहे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे,

**अनुमोदक:-** श्रीमती लता मगन निकाळजे,श्रीमती सुनिता रामराव चव्हाण.

मा.महापौर :- विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१०१ व १०२ या भागातील नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महानगरपालिकेतर्फे प्राथमीक आरोग्य केंद्र महानगरपालिकेच्या उपलब्ध असलेल्या जागेवर सुरु करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१०१ व १०२ हे दोन्ही प्रभाग स्लम घोषीत असुन या भागात मोठ्या प्रमाणावर दलित कष्ठकारी समाज मोठया संख्येने राहत असुन येथील नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने या दोन्ही वार्डाच्या लोकसंख्येचा विचार करुन या भागात मनपा तर्फे प्राथमीक आरोग्य केंद्र तात्काळ सुरु करण्यात यावे यासाठी मनपाची जागा उपलब्ध आहे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती लता मगन निकाळजे

**अनुमोदक:-**श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे,श्रीमती सुनिता रामराव चव्हाण

मा.महापौर :- विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१०१ व १०२ या भागातील नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महानगरपालिकेतर्फे प्राथमीक आरोग्य केंद्र महानगरपालिकेच्या उपलब्ध असलेल्या जागेवर सुरु करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.७९, न्यायनगर वार्डामध्ये फॉरेस्ट कॉलनी,येथे मनपाची खुली जागा आहे.तरी वार्डाच्या आजुबाजुला सर्व गुंठेवारी दलित स्लम वस्ती असल्याने नागरीकांना आरोग्य केंद्राची गरज आहे. वार्ड क्र.७९ न्यायनगर फॉरेस्ट कॉलनी येथे मनपातर्फे आरोग्य केंद्र सुरु करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे. **अनुमोदक:-**श्री.नितीन दशरथ साळवी

मा.महापौर :- विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.७९, न्यायनगर वार्डामध्ये फॉरेस्ट कॉलनी, येथे महानगरपालिकेया खुल्या जागेवर महानगरपालिकेतर्फे आरोग्य केंद्र सुरु करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.११२ शिवाजी नगर रेल्वे गेट येथे नेहमी वाहतुकीची मोठया प्रमाणावर कोडी होत असते. त्यामुळे या ठिकाणी मोठया प्रमाणावर अपघात होत आहे या ठिकाणी रस्त्याच्या दोन्ही बाजुला वाहने उभी राहत असल्यामुळे वाहतुकीच्या कोडीत भर पडत आहे. तरी शिवाजीनगर रेल्वे गेट ते घुले हॉस्पीटल येथिल रोडला नो पार्कीग झोन घोषीत करावा. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ. **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :- विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.११२ शिवाजीनगर रेल्वे गेट ते घुले हॉस्पीटल येथील रोडला नो पार्कीग झोन घोषीत करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भावसिंगपुरा, भिमनगर येथील सुरु असलेली महानगरपालिकेची शाळा ही इयत्ता ७ वी पर्यंत असुन या शाळेत इयत्ता ८ वी,९वी व १० वी पर्यंत वर्ग चालु करण्यात यावे जेणे करुन या शाळेचा शिक्षणाचा दर्जा सुधारता येऊ शकतो. या भागामध्ये २० ते २५ हजार लोकवस्ती असल्यामुळे या भागात गरीब कष्टकरी मजुर, शेतकरी या कुटूंबातील मुला-मुलींना चांगले शिक्षण देऊन महानगरपालिका शाळेकडे इतरांचा नाकारतेपणाचा दृष्टीकोन बदलता येऊ शकतो. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती मनिषा विनोद लोखंडे **अनुमोदक:-**श्री.नितीन दशरथ साळवी

मा.महापौर :- विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भावसिंगपुरा, भिमनगर येथे सुरु असलेल्या महानगरपालिकेच्या शाळेत इयत्ता ८ वी, ९वी व १० वी पर्यंत वर्ग सुरू करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १११:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासनाच्या दलित सुधार योजने अंतर्गत वार्ड क्र.११२ शिवाजीनगर येथील विविध दलित वस्त्यांतील रस्त्यांचे खडीकरण, रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्यासाठी रक्कम रु.१ कोटी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडे शिफारस करण्यास्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.११२ शिवाजीनगर येथे महाराष्ट्र शासनाच्या दलित सुधार योजने अंतर्गत रस्त्यांचे खडीकरण, रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्यासाठी व

प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१०१ हा स्लम घोषीत असून या भागातील फुलेनगर व मिलींद नगर येथे असलेले सार्वजनिक स्वच्छतागृह हे पुर्णपणे मोडकळीस आले असुन त्यामुळे नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असुन मोठया प्रमाणावर गैरसोय होत आहे. महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत या स्वच्छता गृहाची तात्काळ दुरुस्ती करण्यासाठी एकूण ३० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडे शिफारस करण्यास प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती लता मगन निकाळजे

**अनुमोदक:-**श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे,श्रीमती सुनिता रामराव चव्हाण

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१०१ येथील फुलेनगर व मिलींद नगर येथे असलेल्या सार्वजनिक स्वच्छतागृहाची दुरुस्ती करण्यासाठी शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१०१ हा स्लम घोषीत असुन या भागात अपुरी विद्युत व्यवस्था व मोडकळीस असलेले पथदिवे यामुळे येथील नागरिकांची मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे. एकनाथनगर,फुलेनगर,मिलींदनगर अंतर्गत भागात विद्युत व्यवस्था करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत रक्कम रु.३० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडे शिफारस करण्यास्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती लता मगन निकाळजे

**अनुमोदक:-**श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे,श्रीमती सुनिता रामराव चव्हाण

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१०१ येथील एकनाथनगर, फुलेनगर, मिलींदनगर अंतर्गत भागात विद्युत व्यवस्था करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१०२ हा स्लम घोषीत असुन या भागात अपुरी विद्युत व्यवस्था व मोडकळीस असलेले पथदिवे यामुळे येथील नागरिकांची मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे. कबीर नगर, मिलींदनगर अंतर्गत भागात विद्युत व्यवस्था करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत रक्कम रु.४० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडे शिफारस करण्यास्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे,

**अनुमोदक:-** श्रीमती लता मगन निकाळजे,श्रीमती सुनिता रामराव चव्हाण.

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१०२ कबीर नगर, मिलींदनगर अंतर्गत भागात विद्युत व्यवस्था करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१०२ हा स्लम घोषीत असुन या भागातील नागसेननगर, कबीर नगर, मुरलीधरनगर व मिलींदनगर येथे असलेले सार्वजनिक स्वच्छतागृह हे पूर्ण पणे मोडकळीस अले असून त्यामुळे नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असुन मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे. महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत या स्वच्छता गृहाची तात्काळ दुरुस्ती करण्यासाठी एकुण ३५ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडे शिफारस करण्यास्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे,

**अनुमोदक:-** श्रीमती लता मगन निकाळजे,श्रीमती सुनिता रामराव चव्हाण.

श्री.राजू शिंदे :-दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ज्या वस्त्या दलित वस्तीमध्ये बसतात ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा सर्व वस्त्यांमध्ये समप्रमाणात निधी वाटप व्हावा. या दुरुस्तीसह असे सर्व विषय मंजुर करावेत.

मा.महापौर :-दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१०२, नागसेननगर, कबीर नगर, मुरलीधरनगर व मिलींदनगर येथील सार्वजनिक स्वच्छतागृहाची दुरुस्ती करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत व प्रत्येक वार्डातील दलीत वस्तीमध्ये नियमाप्रमाणे व समप्रमाणात निधी मिळण्याकरीता शासनास शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळीचे विषय

**विषय क्रमांक ११६:-**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,घनकचरा संकलनाच्या कामासाठी सद्यस्थितीत महानगरपालिकेकेडे स्वतःचे ४० ॲपे ॲटोटिप्पर्स व १८ महिंद्रा मॅक्झीमो हॉपर्स असे एकुण ५८ हायड्रोलिक हॉपर्स कार्यरत आहेत.तथापी शहरातील एकुण ११३ निवडणुक प्रभागांसाठी व नव्याने महानगरपालिकेत समाविष्ठ करण्यात आलेल्या सातारा-देवळाई परिसरातील घनकचरा संकलनाच्या कामासाठी सदरील ५८ हायड्रोलिक हॉपर्स कमी पडत असल्यामुळे ४७ लोडींग ॲटो किरायाने घेण्यात आले आहेत. मात्र किरायाने घेण्यात आलेल्या लोडींग ॲटोला हायड्रोलिक सिस्टीम नसल्यामुळे घनकचरा अनलोड करण्यासाठी मानवी हाताने घनकच-याची हाताळणी करावी लागत आहे.

प्रत्येक निवडणुक प्रभागासाठी एक हायड्रोलिक हॉपर उपलब्ध करुन दिल्यास, एम.एस.डब्ल्यु नियम-२००० प्रमाणे घनकचरा संकलनाचे काम करणे शक्य होणार आहे. हायड्रोलिक हॉपरद्वारे घरोघरी घनकचरा संकलन करणे व हायड्रोलिक सिस्टीमद्वारे कंटेनर मध्ये अनलोड करणे ही कामे कमीत कमी मनुष्यबळाद्वारे व घनकच-याची मानवी हाताने हाताळणी न करता करणे शक्य होणार आहे. त्यासाठी ६० नग हायड्रोलिक हॉपर्स खरेदी करणे गरजेचे आहे.

हायड्रोलिक हॉपर्स खरेदीसाठी खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

१) महिंद्रा मॅक्झीमो प्लस चेसीस खरेदी (शासकीय दर) : रुपये ३५९२९८/- प्रतिनग
२) १.८ घ.मी. क्षमतेच्या हायड्रोलिक हॉपरची उभारणी करणे : रुपये २०३२००/- प्रतिनग
एकुण : रुपये ५,६३,१९८/- प्रतिनग

उपरोक्त अंदाजपत्रकीय दराने ६० नग हायड्रोलिक हॉपर्स खरेदी करण्यासाठी रुपये ३,३७,९१,८८०/- खर्च अपेक्षीत आहे. अंदाजपत्रकीय दरास व घनकचरा संकलनाच्या कामासाठी ६० नग हायड्रोलिक हॉपर्स खरेदी करण्यास मान्यता प्राप्त झाल्यास निधी उपलब्धतेसाठी जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल. करीता ६० नग हायड्रोलिक हॉपर्स खरेदी करणे बाबत प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर :-ऐनवेळीचा विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घनकचरा संकलनाच्या कामासाठी ६० नग हायड्रोलिक हॉपर्स खरेदी करण्यासाठी रुपये ३,३७,९१,८८०/- च्या खर्चास तसेच निधी उपलब्धतेसाठी जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११७:-**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहरात दररोज उत्पत्ती होणारा ४५० मेट्रीक टन घनकचरा वाहतुक करण्यासाठी खालील प्रमाणे वाहनांची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

| वार्ड | स्कीप लोडर | हुक लोडर | मनपा ट्रक/ टिप्पर्स | खाजगी टिप्पर्स /ट्रॅक्टर्स | मोठी वाहने | मनपा ॲटोटिप्पर्स/ हॉपर्स | खाजगी ॲटो लोडींग | एकुण ॲटोटिप्पर्स/ लोडींग/ हॉपर्स |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | १<br>१० बिन्स | २<br>९ कंटेनर | ६ | २ टिप्पर<br>२ ट्रॅक्टर | १३ | ०८<br>दुपारपाळी-१ | १२ | १८<br>दुपारपाळी-१ |
| ब | १<br>१० बिन्स | १<br>८ कंटेनर | ४ | १० ट्रॅक्टर्स | १६ | १०<br>दुपारपाळी-१ | ०९ | १९<br>दुपारपाळी-१ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | १<br>१० बिन्स | १<br>७ कंटेनर | ५ | २ टिप्पर्स | ०९ | ०९ | ०९ | १७ |
| ड | १<br>१० बिन्स | १<br>८ कंटेनर | ३ | ३ टिप्पर्स | ०८ | १०<br>दुपारपाळी-२ | ०४ | १४<br>दुपारपाळी-२ |
| इ | १<br>१० बिन्स | १<br>७ कंटेनर | ५ | १ टिप्पर<br>४ ट्रॅक्टर | १२ | १० | ०६ | १६ |
| फ | २<br>(१५ बिन्स | १<br>९ कंटेनर | ५ | ३ टिप्पर<br>१ ट्रॅक्टर | १२ | ११ | ०७ | १४ |
| एकुण वाहने | ०७ | ०७ | २८ | १२ टिप्पर्स<br>१७ ट्रॅक्टर | ७० | स.-- ५८<br>दु --०४ | ४७ | स.-- १०५<br>दु -- ०४ |

शहरात दररोज संकलीत होणा-या जवळपास साडेचारशे मेट्रीक टन घनकच-याचे संकलन व वाहतुक करण्यासाठी महानगरपालिकेची यंत्रणा कमी पडत असल्यामुळे वार्ड अधिकारी यांच्या मागणी नुसार सध्या एकुण १७ खाजगी ट्रॅक्टर्स किरायाने लावण्यात आलेले आहेत. सध्या कार्यरत असलेल्या भाडे तत्वावरील खाजगी ट्रॅक्टर्सची कामाची मुदत दिनांक ११.९.२०१५ पर्यन्त आहे. तदनंतरच्या कालावधीसाठी नव्याने जाहीर निविदा मागवुन एजन्सी नियुक्त करणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत कार्यरत ट्रॅक्टर्स प्रतिदिन प्रति ट्रॅक्टर्स रुपये १८६९/- दराने किरायाने घेण्यात आलेले आहेत. या दराने आगामी १ वर्ष कालावधीसाठी १७ ट्रॅक्टर्स/ट्रक (४०७) किरायाने घेण्यासाठी एकुण रुपये ९९,१३,१७६/- खर्च अपेक्षीत आहे. वार्ड अधिकारी यांचे मागणी नुसार सदरील ट्रॅक्टर्स /ट्रक (४०७) ची संख्या कमी /जास्त होवु शकते.

करीता घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी १७ ट्रॅक्टर्स /ट्रक (४०७) एक वर्ष कालावधी करीता किरायाने घेण्यासाठी अपेक्षीत रुपये ९९,१३,१७६/- खर्चाचे अंदाजपत्रक मा. सर्वसाधारण सभेच्या अवलोकनार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :-ऐनवेळीचा विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी १७ ट्रॅक्टर्स /ट्रक (४०७) एक वर्ष कालावधी करीता किरायाने घेण्यासाठी रक्कम रुपये ९९,१३,१७६/- च्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११८:-**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहरात दररोज उत्पत्ती होणारा ४५० मेट्रीक टन घनकचरा वाहतुक करण्यासाठी खालील प्रमाणे वाहनांची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

| वार्ड | स्कीप लोडर | हुक लोडर | मनपा ट्रक/ टिप्पर्स | खाजगी टिप्पर्स /ट्रॅक्टर्स | मोठी वाहने | मनपा ॲटोटिप्पर्स/ हॉपर्स | खाजगी ॲटो लोडींग | एकुण ॲटोटिप्पर्स/ लोडींग/ हॉपर्स |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | १<br>१० बिन्स | २<br>९ कंटेनर | ६ | २ टिप्पर<br>२ ट्रॅक्टर | १३ | ०८<br>दुपारपाळी-१ | १२ | १८<br>दुपारपाळी-१ |
| ब | १<br>१० बिन्स | १<br>८ कंटेनर | ४ | १० ट्रॅक्टर्स | १६ | १०<br>दुपारपाळी-१ | ०९ | १९<br>दुपारपाळी-१ |
| क | १<br>१० बिन्स | १<br>७ कंटेनर | ५ | २ टिप्पर्स | ०९ | ०९ | ०९ | १७ |
| ड | १<br>१० बिन्स | १<br>८ कंटेनर | ३ | ३ टिप्पर्स | ०८ | १०<br>दुपारपाळी-२ | ०४ | १४<br>दुपारपाळी-२ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इ | १<br>१० बिन्स | १<br>७ कंटेनर | ५ | १ टिप्पर<br>४ ट्रॅक्टर | १२ | १० | ०६ | १६ |
| फ | २<br>(१५ बिन्स | १<br>९ कंटेनर | ५ | ३ टिप्पर<br>१ ट्रॅक्टर | १२ | ११ | ०७ | १४ |
| एकुण वाहने | ०७ | ०७ | २८ | १२ टिप्पर्स<br>१७ ट्रॅक्टर | ७० | स.-- ५८<br>दु --०४ | ४७ | स.-- १०५<br>दु -- ०४ |

शहरात दररोज संकलीत होणा-या जवळपास साडेचारशे मेट्रीक टन घनकच-याचे संकलन व वाहतुक करण्यासाठी महानगरपालिकेची यंत्रणा कमी पडत असल्यामुळे वार्ड अधिकारी यांच्या मागणी नुसार सध्या एकुण ४७ खाजगी ॲपेलोडींग रिक्षा किरायाने लावण्यात आलेले आहेत. सध्या कार्यरत असलेल्या भाडे तत्वावरील खाजगी ॲपेलोडींग रिक्षाच्या कामाची मुदत दिनांक ११.९.२०१५ पर्यन्त आहे. तदनंतरच्या कालावधीसाठी नव्याने जाहीर निविदा मागवुन एजन्सी नियुक्त करणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत कार्यरत ॲपेलोडींग रिक्षा प्रतिदिन प्रति ॲपेलोडींग रिक्षा रुपये ११००/- दराने किरायाने घेण्यात आलेले आहेत. या दराने आगामी १ वर्ष कालावधीसाठी ४७ ॲपेलोडींग रिक्षा किरायाने घेण्यासाठी एकुण रुपये १,६१,३०,४००/- खर्च अपेक्षीत आहे. वार्ड अधिकारी यांचे मागणी नुसार सदरील ॲपेलोडींग रिक्षा ची संख्या कमी /जास्त होवु शकते.

करीता घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी ४७ ॲपेलोडींग रिक्षा एक वर्ष कालावधी करीता किरायाने घेण्यासाठी अपेक्षीत रुपये १,६१,३०,४००/- खर्चाचे अंदाजपत्रक मा. सर्वसाधारण सभेच्या अवलोकनार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :-ऐनवेळीचा विषय मंजुर तथापि लोडींग रिक्षासाठी निविदा मागवत असतांना हायड्रोलीक रिक्षाचे दरही मागविण्यात यावे.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी ४७ ॲपेलोडींग रिक्षा एक वर्ष कालावधी करीता किरायाने घेण्यासाठी रक्कम रुपये १,६१,३०,४००/- च्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात येते तसेच लोडींग रिक्षासाठी निविदा मागवत असतांना हायड्रोलीक रिक्षाचे दरही मागविण्यास मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११९:-**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहरात दररोज उत्पत्ती होणारा ४५० मेट्रीक टन घनकचरा वाहतुक करण्यासाठी खालील प्रमाणे वाहनांची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

| वार्ड | स्कीप लोडर | हुक लोडर | मनपा ट्रक/ टिप्पर्स | खाजगी टिप्पर्स /ट्रॅक्टर्स | मोठी वाहने | मनपा ॲटोटिप्पर्स/ हॉपर्स | खाजगी ॲटो लोडींग | एकुण ॲटोटिप्पर्स/ लोडींग/ हॉपर्स |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | १<br>१० बिन्स | २<br>९ कंटेनर | ६ | २ टिप्पर<br>२ ट्रॅक्टर | १३ | ०८<br>दुपारपाळी-१ | १२ | १८<br>दुपारपाळी-१ |
| ब | १<br>१० बिन्स | १<br>८ कंटेनर | ४ | १० ट्रॅक्टर्स | १६ | १०<br>दुपारपाळी-१ | ०९ | १९<br>दुपारपाळी-१ |
| क | १<br>१० बिन्स | १<br>७ कंटेनर | ५ | २ टिप्पर्स | ०९ | ०९ | ०९ | १७ |
| ड | १<br>१० बिन्स | १<br>८ कंटेनर | ३ | ३ टिप्पर्स | ०८ | १०<br>दुपारपाळी-२ | ०४ | १४<br>दुपारपाळी-२ |
| इ | १<br>१० बिन्स | १<br>७ कंटेनर | ५ | १ टिप्पर<br>४ ट्रॅक्टर | १२ | १० | ०६ | १६ |
| फ | २ | १ | ५ | ३ टिप्पर | १२ | ११ | ०७ | १४ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **(१५ बिन्स** | **९ कंटेनर** | | **१ ट्रॅक्टर** | | | | |
| एकुण वाहने | ०७ | ०७ | २८ | **१२ टिप्पर्स** **१७ ट्रॅक्टर** | ७० | **स.--** ५८ दु --०४ | ४७ | **स.--** १०५ दु -- ०४ |

शहरात दररोज संकलीत होणा-या जवळपास साडेचारशे मेट्रीक टन घनकच-याचे संकलन व वाहतुक करण्यासाठी महानगरपालिकेची यंत्रणा कमी पडत असल्यामुळे वार्ड अधिकारी यांच्या मागणी नुसार सध्या एकुण ११ खाजगी टिप्पर्स किरायाने लावण्यात आलेले आहेत. सध्या कार्यरत असलेल्या भाडे तत्वावरील खाजगी टिप्परच्या कामाची मुदत दिनांक ११.९.२०१५ पर्यन्त आहे. तदनंतरच्या कालावधीसाठी नव्याने जाहीर निविदा मागवुन एजन्सी नियुक्त करणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत कार्यरत टिप्पर्स प्रतिदिन प्रति टिप्पर रुपये २९००/- दराने किरायाने घेण्यात आलेले आहेत. या दराने आगामी १ वर्ष कालावधीसाठी ११ टिप्पर्स किरायाने घेण्यासाठी एकुण रुपये ९९,५२,८००/- खर्च अपेक्षीत आहे. वार्ड अधिकारी यांचे मागणी नुसार सदरील टिप्पर्सची संख्या कमी /जास्त होवु शकते.

करीता घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी ११ टिप्पर्स एक वर्ष कालावधी करीता किरायाने घेण्यासाठी अपेक्षीत रुपये ९९,५२,८००/- खर्चाचे अंदाजपत्रक मा. सर्वसाधारण सभेच्या अवलोकनार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :-ऐनवेळीचा विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी ११ टिप्पर्स एक वर्ष कालावधी करीता किरायाने घेण्यासाठी रक्कम रुपये ९९,५२,८००/-च्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,महाराष्ट्र शासनाच्या अध्यादेशानुसार सातारा-देवळाई भागाचा औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत समावेश करण्यात आलेला असुन,या भागातील नागरीकांना आवश्यक सोयी सुविधा पुरविणे महानगरपालिकेची जबाबदारी आहे. सातारा देवळाई भागातील दैनंदिन घनकचरा संकलन व वाहतुकीच्या कामासाठी आवश्यक यंत्रणा नसल्यामुळे खालील प्रमाणे नवीन वाहने मशिनरी खरेदी करणे आवश्यक आहे.

१) हुकलोडर मशिन -- ०१ नग
२) हुकलोडर बिन्स (क्षमता ९ घ.मी.) -- ०७ नग
३) हायड्रोलिक हॉपर्स -- १२ नग
४) ट्रॅक्टर लोडर -- ०१ नग
५) घंटागाडया -- २० नग
६) ओपन टिप्पर -- ०१ नग
७) २४० लि.क्षमतेचे डस्टबिन्स -- २०० नग

उपरोक्त वाहने व मशिनरी खरेदीसाठी उत्पादक कंपन्यां व पुरवठादारांच्या दरपत्रकांनुसार खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.क्र | मशिनरीचे नांव | नग | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | हुकलोडर मशिन उभारणीसाठी १६ जीव्हीडब्ल्यु चेसीस खरेदी करणे | ०१ | १५१६३९३/- | १५१६३९३.०० |
| २ | १६ जीव्हीडब्ल्यु चेसीसवर हुकलोडर मशिनची उभारणी करणे. | ०१ | २७७००००/- | २७७००००.०० |
| ३ | हुकलोडर बिन्स (क्षमता ९ घ.मी.) खरेदी करणे. | ०७ | ५२००००/- | ३६४००००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | हायड्रोलिक हॉपर्स उभारणीसाठी ८०० किलोग्रॅम भार वाहतुक क्षमतेच्या चेसीस खरेदी करणे. | १२ | ३५९९९८/- | ४३१९९७६.०० |
| ५ | १.८ घ.मी. क्षमतेच्या हायड्रोलिक हॉपर्सची उभारणी करणे. | १२ | २०३२००/- | २४३८४००.०० |
| ६ | ६० अश्वशक्ती ट्रॅक्टर (लोडर व लेव्हलर ॲटॅचमेंटसह) | ०१ | १४२४२००/- | १४२४२००.०० |
| ७ | १६ जीव्हीडब्ल्यु टिप्पर खरेदी करणे. | ०१ | १८०२९१४/- | १८०२९१४.०० |
| ८ | २४० लि. क्षमतेचे डस्टबिन्स खरेदी करणे. | २०० | ७८८०/- | १५७६०००.०० |
| ९ | घटागाडया खरेदी करणे. (१२ घ.फु. साईज) | २० | ९८८०/- | १९७२००.०० |
| | एकुण | | | १९६८५०८३.०० |

सातारा-देवळाई भागातील घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी मशिनरी खरेदी करीता तेरावा वित्त आयोग निधी अंतर्गत तरतुद उपलब्ध असुन, या उपलब्ध निधी मधुन वरील प्रमाणे वाहने व मशिनरी खरेदी करता येईल करीता सातारा-देवळाई भागातील घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी मशिनरी खरेदी करीता रक्कम रुपये १,९६,८५,०८३/- खर्चाचे अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :-ऐनवेळीचा विषय मंजुर.

**ठराव:-**

| | ५. | श्री.सांडु लक्ष्मण | ४४०/- |
| | ६. | श्री.विष्णू बंडू जाधव | ४४०/- |
| | ७. | श्री.एम. एम. कुलकर्णी | दि. ३१.०७.२०१४ रोजी सेवानिवृत्त निवासस्थान रिक्त केले नाही. |
| | ८. | श्री.दत्तू बाबूराव पठाडे | ४४०/- |
| | ९. | श्री. चव्हाण मोहन | ४४०/- |
| | १०. | श्री.पठाडे आर एल | ४४०/- |
| | ११. | श्री.रामदास वाघ | ४४०/- |
| | १२. | श्री.श्रीधर जाधव | ४४०/- |
| | १३. | श्री.दिनकर नलावडे | ४४०/- |
| | १४. | श्री.सुभाष नलावडे | ४४०/- |
| | १५. | श्री.शेख शकील | ४४०/- |
| | १६. | श्री.खोमणे मिठ्ठू बाबुराव | ४४०/- |
| | १७. | श्री.नारायण पाखरे | ४४०/- |
| | १८. | श्री.बाबुलाल पचलोरे | ४४०/- |
| | १९. | श्री.टि.पी. देशपांडे | दि. ०१.०५.२०१४ रोजी मयत वारसदार यांनी निवासस्थान रिक्त केले नाही. |

ब. कर्मचारी वर्ग - ४ निवासस्थाने

| अ. क्र. | निवासस्थान | कर्मचाऱ्यांचे नांव | कपात होणारा निवासस्थान देखभाल दुरुस्तीची घर भाडे + अनुज्ञेय घरभाडे भत्ता |
|---|---|---|---|
| | १. | रिक्त | - |
| | २. | रिक्त | - |
| | ३. | रिक्त | - |
| | ४. | श्री.विष्ण मल्लू पवार | २२०/- |
| | ५. | रिक्त | - |
| | ६. | ACWUCL यांचेकडे | - |
| | ७. | श्री.केशव एरंडे | २२०/- |
| | ८. | रिक्त | - |

टिप:- दि. १.०९.२०१४ पासून औरंगाबाद पाणी पुरवठा योजना कन्सेशनर औरंगाबाद सिटी वॉटर युटीलिटी कंपनी लि. यांचेकडे हस्तांतरीत झालेली आहे. त्यानुसार कर्मचारी निवासस्थाने व परिसर संबंधितांकडे हस्तांतरीत केलेला आहे.

**प्रश्न क्रमांक १०६:-**

**उत्तर:-उपआयुक्त (मालमत्ता) ,महानगरपालिका औरंगाबाद**

| प्रश्न | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|

| क्र. | | |
|---|---|---|
| १०६ | सेल ॲडस् या जाहिरात कंपनीला दिलेल्या जाहिराती संदर्भात संपूर्ण माहिती, सविस्तर करारनामा, न्यायालयीन स्थिती याबाबत माहिती देण्यात यावी. त्यांचेकडे महापालिकेची थकबाकी किती आहे. | औरंगाबाद महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जाहिराती बाबत निविदा लेखा विभागामार्फत मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेतील होर्डींग व ग्लोसाईन बोर्ड बाबत १ ते १९ असे ग्रुप पाडण्यात आले होते. ॲडपोल व किऑक्ससाठी प्रत्येकी एक ग्रुप तयार केलेले होते. त्यानूसार लेखा विभागामार्फत सदरची कार्यवाही पुर्ण झालेली आहे. त्यानूसार मे.सेल ॲड्स यांची निविदा मान्य करुन त्या संबंधाने लेखा विभागातर्फे कार्यादेश क्रमांक जा.क्र./मनपा/लेखा/२००३/१८८ दि.११.०७.२००३ च्या आदेशाने सदरचे काम संबंधीत एजन्सी मे.सेल ॲडस् यांना काम दिले.<br>त्यासंबधी दि.०८/०७/२००३ रोजी करारनामा झालेला आहे. होर्डींग,ग्लोसाईन,ॲडपोल व किऑक्स या निविदेची एकुण रक्कम रु. ३८,८१,८५१/- असून त्यापैकी संबंधित निविदाधारकाने सहा महिण्याचा हफ्ता म्हणुन डि.डि.द्वारे रु.१९,४०,९३६/- चा भरणा केल्यावर संबंधितास वरील संदर्भिय आदेशानुसार दि.११/०७/२००३ पासून काम सुरु करण्यास कळविण्यात आले होते.<br>सदर निविदा धारकास थकबाकी भरणा करणे व होर्डींगचे काम मुदतीत करणे साठी जा.क्र./मनपा/मामअ/१००२/२००४ दिनांक २६/०५/२००४ व जा.क्र./मनपा/मामअ/१२५९/०४ दिनांक २६/०६/२००४ नूसार कळविण्यात आले होते. सदर प्रकरणा संबंधाने त्यांनी दिलेल्या सर्व पत्राचा लेखी खुलासा कार्यालयीन पत्र जा.क्र./मनपा/मामअ/१४९४ दि.२४/०८/२००४ ला देऊन सुनावणी साठीचे पत्र दि.१४/१०/२००४ रोजी देण्यात आले होते. संबंधीताने (Arbitrator) नेमण्याची विनंती केली असता सदरची मागणी अमान्य करण्यात आली होती. दि.०७/०८/२००३ ते ०७/०८/२००५ पर्यंतची थकबाकीची रक्कम भरणा करणेसाठी रु. ५७,१३,०५२/- कळविले असता संबंधीताने कोणत्याही प्रकारची संमती दर्शविली नसल्याने करारनाम्यातील अट क्र. १-८ (ब व क) नुसार करारनामा रद्द करुन ठेका रद्द करण्यात |

| | | |
|---|---|---|
| | | आला होता.<br>संबंधिताने मा.उच्च न्यायालयातुन एमएआरजेआय मध्ये ३४३/०४ दि.३०/१०/२००४ रोजी जैसेथे चा आदेश दिला. प्रकरणात मा.उच्च न्यायालयाने एमएआरजेआय २४३/२००४ मध्ये अंतरीम सुनावणी होऊन दि.१६.०८.२००५ रोजी होर्डींग, ॲडपोल, किऑक्स, काढुन घेण्यासाठी मनाई हुकूम दिलेला होता. त्यांनंतर मा.उच्चन्यायालयाने न्यायमुर्ती श्री एन.पी.चपळगांवकर यांचे समक्ष आरबीट्रेशन प्रोसीडींग दाखल केली होती. दि.११/११/२००६ रोजी सदरील मनाई हुकुमाचा अर्ज फेटाळला आहे. आरबीट्रेशन मध्ये मा.आरबीट्रेटर यांनी सुध्दा जैसे थे चा आदेश दिला.<br>आरबीट्रेशन प्रोसीडींगमध्ये वेळोवेळी महानगर पालिकेतर्फे बाजु मांडण्यात आली. निवृत्त मा.न्यायमुर्ती श्री एन.पी.चपळगांवकर यांचे समोर दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकूण मा.आरबीट्रेटर यांनी दि.०३/०६/२००८ रोजी अवार्डपारीत केले व निर्णय दिला. दि.०३/०६/२००८ रोजीच्या अवार्डमध्ये रु. ५२,४१,३४६/- व्याजासह भरण्यात आदेशित केले. सन २००४ ते २०१० पर्यंतचे निकाल महानगरपालिकेच्या बाजुस निर्णय लागलेले आहेत. त्यानूसार संबंधित एजन्सीधारक मे.सेल ॲड्स यांना रु. ५२,४१,३४६/- चा भरणा करणेसाठी आरबीट्रेशननूसार दि.१०/०८/२००९ रोजी कळविण्यात येऊन थकबाकी न भरल्यास होर्डींग काढण्याची कार्यवाही करण्यात येईल असे कळविलेले होते.<br>तत्पुर्वी त्यानुषंगाने संबंधीत मनपा यांनी सेल ॲडस् विरुध्द एमएआरजेआय ३०७/२००८ रोजी अपील जिल्हा न्यायाधिश याचे कडे दाखल केले. त्याविरुध्द मे.सेलॲडस यांनी सुध्दा एमएआरजेआय/३१०/२०१० मा.जिल्हा न्यायाधिश यांचेकडे केले होते.<br>मा.उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधिश श्री एन.पी.चपळगांवकर यांचे ०३/०६/२००८ चे अवार्डमधील निर्णय कायम ठेऊन निर्णय देऊन अपील डिसमीस केले.<br>विशिष्ट कालावधीत रक्कम प्राप्त न |

| | | |
|---|---|---|
| | | झाल्यास व एजन्सी थकबाकीदार असल्यास करारनाम्यातील अटीशर्ती १-८ ब नूसार १८ टक्के व्याज लावणे आवश्यक होते. व त्या एजन्सीवर तशी कार्यवाही करुन थकबाकीपोटी रक्कम भरणे बाबत नोटीस तामिल करण्यात आली आहे. तसेच आरबीट्रेशन निर्णयानूसार मे.सेल ॲडस् ला जा.क्र./मनपा/मामअ/११९४/२०१० दिनांक ०८.०९.२०१० व जा.क्र./मनपा/मामअ/२०८६/२०१० दिनांक २७.०९.२०१० नूसार स्मरण देऊन थकबाकी व व्याजाची रक्कम रु. ५७,१३,०३४/- भरणा करणे बाबत कळविण्यात आलेले आहे. त्यावर सेल ॲडस् जाहिरात कंपनीने मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे अपील क्रमांक २०/२०१० अन्वये उच्च न्यायालयामध्ये अपील केलेले आहे. सदरचे प्रकरण हे मा.उच्च न्यायालयामध्ये प्रलंबीत आहे. सेल ॲडसचे मनपाने जप्त केलेले होर्डींग - ४१ जा.क्र./मनपा/मामअ/२०११/९६६ दि.१३.०६.२०११ नूसार जाहिरात फलक काढून घेऊन जप्त केलेले आहे. सेल ॲडस् या जाहिरात कंपनीकडे असलेली थकबाकी वसुली संदर्भाने विधी विभागाचे अभिप्राय घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल. |

## पुरक टिपणी

औरंगाबाद महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जाहीराती बाबत महानगरपालिकेतर्फे निविदा मागविण्यात आल्या होत्या. क्ष्या निविदेत मुख्य रस्त्यावर कमानी उभारणीसाठी तरतुद नाही. सदर निविदेतील होर्डींग व ग्लोसाईन बाबत १ ते १९ असे एकूण १९ ग्रुप पाडण्यात आले होते. ॲडपोल व किऑक्स प्रत्येकी एक एक ग्रुप तयार केले होते. क्ष्यानूसार कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/लेखा/२००३/१८८, दिनांक ११.०७.२००३ नूसार मे.सेल ॲडस् या जाहीरात एजन्सीला सदर काम देण्यात आले होते. क्ष्यासंबंधी दि.०८.०७.२००३ रोजी करारनामा करण्यात आला. सदरील करारनाम्याची प्रत यासोबत जोडण्यात आलेली आहे. होर्डींग, ग्लोसाईन, ॲडपोल व किऑक्स या निविदेची एकूण रक्कम रु. ३८,८१,८५१/- असून त्यापैकी संबंधित निविदा धारकाने सहा महिन्याचा हफ्ता म्हणुन डी.डी.द्वारे रु.१९,४०,९२६/- चा भरणा केल्यावर संबंधितास वरील संदर्भीय आदेशा नूसार दि. ११.०७.२००३ पासून काम सुरु करण्यास कळविण्यात आले होते.

सेल ॲडस् यांना कार्यादेश देउन नऊ महिने होऊन गेलेले असल्याने त्यांच्याकडे निविदेतील थकीत रक्कम रु. १९,४०,९२६/- चा भरणा ३१ मार्च पूर्वी

करणे करीता संबंधीतास कार्यालयीन नोटीस जा.क्र./मनपा/मामअ/४३६/२००४ दि.२५.०३.२००४ रोजी कळविण्यात आलेले होते.

सदर निविदा धारकास थकबाकी भरणा करणे व होर्डींगचे काम मुदतीत पूर्ण करणे बाबत कार्यालयीन पत्र जा.क्र./मनपा/मामअ/१००२/२००४ दि.२६.०५.२००४; १२५९/०४ दि.२६.०६.२००४ नूसार कळविण्यात आले होते. क्ष्यांना त्यांनी दिलेल्या सर्व पत्राचा लेखी खुलासा कार्यालयीन पत्र जा.क्र./मनपा/मामअ/१४९४/०४ दि.२४.०८.२००४ ला देऊन त्यांना सुनावणीसाठीचे पत्र सुध्दा दि.१४.१०.२००४ रोजी देण्यात आले आहे.

संबंधिताने आरबीट्रेटर नेमण्याची केलेली विनंती अमान्य करण्यात आलेली होती. कारण संबंधिताकडे दिनांक ७.८.२००३ ते ७.७.२००४ या वर्षाची थकबाकी रक्कम रु. १८,८६,०६३/- व दिनांक ८.७.२००४ ते ७.८.२००५ पर्यंत या कालावधीचे रक्कम रु. ३६,२६,९८९/- असे एकूण रक्कम रु.५७,१३,०५२/- एवढी रक्कम थकबाकी भरण्याबाबतची कुठलीच संमती दर्शवित नसल्यामूळे त्यांना कार्यालयीन नोटीस क्र.मनपा/मामअ/१८७१/२००४ दिनांक २७.१०.२००४ ला करारनाम्यातील अट क्र. १-८ (ब व क) नुसार करारनामा रद्द करुन ठेका रद्द करण्यात आलेला आहे. असे कळविण्यात आले असता संबंधिताने त्यावर मा.न्यायालयातून एमएआरजेआय मध्ये ३४३/०४ दि.३०.१०.२००४ ला मा.न्यायालयाने जैसे थे चा आदेश दिला त्यानंतर प्रकरणात एमएआरजेआय २४३/२००४ मध्ये अंतिम सुनावणी होऊन मा.न्यायालयाने दि.१६.०८.२००५ रोजी होर्डींग, ॲडपोल्स, किऑक्स काढुन टाकण्यास मनाई हुकुम दिला. सदर आदेश आरबीट्रेशन प्रोसिडींग दाखल करण्याचा आदेश पारीत करेपर्यंत राहील असे नमूद केले. तसेच ७५ टक्के रक्कम जमा करण्याच्या अटीवर आदेश पारीत केला व उर्वरीत रक्कम १५ दिवसात जमा करण्याचे आदेशीत केले. जर रक्कम जमा केली नाही तर मनाई हुकुम रद्द होईल असे आदेशात नमुद केले.

सदरील आदेशानंतर ए.ओ. ६८/२००५ मा.उच्च न्यायालयात दाखल केले. त्यामध्ये मा.उच्च न्यायालयाने सेल ॲडस् यांना रु. १०,००,०००/- न्यायालयात जमा करण्याचे अटीवर महानगरपालिकेस जैसे थे ची परिस्थिती ठेवणेबाबत दि.०५.०९.२००५ रोजी आदेश पारीत केला त्यानंतर मा.उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती श्री एन.पी.चपळगांवकर यांचे समक्ष आरबीट्रेशन प्रोसिडींग दाखल केली. सदरील प्रोसिडींग मध्ये सेल ॲडस् ने मनाई हुकुम देणेबाबत अर्ज देऊन विनंती केली तथापि, मा.आरबीट्रेटर श्री.चपळगांवकर साहेब यांनी सदरील मनाई हुकुमाचा अर्ज दि.११.११.२००६ रोजी फेटाळून लावला. आरबीट्रेशन मध्ये मा.आरबीट्रेटर यांनी सुध्दा जैसे थे चा आदेश दिला.

आरबीट्रेशन प्रोसिडींगमध्ये वेळोवेळी महानगरपालिकेतर्फे बाजू मांडण्यात आली. प्रकरणात वेळोवेळी आरबीट्रेटर निवृत्त न्यायमुर्ती श्री चपळगांवकर साहेब यांचे समारे सुनावणीसाठी दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकूण मा.आरबीट्रेटर श्री.चपळगांवकर, निवृत्त मा.उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती यांनी दि.०३.०६.२००८ रोजी अवार्ड पारीत केले व निर्णय दिला. दि.०३.०६.२००८ रोजीच्या अवार्डमध्ये रु.५२,४१,३४६/- व्याजासह भरण्यास आदेशीत केले.

उपरोक्त न्यायालयीन प्रकरणात आरबीट्रेशन प्रोसिडींग मध्ये विधी विभागामार्फत अनुभवी तज्ञ पॅनलवरील वकीलांमार्फत प्रकरणात सक्षझमपणे बाजू मांडून युक्तीवाद करण्यात आला. मनाई हुकुम हटविण्यासाठी मा.न्यायालयात युक्तीवाद करण्यात आला. महानगरपालिकेतर्फे प्रकरणात मनाई हुकुम व्हॅकेट करण्यासाठी सतत पाठपुरावा करण्यात आला. न्यायालयीन सर्व प्रकरणात अत्यंत प्रभावीपणे बाजू मांडून सन २००४ ते २०१० पर्यंतचे निकाल महानगरपालिका बाजुने निर्णय लागलेले आहेत. केलेलया कार्यवाहीचा विधी विभागाचा अहवाल अभिप्राय वरील प्रमाणे.

दि.१०.०८.२००९ रोजी आरबीट्रेशन नुसार रु. ५२,४१,३१६/- एवढी रक्कम भरण्याबाबत व भरणा न केल्यास होर्डींग काढण्याची कार्यवाही करण्यात येईल. अशी सेल ॲडस्ला नोटीस देण्यात आली आहे. त्यानंतर वेळोवेळी मालमत्त विभागाने पुढीलप्रमाणे वसुलीच्या नोटीस दिलेल्या आहेत.

१. जा.क्र./मनपा/मामअ/१४९३/२००९, दिनांक १०.०८.२००९
२. जा.क्र./मनपा/विधी/६२३/२०१०, दिनांक ०२.०७.२०१०
३. जा.क्र./मनपा/मामअ/१९९४/२०१०, दिनांक ०८.०९.२०१०
४. जा.क्र./मनपा/मामअ/२०८६/२०१०, दिनांक २७.०९.२०१०
५. जा.क्र./मनपा/मामअ/२७६१/२०१०, दिनांक १०.११.२०१०
६. जा.क्र./मनपा/मामअ/२८८७/२०१०, दिनांक ०६.१२.२०१०

तत्पुर्वी या निर्णया विरुध्द महानगरपालिकेने सेल ॲडस् विरुध्द एमएआरजेआय ३०७/२००८ हे अपिल जिल्हा न्यायाधिश यांचे कडे दाखल केले. व सेल ॲडस्ने सुध्दा महानगरपालिकेविरुध्द एमएआरजेआय ३१०/२०१० मा.जिल्हा न्यायाधिश यांचेकडे दाखल केले. परंतू मा.जिल्हा न्यायाधिशांना श्री.चपळगांवकर, निवृत्त मा.उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती यांचे दि.०३.०६.२००८ मधील अवार्डचा निर्णय कायम ठेवला दि.०२.०३.२०१० रोजी दोन्ही वरील अपिल निर्णय देऊन डिसमीस केले. त्यानंतर मे.सेल ॲडस् यांनी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.२०५६३/२०१० दाखल केली आहे. परंतू त्यामध्ये मा.उच्च न्यायालयाने महानगरपालिकेविरुध्द कोणताही मनाई हुकुम किंवा आदेश दिलेला नाही.

तसेच संबंधितास जा.क्र./मनपा/मामअ/२०८६/२०१० दि.२७.०९.२०१० च्या स्मरणपत्र नोटीस व ॲरबीट्रेटर च्या विरोधात क्ष्ग्र्ह्ल च्य्ड्ढ्ढ ग़्द्. २०५६३/२०१० नूसार अपील केलेले आहे. सध्या प्रकरण न्यायप्रविष्ठ असून विधी विभागाचा अभिप्राय घेऊन कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल. तसेच सेल ॲडचे जा.क्र./मनपा/मामअ/२०११/९६६ दि.१३.०६.२०११ च्या नोटी नूसार सेल ॲडस् चे ४१ होर्डींग मनपा मार्फत काढून घेऊन ते जप्त करण्यात आलेले आहेत. करीता वरील प्रमाणे अहवाल माहितीस्तव.

**प्रश्न क्रमांक १०७:-**

**उत्तर:-उपआयुक्त (मालमत्ता) ,महानगरपालिका औरंगाबाद**

| प्र. क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १०७ | शहरात एकूण किती अधिकृत व | शहरात अधिकृत होर्डीगची संख्या ३२८ असून |

| | | |
|---|---|---|
| | अनाधिकृत होर्डिंग आहेत? त्यातून महापालिकेला किती उत्पन्न मिळते? मा.न्यायालयाचे आदेश इत्यादी बाबत माहिती देण्यात यावी. | त्याव्यतिरिक्त परवानगीसाठी ५५ ते ६० दाखल झालेल्या आहेत. सन २०१५-१६ मध्ये अधिकृत होर्डींग पासून ९८,८३,६४३/- इतके उत्पन्न अपेक्षित असून नविन दाखल झालेल्या संचिका भोगवटा प्रमाणपत्राअभावी निकाली निघु शकल्या नाहीत तथापि आता मा.स्थायी समीती सभा विषय क्र. १०७ दि.१२/२/२०१५ अन्वये बांधकाम परवानगी /भोगवटा प्रमाणपत्राबात शिथिलता देण्याचा निर्णय झालेला आहे. त्यापासून साधारणत: २० ते २२ लाख रुपये उत्पन्न अपेक्षीत आहे. तथापि अधिकृत व अनधिकृत होर्डींगचा सर्वेक्षणासाठी मा.आयुक्तांची मान्यता झालेली असून त्यानूसार कार्यवाही प्रस्तावित आहे. तथापि, होर्डींगचे वाढीव दराबाबत मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे याचीका क्र.१३०५/२००३ अन्वये याचिका दाखल झालेली होती. सदरील याचीका जुन २०१५ मध्ये खारीज करण्यात आलेली आहे. |

**<u>प्रश्न क्रमांक १०८:-</u>**

**<u>उत्तर:-उपआयुक्त (मालमत्ता) ,महानगरपालिका औरंगाबाद</u>**

| प्र.क्र | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १०८ | शहरातील एकूण महानगरपालिकेच्या आठवडी बाजार व इतर ठिकाणाचे पार्किंगची किती वसुली होते? करारनामा करण्यात आलेला आहे का? असल्यास कालावधी किती? व ठेकेदाराचे नाव याबाबतची माहिती द्यावी. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे तीन आठवडी बाजार आहेत. अ.क्र. १) जाफरगेट आठवडी बाजार २) चिकलठाणा आठवडी बाजार.३) शाहनुवारडी आठवडी बाजार.<br>१) चिकलठाणा आठवडी बाजार येथील वसुली ठेकेदार श्री संतोष राजु कांबळे यांना मागील वर्षी रु.९३५२/- प्रति बाजार व त्यावर सेवाकर १२.३६ टक्के असे एकूण १०५०८/-प्रति बाजार प्रमाणे ठेका देण्यात आलेला होता. त्यांच्याकडून एकूण ५२ बाजाराचे (दि.३१.०३.२०१५ पर्यंतची) रक्कम रु.५,४६,४१६/- एवढी वसुल झालेली आहे. त्याची मुदत दि.३१.०३.२०१५ पर्यंत होती तथापि, औरंगाबाद महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०१५ ची आदर्श आचार संहिता लागू असल्या कारणाने निविदा प्रक्रिया अंतिम होईपर्यंत संबंधितास मागील ठेकेदाराची कार्यपध्दत लक्षात घेता त्यांना मागील बाजाराच्या मुळ रक्कमेत १० टक्के वाढ करुन १४ टक्के सेवाकरासहीत निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मुदत वाढ करुन प्रति बाजार रु.११७२७/- प्रतिबाजार प्रमाणे देण्यात आलेला आहे. पुढील निविदा प्रक्रिया प्रस्तावित आहे.<br>२) रविवार जाफरगेट आठवडी बाजार श्री किरण राजु बिडलॉन यांना प्रतिबाजार २५५६२/- सेवाकरासहीत वसुल |

| | | |
|---|---|---|
| | | करणेसाठी ठेका देण्यात आला होता. तथापि संबंधिताकडे ठेका रक्कम रु.८६९१०८/- एवढी रक्कम थकीत असल्याने संबंधिताचा ठेका रद्द करुन त्याच्या विरुध्द रिकव्हरी सुट दाखल करणेसाठी विधी सल्लागार यांच्याकडे अभिप्रायासाठी संचिका पाठविण्यात आली असता त्यांनी संबंधिताची मिळकत जप्त करणेसाठी चा अभिप्राय दिलेला आहे. त्यानुषंगाने सर्व वॉर्ड कार्यालय यांना संबंधिताच्या नावे मिळकती नोंद असल्याबाबतची माहिती पाठविणे साठी जा.क्र./मनपा/मामअ/२०१५/१७० दि.१३.०७.२०१५ देण्यात आलेली आहे. तसेच दि.२२ फेब्रुवारी २०१५ पासून मनपा कर्मचाऱ्या मार्फत वसुली होते व त्या अनुषंगाने आतापर्यंत २,६१,८२५/- रु. एवढी वसुली झाली आहे. सदर बाजाराची निविदा प्रक्रिया प्रस्तावित आहे.<br>३) शहानुरवाडी आठवडी बाजार सदर बाजार हा बीओटी विभागामार्फत विकासकास चालविण्यासाठी देण्यात आलेला आहे. त्याची माहिती बिओटी कक्षाकडे उपलब्ध आहे.<br>शहरातील विविध ठिकाणे वाहनतळ अ.क्र. १) गुलमंडी वाहनतळ - ठेकेदार श्री आतिष जोजारे यांना कार्यादेश जा.क्र./मनपा/मामअ/१९९०/२०१४ दिनांक २/७/२०१४ अन्वये प्रतिमाह १६८५४/- रु. (सेवाकरासहीत) ठेका देण्यात आला आहे. त्यानूसार त्यांनी आतापर्यंत रु.१,५१,६८६/- एवढा भरणा आहे. तथापि, औरंगाबाद महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०१५ ची आदर्श आचार संहिता लागु असल्याकारनाने निविदा प्रक्रिया अंतिम होईपर्यंत संबंधितास मुद्दत वाढ देण्यात आलेली असून निविदा प्रक्रिया प्रस्तावित आहे. २) नागेश्वरवाडी वाहनतळ - ठेकेदार श्री विजयानंद यादव यांना कार्यादेश जा.क्र./मनपा/ मामअ/१९७१/२०१४ दिनांक २५/६/२०१४ अन्वये प्रतिमाह ६७४२/- रु. (सेवाकरासहीत) ठेका देण्यात आला आहे. त्यानूसार त्यांनी आतापर्यंत रु.६५,६७६/- एवढा भरणा केला आहे. ३) पैठण गेट वाहनतळ ठेकेदार श्री विनोद बेदमुथा यांना कार्यादेश जा.क्र./मनपा/मामअ/ ३३५३/१/२०१४ दिनांक १२/११/२०१४ अन्वये प्रतिमाह २०७४२/- रु. (सेवाकरासहीत) ठेका देण्यात आला आहे. त्यानूसार त्यांनी आतापर्यंत रु.९६,१०४/- एवढा भरणा आहे. संबंधितास संपुर्ण एकवर्षासाठी मुदतवाढ देण्यात आली |

| | | |
|---|---|---|
| | | आहे.<br>तसेच सन २०१५-१६ साठी वाहनतळाच्या निविदा काढण्यात आल्या असून निविदा प्रक्रीया अंतीम टप्प्यामध्ये आहे. |

**स.पालिका सदस्य श्री.राजगौरव हरिदास वानखेडे (प्रभाग क्रमांक-५):-**

**प्रश्न क्रमांक १०९ व ११०:-**

**उत्तर:-कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), महानगरपालिका औरंगाबाद.**

औरंगाबाद महानगरपालिका आणि सिटी वॉटर युटीलिटी कंपनी या दोघांमध्ये शहरातील पाणी पुरवठा समस्या व त्याचे निराकरण करण्यासाठी स्वतंत्र अभियंता म्हणून कोणाची नेमणूक करण्यात आलेली आहे? त्यांचे नाव काय?

**उत्तर:-**

औरंगाबाद महानगरपालिकेचा समांतर जलवाहिनी प्रकल्प राबविण्यासाठी प्रकल्पाचे स्वतंत्र अभियंता म्हणून युनिटी कन्सलटंट प्रा.लि.पुणे यांची नेमणुक करण्यात आलीआहे.

**प्रश्न क्रमांक ११०:-**

स्वतंत्र अभियंता यांनी आता पर्यंत काय काम केले आहे? त्यांच्या कामाची पध्दत काय? व त्याची नोंद कोण ठेवतो? त्यांची नेमणूक कधी करण्यात आली? आता पर्यंत त्यांना किती मोबदला देण्यात आला?

**उत्तर:-**

समांतर जलवाहिनी पीपीपी प्रकल्पाच्या कन्सेशन ॲग्रीमेंटमधील कलम २४,१ (a) (i) नुसार युनिटी कन्सलटंट प्रा.लि. यांना समांतर जलवाहीनी पीपीपी प्रकल्पाचे स्वतंत्र अभियंता (Independent Engineer) म्हणुन कन्सेशन व महानगरपालिकेच्या वतीने मान्यता दिलेली आहे. प्रकल्पाचे स्वतंत्र अभियंता म्हणुन युनिटी कन्सलटंट प्रा.लि.पुणे यांचे समवेत महानगरपालिका व औरंगाबाद सिटी वॉटर युटिलीटी कंपनी लि.या तीन्ही पक्षांमध्ये त्रिपक्षीय करारनामा दिनांक २३.०८.२०१३ रोजी झाला आहे. सदर ॲग्रीमेंटनुसार स्वतंत्र अभियंता यांनी बांधकाम व पुनर्वसन कालावधीमध्ये करावयाच्या कामांच्या व्याप्ती (Scope of work) नुसार स्वतंत्र अभियंता यांना समांतर जलवाहिनी प्रकल्पासंदर्भाने कार्यवाही करावयाची आहे.

युनिटी कन्सलटंट हे प्रकल्प सल्लागार म्हणून या प्रकल्पावर सन २००८ पासून काम करीत आहेत. त्यांच्या सोबत केलेल्या करारनाम्यानुसार कन्सेशनर यांना योजना हस्तांतरण झाल्यानंतर युनिटी कन्सलटंट यांना त्यांच्या फी ची रक्कम देय आहे. योजना हस्तांतरण होण्या पुर्वीच्या कालावधीची कुठलीही फी त्यांना अदा करण्यात आली नाही. त्यानंतर वर नमुद त्रिपक्षीय करारनाम्यानुसार युनिटी कन्सलटंट प्रा.लि. हे प्रकल्पाचे स्वतंत्र अभियंता म्हणुन काम पाहत आहेत. कन्सेशन ॲग्रीमेंट मधील तरतुदीनुसार स्वतंत्र अभियंता यांना महानगरपालिका व कन्सेशनर यांना प्रत्येकी ५०% फी अदा करावयाची आहे. या संदर्भाने मा.स्थायी समिती सभेने विषय क्र.२१३ दिनांक २२.०३.२०११ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार त्यांना फी ची रक्कम अदा करण्यात येत आहे. संबंधीतांना आतापर्यंत माहे सप्टेंबर २०१४ मते मे २०१५ पर्यंत रक्कम रुपये ३,१३,७६,५७४/- ची देयके सेवा करासह अदा करण्यात आली आहेत.

स्वतंत्र अभियंता यांनी आतापर्यंत प्रकल्पा संदर्भाने केलेल्या कामाबाबत माहिती

युनिटी कन्सलटंट ही संस्था त्यांचे सोबत झालेल्या त्रिपक्षीय करारनाम्यामधील अटी व शर्तीनुसार औरंगाबाद शहर समांतर जलवाहीनी पीपीपी प्रकल्पासंदर्भाने काम करीत असुन प्रकल्प अहवाल बनविणे, प्रकल्पाशी संबंधित बैठकींना उपस्थित राहणे, प्रकल्पाच्या डी.पी.आर. व हायड्रॉलीक डिझाईनची तपासणी करणे व मान्यतेची शिफारस करणे, प्रकल्पाचे बारा तीमाही माईलस्टोन अंतिम करणे व मान्यतेची शिफारस करणे, प्रकल्पाशी संबंधित विविध व्हेंडरची तांत्रिक व इतर क्षमता तपासुन मान्यतेची शिफारस करणे, प्रकल्पाच्या भांडवली व देखभाल दुरुस्तीच्या कामांकरीता वापरण्यात येणाऱ्या साहित्यांची गुणवत्ता तपासणी करणे व तृतीय पक्ष तपासणी च्या वेळी महानगरपालिकेच्या अभियंत्यां समवेत वेळोवेळी उपस्थित राहणे त्याचप्रमाणे पाणी पुरवठा विषयक कामांवर देखरेख करणे, गुणवत्ता राखणे व नोंदी ठेवणे इत्यादी कामे करीत आहेत. याशिवाय अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनेअंतर्गत आवश्यक पाणी वितरण समस्या,देखभाल दुरुस्तीची कामे, दुषित पाण्याच्या तक्रारी निवारणार्थ उपाययोजना या संदर्भाने कामे करीत आहेत.

**स.पालिका सदस्य श्री.भगवान (बापू) घडमोडे (प्रभाग क्रमांक-८६):-**

**प्रश्न क्रमांक १११:-**

महानगरपालिकेतर्फे सध्या BOT तत्वावर कोणकोणती कामे सुरू आहेत? ती केव्हापासून सुरू करण्यात आली आहेत? त्यांच्या कामाची मुदत किती तारखपर्यंत आहे?

**प्रश्न क्रमांक ११२:-**

आतापर्यंत BOT तत्वावर देण्यात आलेल्या कामाची सद्यस्थिती काय? किती कामे देण्यात आलेल्या मुदतीत पुर्ण झाली? पुर्ण झालेली कामे कोणती? जी कामे पुर्ण झालेली नाहीत. त्यांचेवर मनपाने काय कारवाई केली? केली नसल्यास त्याचे कारणे काय? महापालिकेच्या अटी शर्तीनुसार सर्व कामे सुरू आहेत काय? त्याची तपासणी करण्याची जबाबदारी कोणाची? आतापर्यंत प्रत्येक प्रकल्पाची किती वेळा तपासणी करण्यात आली? त्याचा प्रोजेक्ट नुसार (प्रत्येकाची) अहवाल द्यावा.

**उत्तर:- बीओटी कक्ष प्रमुख, महानगरपालिका औरंगाबाद .**

महानगरपालिकेच्या बीओटी प्रकल्पांच्या करारनाम्यातील अटी व शर्तीमध्ये नमुद प्रमाणे प्रकल्पाची तपासणी करणेची संयुक्तीक जबाबदारी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार आणि महानगरपालिकेची आहे. प्रकल्प सुरुवातीपासुन पुर्ण होईपर्यंत आवश्यकतेनुसार तसेच स्लॅब टाकण्यापुर्वी सर्व तपासण्या वेळोवेळी होतात.

| अ. क्र. | कामाचे नांव | काम सुरु करणेसाठी करारनामा दि. व बा.प. दि. | कामाची मुदत | कामाची सद्यस्थिती | मुदतीत कामे पुर्ण न झाल्याने केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|
| १ | ज्योतीनगर येथे पोहण्याचा तलाव बीओटी तत्वावर विकसीत करणे. | दिनांक ७.५.२००७ | १८ महिने | काम पुर्ण | --- |
| २ | रेल्वे स्टेशन जवळील महापौर बंगल्या लगत | दिनांक ०७.०५.२००७ | २४ महिने | काम पुर्ण | --- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | बीओटी तत्वावर व्यापारी संकुल उभारणे बाबत. | | | | |
| ३ | शहानुरवाडी स.न.१२ आरक्षण क्र.२६२ येथे आठवडी बाजार व संकुल बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करणे. | दिनांक ०९.०१.२००७ | २४ महिने | मनपा हिस्सा काम पुर्ण | --- |
| ४ | सिध्दार्थ उद्यान बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करणे. | दिनांक २७.०९.२००६ | बांधकाम परवानगी नंतर १२ महिने | मनपा हिश्यातील काम पुर्ण झाले असुन दुमजली वाहनतळ भाडेतत्वावर देण्यात आले आहे. | विकासक हिश्यातील कामासाठी सुधारीत बांधकाम परवानगी प्रस्ताव नगर रचना विभागाकडे दाखल आहे. |
| ५ | वेदांत नगर येथे बीओटी तत्वावर जलतरण तलाव व मल्टीपरपज हॉल बांधणे. | दिनांक ०४.०१.२०१२ | बा.प.दि. ६.१२.१२ पासुन १८ महिने | मनपा हिश्यातील काम पुर्ण झालेले असुन विकासक हिश्यातील काम ६०% पुर्ण झाले आहे. | प्रकल्प करारनामा अटी व शर्तीनुसार नोटीस देण्यात आली आहे. |
| ६ | टाऊन सेंटर, सिडको येथील स्पोर्टस कॉम्प्लेक्स परिसरात पोहण्याचा तलाव व ॲमिनेटीज इत्यादी बांधणे. | दिनांक ०४.०१.२०१२ | बा.प.दि. १९.६.१३ पासुन १२ महिने | प्रकल्पाचे काम ६०% पुर्ण झाले आहे. | प्रकल्प करारनामा अटी व शर्तीनुसार नोटीस देण्यात आली आहे. |
| ७ | शहानुरवाडी येथील आठवडी बाजार (युरोपीयन | दिनांक ०१.०८.२०१२ | ०६ महिने | प्रकल्पाचे काम पुर्ण झाले असुन दर सोमवारी | --- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | मार्केट) बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करणे. | | | आठवडी बाजार भरविण्यात येत आहे. | |
| ८ | वसंत भवन इमारत बीओटी तत्वावर विकसीत करणे. | दिनांक २९.०१.२०१३ | १८ महिने | सदर प्रकल्पातील आजपर्यंत पाच आर.सी.सी.स्लॅब टाकण्यात आले आहे. तथापी विकसकाकडून बांधकाम परवाना शुल्क भरणा करणेच्या अटीस व इतर बाबीस मा. उच्च न्यायालयात आव्हान दिले असुन प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. | प्रकल्प करारनामा अटी व शर्तीनुसार नोटीस देण्यात आली आहे. |
| ९ | औरंगपुरा भाजी मंडी बीओटी तत्वावर विकसीत करणे बाबत. | दिनांक २९.०१.२०१३ | १८ महिने | औरंगपुरा भाजी मंडी येथील जुन्या दोन दुकान धारकांनी मा. न्यायालयातुन मनाई हुकुम प्राप्त केला असल्याने त्यांना अद्याप पर्यंत तेथुन काढता आले नसुन त्यांचे समवेत तडजोडीचे प्रयत्न चालू आहेत. ते स्थलांतरीत झाल्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात होईल. तसेच विकसकाकडून | --- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | बांधकाम परवाना शुल्क भरणा करणेच्या अटीस व स्थळाच्या प्रत्यक्ष स्थिती बाबत मा. उच्च न्यायालयात आव्हान दिले असुन प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. | |
| १० | शहागंज भाजी मंडी बीओटी तत्वावर विकसीत करणे बाबत. | दिनांक ०१.०७.२०१३ | १८ महिने | सदर प्रकल्पातील जमिनीचे अनुषंगाने रिट याचिका क्रमांक-९९/२०१२ प्रकरणात मा. मनपा न्यायालयाने दिनांक ०४.०३.२०१५ अन्वये मनाई आदेश पारीत केलेला आहे. त्यामुळे कामास अद्याप सुरुवात झालेली नाही. | --- |

**स.पालिका सदस्य श्री.विजय साईनाथ औताडे (प्रभाग क्रमांक-७):-**

**प्रश्न क्रमांक ११३ ते ११४:-**

**उत्तर:- सहाय्यक संचालक नगर रचना,महानगरपालिका औरंगाबाद.**

| प्र.क्र | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ११३ | हर्सुल परिसरातील सर्वे न.२१० सवेरा पार्क हर्सुल ०९ एकर जमिनीचा ले-आऊटला महापालिकेतर्फे केव्हा मंजुरी देण्यात आली? मंजुरी देतांना कोणत्या अटी व शर्ती टाकण्यात आल्या होत्या? मंजुरी देण्यापुर्वी आवश्यकता त्या सर्व विभागाच्या NOC घेण्यात आल्या होत्या काय? असल्यास कोणकोणत्या विभागाने NOC दिलीत? हर्सुल जेल व्यवस्थापक यांची NOC घेतली होती काय? | दि.१९.०९.२०११ रोजी ले-आऊटला मंजुरी देण्यात आली आहे. सदरील आदेशामध्ये अटी व शर्ती टाकण्यात आलेल्या आहेत. सुलभ संदर्भासाठी आदेशाची प्रत देण्यात येत आहे. विकास नियंत्रण नियमावलीनुसार आवश्यक कागदपत्रे प्राप्त झाल्याने मंजुरी दिलेली आहे. त्यात जेल प्रशासनाचे एन.ओ.सी.चा समावेश |

| | | |
|---|---|---|
| | | नाही. |
| ११४ | महापालिकेने बांधकाम परवाना दिल्यानंतर ती रद्द करता येते का? त्याची नियमावली काय? जर महापालिकेच्या चुकीमूळेच बांधकाम परवानगी देण्यात आलेली असल्यास संबंधीतांना नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी कोणाची? बांधकाम परवानगी जी देण्यात आली त्यात चुक कोणाची आहे? मनपा प्रशासनाची असल्यास जबाबदार कोण? | होय,मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५८ व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५१ नुसार. |

**<u>प्रश्न क्रमांक ११५:-</u>**

आरोग्य विभागात सध्या कोणकोणत्या जागा रिक्त आहेत? केव्हापासून? सदरील जागा भरण्यासंदर्भाने प्रशासनाने काय कारवाई केली? व ती सध्या कोणत्या स्थितीत आहे. त्याची सर्व रिक्त पदासह माहिती द्यावी.

**<u>उत्तर:- उपआयुक्त (महसूल),महानगरपालिका औरंगाबाद.</u>**

सदरची माहिती यासोबत जोडण्यात येत आहे.

**आरोग्य विभागातील पदांची माहिती**
**(सिडको व आरसीएच च्या मंजूर पदासह)**

| अ.क्र | पदांचे नांव | मंजूद पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १. | आरोग्य वैद्यकीय अधिकारी | १ | १ | ० |
| २. | वैद्यकीय अधिकारी | ३१ | २१ | १० |
| ३. | अन्न निरीक्षक | २ | १ | १ |
| ४. | आरोग्य निरिक्षक | ६ | ५ | १ |
| ५. | मिश्रक | १४ | १३ | १ |
| ६. | प्रयोगशाळा तंत्रज्ञ/सहा.नेत्र चिकित्सक/ईसीजी तंत्रज्ञ | ८ | ५ | ३ |
| ७. | सार्वजनिक आरोग्य परिचारिका | ४ | ० | ४ |
| ८. | लसटोचक | १ | ० | १ |
| ९. | परिचारिका | ४१ | २५ | १६ |
| १०. | स्टाफ नर्स | १३ | १० | ३ |
| ११. | क्ष-किरण तंत्रज्ञ | १ | १ | ० |
| १२. | एम.पी.डब्ल्यु. | २५ | १८ | ७ |
| १३. | एस.एफ.डब्ल्यु. | १७ | ९ | ८ |
| १४. | सांख्यिकी सहाय्यक | १ | १ | ० |
| १५. | अकॉऊटंट कम क्लार्क | १ | १ | ० |
| १६. | समन्वयक | १ | ० | १ |

**टिप:- उक्त पदांची पदे ही सेवानिवृत्त/मयत/स्वेच्छा सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेली असुन सदरील रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया कार्यवाहीतंर्गत आहे.**

**स.पालिका सदस्य श्री. अजीम अहेमद अब्दुल रफीक अहेमद (प्रभाग क्रमांक-४३):-**

**प्रश्न क्रमांक ११६:-**

**उत्तर:-उपआयुक्त (मालमत्ता) महानगरपालिका औरंगाबाद.**

औरंगाबाद शहरासाठी औरंगाबाद महानगरपालिके तर्फे कडा किंवा GMIDC कडे वर्ष २०१०-११, वर्ष २०११-१२, वर्ष २०१२-१३,वर्ष २०१३-१४ आणि वर्ष २०१४-१५ या कालावधीसाठी जायकवाडी धरणात किती TMC पाणी आरक्षित करण्यासाठी अर्ज करण्यात आले होते? सदरील माहिती आकडेवारीसह तातडीने देण्यात यावी.

**उत्तर:-कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा,महानगरपालिका औरंगाबाद.**

औरंगाबाद शहराला महानगरपालिकेतर्फे जायकवाडी धरण उद्‌भवावरून दोन मुख्य योजनांद्वारे पाणी पुरवठा होतो, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेकरीता जायकवाडी धरणामध्ये वार्षिक ११३.२८ दलघमी पाणी आरक्षण मंजुर आहे. तथापि औरंगाबाद महानगरपालिकेच्या दोन्ही पाणी पुरवठा योजनेच्या उचल क्षमता लक्षात घेता खालीलप्रमाणे वार्षिक पाणी आरक्षणाबाबत मा.अधिक्षक,कडा, गारखेडा परिसर, औरंगाबाद यांना पत्राद्वारे मागणी करण्यात आली आहे.

| वर्ष | वार्षिक पाण्याचे आरक्षण |
|---|---|
| २०१०-११ | ५८ द.ल.घ.मी. |
| २०११-१२ | ५८ द.ल.घ.मी. |
| २०१२-१३ | ५८ द.ल.घ.मी. |
| २०१३-१४ | ५८ द.ल.घ.मी. |
| २०१४-१५ | ५८ द.ल.घ.मी. |

**स.पालिका सदस्य श्री.शेख जफर अख्तर (प्रभाग क्रमांक-६०) :-**

**प्रश्न क्रमांक ११७:-**

वार्ड क्र.५२ मध्यवर्ती जकात नाका मुख्य रस्त्यावर ड्रेनेज लाईन टाकणे (स्पील काम) काम पूर्ण म्हणून मला पत्र दिलेले आहे हे काम कोठे करण्यात आले, मला संबंधित कनिष्ठ अभियंता व उपअभियंता यांनी दाखवावे व मला या प्रश्नाचे उत्तर द्यावे.

**उत्तर:- वॉर्ड अभियंता (क),महानगरपालिका औरंगाबाद.**

वॉर्ड क्र.५२ (जुना) मध्यवर्ती जकातनाका मुख्य रस्त्यावर ड्रेनेज लाईन टाकणे ह्या कामाचा स्पीलच्या यादीमध्ये अनावधानाने काम पुर्ण असा उल्लेख झाला होता. परंतु प्रत्यक्षात सदर काम अद्याप करणे बाकी आहे. त्याबाबत अर्थसंकल्पात स्पीलच्या यादी मध्ये तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

**स.पालिका सदस्य श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ (प्रभाग क्रमांक-११२) :-**

**प्रश्न क्रमांक ११८:-**

बचत गटाचे किती प्रस्ताव अद्याप प्रलंबित आहेत?

**उत्तर:- सहाय्यक प्रकल्प अधिकारी (NULM), राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान योजना, महानगरपालिका औरंगाबाद.**

१. बचतगटाचे मंजुर प्रस्ताव विना अनुदान (१०) संचिका/प्रस्ताव प्रलंबीत आहेत.
२. बँकेस पाठविण्यासाठी (१४१) संचिका/प्रस्ताव प्रलंबीत आहेत.

**प्रश्न क्रमांक ११९:-**

एअरटेल कंपनीला आपण पावसाळयानंतर खोदकामाची परवानगी दिली असतांना त्यांनी पावसाळयात खोदकाम केले. याबाबत मनपा प्रशासनाने काय कार्यवाही केली?

**उत्तर:- शहर अभियंता,महानगरपालिका औरंगाबाद.**

शहरामध्ये भारती एअरटेल लिमीटेड ऑप्टीकल फायबर केबल टाकणेकरीता सशर्त परवानगी देण्यात आली होती. परवानगीमधील अटींचे काटेकोरपणे पालन करणे बाबत विशषत: पावसाळा ऋतू नंतर काम करणे विषयी सर्व संबंधीतांना सुचित करण्यात आले आहे.

**प्रश्न क्रमांक १२०:-**

महानगरपालिकेने ड्रेनेज चोकअप काढण्यासाठी जी रॉड्रींग मशीन खरेदी केली त्यासाठी किती खर्च झाला? व ती मशीन किती ठिकाणी उपयोगात आणल्या?

**उत्तर:- अप्राप्त.**

**प्रश्न क्रमांक १२१:-**

मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(अ) नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांना पर्यावरण सद्यस्थिती अहवाल प्रकाशित केला आहे काय?

**उत्तर:-उद्यान अधिक्षक, महानगरपालिका औरंगाबाद.**

औरंगाबाद महानगरपालिकेने सन २०१०-११ चा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल तयार करण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, पर्यावरण शास्त्र विभाग यांना दिलेले आहे. परंतु सदर विभागाने सन २०१०-११ चा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल आजपर्यंत सादर केलेला नाही.

तसेच सन २०१३-१४ या वर्षाचा पर्यावरण अहवाल संचालक, प्राणी संग्रहालय यांनी में.थ्री टेक ग्रीन सोल्युशन या एजन्सी मार्फत तयार करणे. दि. ०३.१२.२०१५ रोजी मा.महापौर,मा.आयुक्त, यांचे उपस्थितीत मा.सर्वसाधारण सभेत प्रकाशीत करण्यात आलेला आहे.

**प्रश्न क्रमांक १२२:-**

**उत्तर:-कार्यकारी अभियंता (अ व ड),महानगरपालिका औरंगाबाद.**

| | |
|---|---|
| प्रश्न | क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन या सिमेंट रस्त्याचे काम पूर्ण करण्यासाठी कंत्राटदाराला किती मुदत देण्यात आली आहे? |
| उत्तर | सदरील रस्त्याचे कामाकरीता प्रथम मुदतवाढ दि.२१.०५.२०१४ पर्यंत,द्वितीय मुदतवाढ दि.३१.१२.२०१४ पर्यंत व तृतीय मुदतवाढ दि.३१.०३.२०१५ पर्यंत मा.आयुक्त महोदय यांच्या मंजुरीनूसार दिलेला आहे. यापुढील मुदतवाढ ही दि.३१.१२.२०१५ पर्यंत देणे बाबत प्रस्तावित आहे. या रस्त्याबाबतची संपुर्ण माहिती आपणांस जाक्र/मनपा/डिफर्ड/२१६/२०१५ दिनांक २७.०७.२०१५ अन्वये देण्यात आलेली आहे. |

**स.पालिका सदस्य श्री.राजगौरव हरिदास वानखेडे (प्रभाग क्रमांक-५):-**

**प्रश्न क्रमांक १२३:-**

महानगरपालिकेतर्फे आज पर्यंत BOT तत्वावर कोणकोणती कामे करण्यात आली? कोणकोणती कामे सुरु आहेत?

**उत्तर:- BOT कक्ष प्रमुख,महानगरपालिका औरंगाबाद.**

| अ क्र | प्रकल्पाचे नांव | प्रकल्पाची सद्यस्थिती |
|---|---|---|
| १ | ज्योतीनगर येथे पोहण्याचा तलाव बीओटी तत्वावर विकसीत करणे. | काम पुर्ण |
| २ | रेल्वे स्टेशन जवळील महापौर बंगल्या लगत बीओटी तत्वावर व्यापारी संकुल उभारणे बाबत. | काम पुर्ण |
| ३ | शहानुरवाडी स.न.१२ आरक्षण क्र.२६२ येथे आठवडी बाजार व संकुल बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करणे. | मनपा हिस्सा काम पुर्ण |
| ४ | सिध्दार्थ उद्यान बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करणे. | मनपा हिश्यातील काम पुर्ण तसेच विकासक हिश्यातील कामासाठी सुधारीत बांधकाम परवानगी प्रस्ताव नगर रचना विभागाकडे दाखल आहे. |
| ५ | वेदांत नगर येथे बीओटी तत्वावर जलतरण तलाव व मल्टीपरपज हॉल बांधणे. | मनपा हिश्यातील काम पुर्ण झालेले असुन विकासक हिश्यातील काम ६०% पुर्ण झाले आहे. |
| ६ | टाऊन सेंटर, सिडको येथील स्पोर्टस कॉम्प्लेक्स परिसरात पोहण्याचा तलाव व ॲमिनेटीज इत्यादी बांधणे. | प्रकल्पाचे काम ६०% पुर्ण झाले आहे. |
| ७ | शहानुरवाडी येथील आठवडी बाजार (युरोपीयन मार्केट) बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करणे. | प्रकल्पाचे काम पुर्ण झाले असुन दर सोमवारी आठवडी बाजार भरविण्यात येत आहे. |
| ८ | वसंत भवन इमारत बीओटी तत्वावर विकसीत करणे. | सदर प्रकल्पातील आजपर्यंत पाच आर.सी.सी. स्लॅब टाकण्यात आले आहे. तथापी विकसकाकडून बांधकाम परवाना शुल्क भरणा करणेच्या अटीस व इतर बाबीस मा. उच्च न्यायालयात आव्हान दिले असुन प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. |
| ९ | औरंगपुरा भाजी मंडी बीओटी तत्वावर विकसीत करणे बाबत. | औरंगपुरा भाजी मंडी येथील जुन्या दोन दुकान धारकांनी मा. न्यायालयातुन मनाई हुकुम प्राप्त केला असल्याने त्यांना अद्याप पर्यंत तेथुन काढता आले नसुन त्यांचे समवेत तडजोडीचे प्रयत्न चालू आहेत. ते स्थलांतरीत झाल्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात होईल. तसेच विकसकाकडून बांधकाम परवाना शुल्क भरणा करणेच्या अटीस व स्थळाच्या |

| | | |
|---|---|---|
| | | प्रत्यक्ष स्थिती बाबत मा.उच्च न्यायालयात आव्हान दिले असुन प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. |
| १० | शहागंज भाजी मंडी बीओटी तत्वावर विकसीत करणे बाबत. | सदर प्रकल्पातील जमिनीचे अनुषंगाने रिट याचिका क्रमांक-९९/२०१२ प्रकरणात मा. मनपा न्यायालयाने दिनांक ०४.०३.२०१५ अन्वये मनाई आदेश पारीत केलेला आहे. त्यामुळे कामास अद्याप सुरुवात झालेली नाही. |

**प्रश्न क्रमांक १२४:-**

BOT तत्वावरील कोणकोणत्या कामासाठी PMC नेमणुक करण्यात आलेली आहे? ती केव्हा करण्यात आली? त्यांनी आता पर्यंत त्यांना देण्यात आलेल्या प्रोजेक्टचे काय काम केले? तसेच त्यांना त्या प्रोजेक्ट अंतर्गत किती रक्कम आता पर्यंत देयात आली? व किती रक्कम देणे बाकी आहे? याबाबत सविस्तर माहिती उपरोक्त प्रमाणे देण्यात यावी.

**उत्तर:- BOT कक्ष प्रमुख,महानगरपालिका औरंगाबाद.**

बीओटी तत्वावर हाती घ्यावयाचे प्रकल्पाचे तांत्रिक/आर्थिक निकषा आधारे छाननी करणे, प्रकल्पाचा सर्वकष निकषा आधारे फिजीबीलीटी अहवाल दाखल करणे, प्रकल्पाचे विकासाचे टप्यावर प्रकल्पासाठीचे विकासक यांचेकडून करारनामा अटी नुसार प्रकल्प पुर्ण करणे, प्रकल्पावर वेळोवेळी देखरेख करणे इत्यादी कर्तव्ये पार पाडण्यासाठी वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन प्रकल्प अंदाजपत्रकाच्या १.५०% या दराने नेमणूक करणे बाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करणेसाठी दिनांक १८.१०.२००५ रोजी संपन्न झालेल्या मा. स्थायी समिती सभेमध्ये विषय क्रमांक-८६ अन्वये ठराव मंजुर झालेला आहे. तथापी बीओटी तत्वावर नेमणूक करण्यात आलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (P.M.C.) यांची नियुक्तीची व कार्यालयाची कामनिहाय माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | प्रकल्पाचे नांव | P.M.C. चे नांव | अदा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ज्योतीनगर येथे पोहण्याचा तलाव बीओटी तत्वावर विकसीत करणे. | मे.एस.बी.एस. ॲन्ड असोसिएट्स | १,७८,४८० |
| २ | रेल्वे स्टेशन जवळील महापौर बंगल्या लगत बीओटी तत्वावर व्यापारी संकुल उभारणे बाबत. | मे.एस.बी.एस. ॲन्ड असोसिएट्स | ६,००,००० |
| ३ | शहानुरवाडी स.न.१२ आरक्षण क्र.२६२ येथे आठवडी बाजार व संकुल बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करणे. | श्री डी.ए.पाटील | निरंक |
| ४ | सिध्दार्थ उद्यान बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करणे. | श्री डी.ए.पाटील | निरंक |
| ५ | वेदांत नगर येथे बीओटी तत्वावर जलतरण तलाव व मल्टीपरपज हॉल बांधणे. | मे.एस.बी.एस. ॲन्ड असोसिएट्स | २५,००० |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | टाऊन सेंटर, सिडको येथील स्पोर्टस कॉम्प्लेक्स परिसरात पोहण्याचा तलाव व ॲमिनेटीज इत्यादी बांधणे. | मे.एस.बी.एस. ॲन्ड असोसिएट्स | २५,००० |
| ७ | शहानुरवाडी येथील आठवडी बाजार (युरोपीयन मार्केट) बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करणे. | निरंक | निरंक |
| ८ | वसंत भवन इमारत बीओटी तत्वावर विकसीत करणे. | मे.ग्राफीक्स इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | २,३६,८७५ |
| ९ | औरंगपुरा भाजी मंडी बीओटी तत्वावर विकसीत करणे बाबत. | मे.ग्राफीक्स इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | निरंक |
| १० | शहागंज भाजी मंडी बीओटी तत्वावर विकसीत करणे बाबत. | मे.वसीम नवाज ॲन्ड असोसिएट्स | निरंक |

उपरोक्त दर्शविल्यानुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांना अदा करण्यात येणाऱ्या देयकाची रक्कम ही बीओटी प्रकल्पाच्या निविदेतील अटी व शर्तीनुसार संबंधित प्रकल्प विकासक (Developer) यांचेकडून वसुल करुन प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे समवेत करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार आणि त्यांनी केलेल्या कामाच्या प्रमाणानुसार अदा करण्यात येते. प्रकल्पाच्या सुरुवातीपासुन त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. करिता आपणांस माहितीस्तव कळविण्यात येते.

**प्रश्न क्रमांक १२५:-**

डिफर पेमेंट अंतर्गत व व्हाईट टॅपिंग अंतर्गत आज पर्यंत कोणकोणते रस्ते करण्यात आले? सदरील कामे कोणत्या ठेकेदाराकडून करण्यात येत आहेत? सदरील काम आज कोणत्या स्थितीत आहेत? त्यांना आजापर्यंत किती रक्कम अदा करण्यात आली व किती बाकी आहे? याची तपशिलवार माहिती देण्यात यावी. त्याची मुदत किती होती? (Differ payment व White Tapping) ची माहिती वेगवेगळी देणे.

**उत्तर:-कार्यकारी अभियंता वार्ड (अ व ड),महानगरपालिका औरंगाबाद.**

| अ. क्र | कामाचे नाव | अ.प. रक्कम | गुत्तेदाराचे नाव | झालेला खर्च | बाकी रक्कम | सद्यस्थिती | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| १. | क्रांतीचौक ते पैठणगेट या विकास योजना रस्त्याचे व्हाईट टॉपिंग करणे.<br>तसेच सावरकर चौक ते क्रांती चौक पोलिस स्टेशन या रस्त्याचे व्हाईट टॉपिंग करणे. | ३.४० कोटी | जे.पी. एंटरप्राजेस | २.५९९ कोटी | ०.८०१ कोटी | ➢ क्रांतीचौक ते सिल्लेखाना सिग्नल ते सब्जीमंडी चौक पर्यंत कॉंक्रेटींगचे काम पुर्ण झालेले आहे. उर्वरीत काम प्रगतीपथावर आहे.<br>➢ सावरकर चौक ते क्रांतीचौक पोलिस स्टेशन पर्यंत कॉंक्रेटींगचे काम पुर्ण झालेले आहे. उर्वरीत काम देयक न | ०८ महिने |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | मिळाल्यामुळे काम सद्या बंद आहे. | |
| २. | सावरकर चौक ते सतिश पेट्रोल पंप ते कोकणवाडी चौक या २४.०० मीटर वि.यो.रस्त्याचे तसेच नुतन कॉलनी ते क्रांतीचौक पोलीस स्टेशन या १५.०० मीटर वि.यो.रस्त्याचे व्हाईट टॉपिंग करणे. | ३.७३ कोटी | जे.पी. एंटरप्राजेस | ३.२५० कोटी | ०.४८ कोटी | ➢ सदर रस्त्याचे कॉंक्रेटींगचे काम पूर्ण झालेले असुन कंत्राटदारास देयक न मिळाल्यामुळे फुटपाथ व इतर बाबींचे काम बंद आहे. | ०८ महिने |

**<u>स.पालिका सदस्य श्री.विकास रतनलाल जैन (प्रभाग क्रमांक-१०३):-</u>**
**<u>प्रश्न क्रमांक १२६:-</u>**

मा.बाळासाहेब ठाकरे मार्गाचे काय झाले?

**<u>उत्तर:-कार्यकारी अभियंता वार्ड (अ व ड),महानगरपालिका औरंगाबाद.</u>**

मा.बाळासाहेब ठाकरे (क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन ४०.०० मीटर रुंद विकास योजना प्रमाणे) या रस्त्याचे काम खालील लेखाशिर्षका अंतर्गत करण्यात येत आहे.

१. तेरावा वित्त आयोग निधी — रक्कम रु.१६.४२ कोटी.
२. मनपा फंड (डिफर्ड पेमेंट २०१०-२०११) — रक्कम रु. ७.२९ कोटी.
एकुण रक्कम रु.२३.७१ कोटी.

मे.जी.एन.आय.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना सदर रस्त्याचे काम निविदा प्रक्रिया अंतिक करुन देण्यात आलेले आहे. तेराव्या वित्त आयोग निधी अंतर्गत असलेले काम हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.८६% जास्त दराने आहे. तसेच डिफर्ड पेमेंट २०१०-२०११ अंतर्गत करण्यात येणारे काम हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३९.३९% जास्त दराने देण्यात आलेले आहे.

या रस्त्या करीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) मे. क्रिऐशन्स इंजिनिअर्स प्रा.लि.पुणे यांची नियुक्ती निविदा प्रक्रिया अंती करण्यात आलेली आहे. या करीता प्रा.टेन्डर ॲक्टीव्हीटीज १% पोस्ट टेन्डर ॲक्टीव्हीटीज १.३% असे एकुण २.३% या दराने कन्सलटन्सी फीस देय आहे.

तेरावा वित्त आयोग निधी अंतर्गत करण्यात येणाऱ्या कामाचा नियोजित कालावधी कार्यादेश दिनांका पासुन (दि.२६/०२/२०१३) नऊ महिने म्हणजेच दि.२५/११/२०१४ पर्यंत मंजुर निविदेनुसार कामाचा कालावधी आहे. यास प्रथम मुदतवाढ दि.३१/०५/२०१४ पर्यंत, द्वितीय मुदत वाढ दि.३१.१२.२०१४ व तृतीय मुदतवाढ दि.३१.०५.२०१५ नुसार घेण्यात आलेली आहे.

डिफर्ड पेमेंट (२०१०-२०११) अंतर्गत कामाचा नियोजित कालावधी कार्यादेश दिनांक (३१/१२/२०११) पासुन २४ महिने म्हणजेच दि.३०/१२/२०१३ पर्यंत मंजुर निविदेनुसार आहे.

यास प्रथम मुदत वाढ दि.३१/०५/२०१४ पर्यंत घेण्यात आली आहे. द्वितीय मुदतवाढीचा प्रस्ताव कार्यवाही अंतर्गत आहे.

सदरील रस्त्याचे पी.एम.सी. यांनी दिलेल्या डिझाईन नुसार ७.५० मी.रुंदीचे कॉंक्रीट पेव्हमेंटरचे काम (दोन्ही बाजुने), रस्ता दुभाजकाचे काम, काही भागात डांबरी पेव्हमेंटचे काम (दोन्ही बाजुने उपलब्ध रुंदीनुसार) पुर्ण झाले असुन मलनि:सारण वाहिनी, जलवाहिनी इत्यादी स्थलांतरीत करणे तसेच भुसंपादन,अस्तित्वातील विद्युत खांबे डी.पी.स्थलांतीरत करणे इत्यादीचे भागश:काम जागा उपलब्धतेनुसार करण्यात आलले आहे व अर्वरीत कामे भुसंपादन,अस्तित्वातील विद्युत खांबे, डी.पी.स्थलांतरीत करणे इत्यादी समस्या दुरु झाल्याशिवाय उर्वरीत डांबरीकरणाचे काम, युटीलिटी कॉरीडोअर, फुटपाथ इत्यादी कामे करणे सद्यस्थितीत शक्य नाही. या करीता नगर रचना विभाग, मनपा विद्युत विभाग, अतिक्रमण विभाग,महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांचेशी पत्रव्यवहार सुरु असुन मा.आयुक्त,मा.शहर अभियंता यांनी त्यांचे स्तरावर या बाबत अनेक वेळा बैठकांचे आयोजन करुन वेळोवेळी रस्ता विकास कामाबाबत मार्गदर्शन करुन समस्यांचे निवारण केले आहे.

विकास योजना रस्त्याने बाधीत खाजगी व शासकीय मालमत्ताचे हस्तांतरण अभावी अस्तित्वातील विद्युत खांबे, डी.पी.स्थलांतरा अभावी सध्या उपलब्ध रुंदी नुसार रस्त्याचे काम जसे की, डांबरीकरण करणे, जलवाहीनी/मलनिसा:रण वाहिन्या टाकणे, स्ट्रॉम वॉटर ड्रेनेजचे काम, चौकामध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे इत्यादी कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच क्रांतीचौक येथील विकास योजना रस्त्याने बाधीत झाशीची राणी उद्यान,महानगरपालिका या मिळकतीचे विकास कामांतर्गत रिटेनींग वॉल बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

तेराव्या वित्त आयोग निधी अंतर्गत देयक रक्कम रुपये १५.७० कोटी व डिफर्ड पेमेंट २०१०-२०११ अंतर्गत देयक रक्कम रुपये ०५.५९ कोटी असे एकुण रक्कम रुपये २१.२९ कोटीची देयके लेखा विभागास सादर केलेली आहेत.

डिफर्ड पेमेंट पॅटर्नच्या करारनाम्यानुसार या पैकी प्रथम देय ३०% रक्कम रुपये १.२९ कोटी होते. तथापि, संबंधीत गुत्तेदारास यापैकी रुपये ०.५३ कोटी अदा करण्यात आलेले आहे.

यानुसार या कामावरील एकुण खर्च रक्कम रुपये २१.२९ कोटी पैकी तेराव्या वित्त आयोगा अंतर्गत रक्कम रुपये १५.७० कोटी व डिफर्ड पेमेंट २०१०-२०११ अंतर्गत रक्कम रुपये ०.५३ कोटी असे एकुण रक्कम रुपये १६.५३ कोटी अदा करण्यात आलेले आहे.

**स.पालिका सदस्य श्रीमती सरवत बेगम आरेफ हुसैनी (प्रभाग क्रमांक-२४):-**

**प्रश्न क्रमांक १२७ ते १२९:-**

**उत्तर:-उपआयुक्त (महसूल), महानगरपालिका औरंगाबाद.**

| प्र.क्र. | प्रश्न | खुलासा |
|---|---|---|
| १२७. | औरंगाबाद महानगरपालिका - एकूण किती अधिकाऱ्यांना अतिरिक्त पदभार देण्यात आले आहे. | सद्यस्थितीत अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेल्या अधिकाऱ्यांची माहिती यासोबत देण्यात येत आहे. |
| १२८. | अतिरिक्त पदभार देतांना नियमाचे दखल घेण्यात आले आहे काय ? | महाराष्ट्र नागरी सेवा(वेतन)नियम १९८१ चे नियम ५६ अन्वये आधीपासून एखादे पद कायमपणे किंवा स्थानापन्न नात्याने धारण करणाऱ्या |
| १२९. | अतिरिक्त पदभारची नियमावली व | |

| | | |
|---|---|---|
| | कार्यकाळाची मुदत किती असते ? | शासकीय कर्मचाऱ्याला,तात्पुरता उपाय म्हणून एकाच वेळी एका किंवा त्याहून अधिक स्वतंत्र पदावर स्थानापन्न म्हणून नियुक्त करता येईल किंवा त्याच्या स्वत:च्या पदाव्यतिरिक्त एका किंवा जास्त स्वतंत्र पदांचा अतिरिक्त कार्यभार त्याच्याकडे सोपविता येईल,अशी तरतूद आहे. |

**सद्यस्थितीत अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेल्या अधिकाऱ्यांची माहिती.**
**(दि.१०/०८/२०१५ रोजीची स्थिती)**

| अ क्र | अधिकाऱ्यांचे नांव | पदनाम | अतिरिक्त पदभार | कार्यभार दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.के.एम.फालक | शाखा अभियंता | उपअभियंता,पा.पु. जायकवाडी (स्थापत्य) | ९/१/२००९ |
| २ | श्री.बाबासाहेब चव्हाण | शारिरीक शिक्षक | क्रिडाधिकारी | मे-२०११ |
| ३ | श्री.अशोक पदमे | शाखा अभियंता | उपअभियंता,पाणी पुरवठा (ब/क) कार्यालय | ऑक्टोंबर-२०१२ |
| ४ | श्री.एस.बी.झनझन | मुख्य अग्निशमन अधि. | कर निर्धारक व संकलक | १४/२/२०१३ |
| ५ | श्री.यु.जी.शिरसाठ | उपअभियंता,पा.पु. जायकवाडी (यांत्रिकी) | उपअभियंता, यांत्रिकी (वाहने) | ३/३/२०१४ |
| ६ | श्रीमती मिनल ठोकळ | ए.एन.एम., आरोग्य विभाग | पी.एच.एन.,आरोग्य विभाग | २४/७/२०१४ |
| ७ | श्री.एस.बी.झनझन | मुख्य अग्निशमन अधि. | प्रशासकीय विभाग प्रमुख (अतिक्रमण) | ७/८/२०१४ |
| ८ | श्री.अहेमद तौसिफ | जनसंपर्क अधिकारी | सांस्कृतिक अधिकारी | ३१/१०/२०१४ |
| ९ | श्री.बी.एल.जाधव | उपआयुक्त | शिक्षणाधिकारी | १/११/२०१४ |
| १० | श्री.भालचंद्र पैठणे | आस्थापना अधिकारी-१ | महिला व बाल विकास अधिकारी | १३/२/२०१५ |
| ११ | श्री.बाबासाहेब चव्हाण | शारिरीक शिक्षक | नागरी क्रीडा केंद्र, गरवारे क्रीडा संकुल व क्रीडा स्पर्धा प्रमुख | ११/३/२०१५ |
| १२ | श्री.अब्दुल फारुख खान | शाखा अभियंता | उपअभियंता,वॉर्ड-क कार्यालय | मे-२०१५ |
| १३ | श्री.हेमंत कोल्हे | कार्यकारी अभि.- | कार्यकारी अभियंता | १/७/२०१५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | अ/ड | (विद्युत/ड्रेनेज) | |
| १४ | श्री.डी.डी.सुर्यवंशी | कामगार अधिकारी | सहाय्यक प्रकल्प अधिकारी (एनयुएमएल) | ६/७/२०१५ |
| १५ | डॉ.बाबासाहेब उनवणे | वैद्यकीय अधिकारी | जीवशास्त्रज्ञ | ८/७/२०१५ |
| १६ | श्री.एम.बी.काझी | तांत्रिक कक्ष प्रमुख | उपअभियंता, विद्युत विभाग | १४/७/२०१५ |
| १७ | श्री.भालचंद्र पैठणे | आस्थापना अधिकारी-१ | आस्थापना अधिकारी-२ | २८/७/२०१५ |
| १८ | श्री.डी.डी.सुर्यवंशी | कामगार अधिकारी | नगर सचिव | १/८/२०१५ |

**प्रश्न क्रमांक १३०:-**

सन २०१४-२०१५ मध्ये अग्निशमन विभागामार्फत महानगरपालिका हद्दीत एकुण किती हॉटेल, मॉल व व्यवसाय करीता किती ना हरकत प्रमाण पत्र देण्यात आले?

**उत्तर:-मुख्य अग्निशमन अधिकारी,अग्निशमन विभाग, महानगरपालिका औरंगाबाद**

अग्निशमन विभागाकडून सन २०१४-२०१५ या वर्षामध्ये खालीलप्रमाणे अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | व्यवसायाचे नाव | एन.ओ.सी.साठी प्राप्त अर्ज | एन.ओ.सी.देण्यात आली |
|---|---|---|---|
| १. | हॉटेल (टी हाऊस/रेस्टॉरंट/ज्युस सेंटर/स्वीट सेंटर/खानावळ) | ८७ | ८२ |
| २. | रेस्टॉरंट ॲण्ड बार | ३३ | ३० |
| ३. | लॉजिंग | ५६ | ३७ |
| ४. | धाबा | ०४ | ०५ |

**स.पालिका सदस्य श्री.विजय साईनाथ औताडे (प्रभाग क्रमांक-७):-**

**प्रश्न क्रमांक १३१:-**

टॅक्स रिव्हीजन केव्हा झाले? कर मुल्य निर्धारक व संचालक विभाग किती कर्मचारी व त्यांचे नांव?

**उत्तर:-कर निर्धारक व संकलक,महानगरपालिका औरंगाबाद**

मालमत्ता कराचे रिव्हीजन १९८९-९० मध्ये झाले.

कर निर्धारक व संकलक विभागात किती कर्मचारी व त्यांचे नाव

| अ.क्र. | कर्मचारी यांचे नाव | पद | विभाग |
|---|---|---|---|
| १. | श्री.शेख मुनीर चॉंद | दु.आ. | कर निर्धारक व संकलक |
| २. | श्री.सतिष पैठणे | शिपाई | कर निर्धारक व संकलक |
| ३. | श्रीमती सुलोचना सोनवणे | शिपाई | कर निर्धारक व संकलक |

इति.स.सा.सभा दि.२०.०८.२०१५
कार्यक्रम पत्रिका क्रमांक-६

विशेषकक्ष कर आकारणी विभाग

| अ.क्र. | कर्मचारी यांचे नाव | पद | विभाग |
|---|---|---|---|
| १. | श्री.किरण शिरोडकर | क.लि. | विशेषकक्ष कर आकारणी विभाग |
| २. | श्री.नितीन खोकले | क.लि. | विशेषकक्ष कर आकारणी विभाग |
| ३. | श्रीमती सुषमा पासेबंद | अनुरेखक | विशेषकक्ष कर आकारणी विभाग |
| ४. | श्री.राजेश जाधव | क.लि. | विशेषकक्ष कर आकारणी विभाग |
| ५. | श्री.यशपालसिंग राजपूत | शिपाई | विशेषकक्ष कर आकारणी विभाग |
| ६. | श्री.संजय बंन्सीले | शिपाई | विशेषकक्ष कर आकारणी विभाग |

**प्रश्न क्रमांक १३२:-**

सन २०१४-२०१५ मध्ये किती वसुली झाली? रक्कमेमध्ये व एकूण मागणीची टक्केवारीत एकुण मालमत्ता धारकाची संख्या किती? रहिवाशी व वाणिज्य वेगवेगळी द्यावी. सन-२०१५ (३१-मार्च पर्यंत) थकबाकी किती?

**उत्तर:-कर निर्धारक व संकलक,महानगरपालिका औरंगाबाद.**

सन २०१४-१५ वसुली तक्ता.

| मागणी | मालमत्ता कर | टक्केवारी | झालेली एकूण वसुली |
|---|---|---|---|
| रु.१०० कोटी | रु.७२,०४,९७,८२९ | ७२.०५% | रु.७७,५२,८४,३४२ |
| एकुण थकबाकी ३१ मार्च-२०१५ पर्यंत रु.८,८५,५३,३४५/- | | | |

मालमत्तांची संख्या

| मालमत्तांची संख्या | निवासी | व्यावसायीक |
|---|---|---|
| १,९४,२२४ | १,७१,५६८ | २२,६५६ |

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद